Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २७४ * * नागपूर * बुधवार, दिनांक १ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## वाल्मीक कराडचे एन्काऊंटर करा...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:
बीड येथील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपी वाल्मीक कराड याने स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन केले. दरम्यान, वाल्मीक कराडचे एन्काऊंटर करा, अशी खळबळजनक मागणी भीम आर्मी संघटनेचे राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे यांनी केली आहे.

अशोक कांबळे यांनी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेतली. अशोक कांबळे म्हणाले, तो बीडमध्येच होता. पोलिसांच्या 50 गाड्या काल बीडमध्ये फिरत होत्या. याच लोकांनी त्यांना पुण्यापर्यंत नेले असल्याचा दावा अशोक कांबळे यांनी केला आहे.

# वाल्मीक कराड शरण!



■ वृत्तसंस्था, बीड, दि. ३१:
बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मीक कराड आज अखेर सीआयडीपुढे शरण आला. त्याने पुणे स्थित सीआयडीच्या कार्यालयात आत्मसमर्पण केले. त्याची सध्या चौकशी सुरू आहे.

वाल्मीक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर वाल्मीक कराड पोलिसांना शरण आला आहे.

वाल्मीक कराड याने मंगळवारी सकाळी एका व्हिडिओद्वारे आपण पुण्यातील सीआयडी कार्यालयात सरेंडर करणार असल्याचे सांगितले होते. तो आपल्या व्हिडिओत म्हणाला, मी वाल्मीक कराड. माझ्याविरोधात बीडच्या केज पोलिस ठाण्यात खंडणीची खोटी फिर्याद दाखल केली आहे. मला अटकपूर्व जामीनाचा अधिकार असताना मी पुणे सीआयडी ऑफिस पुणे पाषाण रोड येथे सरेंडर होत आहे. संतोष देशमुख यांचे मारेकरी जे कुणी असतील त्यांना अटक करून फाशीची शिक्षा दिली जावी. राजकीय द्वेषापोटी माझे नाव या प्रकरणाशी जोडले जात आहे. पोलिस तपासाच्या निष्कर्षात मी दोषी आढळलो तर मी न्यायदेवता देईल ती शिक्षा भोगण्यास तयार आहे.

तत्पूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदाचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी वाल्मीक कराड आज सरेंडर करणार असल्याचा दावा केला होता. त्यांनी ही माहिती आपल्याला वाल्मीक कराड यांच्या निकवर्तीयांनीच दिल्याचे सांगितले होते.

दुसरीकडे, संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याची मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केली आहे. तर वाल्मीक कराड याचेवर खुनाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी राष्ट्रवादीचे आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

### संतोष देशमुख हत्या : परभणीमध्ये ४ जानेवारी रोजी मोर्चा

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात त्यांच्या कुटुंबाला न्याय देण्यासाठी परभणीत 4 जानेवारीला सर्वपक्षीय शांतता मोर्चा काढला जाणार आहे. शहरातील विविध सामाजिक संघटना व व्यापारी संघटनेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. 4 रोजी सकाळी 11 वाजता नूतन विद्यामंदिर जिंतूर रोड येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर शांती मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. या शांती मोर्चाला परभणी जिल्ह्यातील प्रत्येक गावातून नागरिक उपस्थित राहणार आहेत. यासंदर्भात प्रमुख मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात येणार आहे.

### पोलीस काय करत होते?



वाल्मीक कराड स्वतः सरेंडर झाला, तर मग पोलिस यंत्रणा इतके दिवस काय करत होती? आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांना इतका वेळ लागत असेल, तर मग आम्ही न्यायाची अपेक्षा कधी करायची? आम्हाला न्याय कधी मिळणार? असा सवाल मृत संतोषची मुलगी वैभवी देशमुख हिने उपस्थित केला आहे. सीडीआरनुसार इतरही आरोपी समोर येत असतील, तर त्यांनाही अटक करावी. माझ्या वडिलांना आणि आम्हाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी वैभवीने केली आहे.

## गुंडांचे राज्य चालवू देणार नाही



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:
बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी फासावर लटकेपर्यंत पोलिस स्वस्थ बसणार नाहीत, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.

बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. आम्ही गुंडांचे राज्य चालवू देणार नाही. कुणालाही अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही व खंडणी मागता येणार नाही, असे ते म्हणालेत.

बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मीक कराड आज अखेर सीआयडीपुढे शरण आला. त्याने पुणे स्थित सीआयडीच्या कार्यालयात आत्मसमर्पण केले. वाल्मीक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणी भाष्य करताना बीडच्या प्रकरणात कुणालाही सोडणार नसल्याची ग्वाही दिली. ते म्हणाले, बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. अतिशय कडक कारवाई केली जाईल. गुंडांचे राज्य आम्ही चालवू देणार नाही. कुणालाही या प्रकरणी अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही. खंडणी मागता येणार नाही. त्या दृष्टिकोनातून तपास अतिशय गतीशिल करण्यात आला आहे. त्यामुळेच त्यांना शरणागती पत्करावी लागली आहे.

अग्राग्रलेख
खरीखरी...

## कराडचे शहिदायन

कोणे एकेकाळी लंडनचे स्कॉटलंड यार्ड पोलीस गुन्हेगारांना शोधण्यात जगात पहिल्या क्रमांकावर होते. त्यानंतर मुंबई पोलिसांचा क्रमांक लागत होता. आपल्या महाराष्ट्राचे म्हणजेच मुंबईचे पोलीस दल गुन्हेगारीचे कर्दनकाळ समजले जात होते. त्यावेळी केवळ स्वतःच्या हिमतीवर, कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर, वेळोवेळी त्यांनी दाखवलेल्या चाणाक्षतेवर आणि विविध विभागातील लोकांच्या संबंधावर गुन्हेगारांच्या शोध घेण्याची परंपरा होती. तोपर्यंत मुंबई पोलीस देशात आघाडीवर होते. त्याकाळी मुंबईत गुंडांच्या, अतिरेक्यांच्या सगळीकडे मोठमोठ्या टोळ्या होत्या आणि चिल्लर गुन्हेगारही तेव्हा गल्लोगल्लीत होते. त्यावेळी अशा सर्वांना वचक बसेल, अशी पोलीस दलाची कामगिरी असायची. आता पोलिसांजवळ अत्याधुनिक यंत्रणा आहे. कॅमेऱ्यापासून ते शोधकार्यात मदतीसाठी अनेक अद्ययावत उपकरणे आहेत. ठिकठिकाणी खब?्यांचे जाळे आहे. पण आता पोलीस ज्यांना पकडायचे त्यांना तात्काळ पकडतात आणि ज्याला पकडायचेच नाही. तो राजरोस फिरत असला तरी तो पोलिसांना सापडत नाही. रामायणातील रावणाला हिरो समजणारे वाल्मिकी आज पोलिसांसमोर शरणागत झाले. अर्थाअर्थी आपला त्या विशिष्ट खुनाशी कोणताही संबंध नाही. असे या वाल्मीक कराडचे म्हणणे आहे. जर संबंधच नाही तर पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचे कारणच नाही. असे कराड म्हणतात. आज कराड स्वतःहून पोलिसांच्या दरबारात म्हणजेच सीआयडी मुख्यालयात हजर झाले. आपण स्वतः पोलिसांसमोर आत्मसमर्पण करीत आहोत, असा मानभावी पवित्रा त्यांनी घेतला. जर कराड यांचा या प्रकरणाशी काहीच संबंध नसता. तर त्यांना इतके दिवस पोलिसांकडे आत्मसमर्पण करण्यासाठी कोणी रोखले होते. हे कराड कोणाचे लाडके आहेत आणि ते काय काय करतात, हे अनेकांना ठाऊक आहे. खरे तर वाल्मीक कराड हा एक अत्यंत साधा भोळा माणूस आहे. त्याला बिचाऱ्याला विनाकारण यात अडकवण्यात आलेले आहे. त्याचे या प्रकरणात काही देणे घेणे नाही असे खुद्द कराडांचे म्हणणे आहे. ज्या प्रश्नावरून केवळ बीड जिल्ह्यातच नाही तर अखिल महाराष्ट्रात जबरदस्त बोंबाबोंब झालेली आहे. मोर्चे निघालेले आहेत. त्या प्रकरणाबाबत कराड यांनी दाखवलेला साळसूदपणा कुठेतरी संशय निर्माण करतो की काय, असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे. ज्या सरपंच महोदयांचा खून झाला त्याचा तपास आपल्या महाराष्ट्राचे कार्यक्षम गृह खाते करणार आहे. तेथे दुधाचे दूध आणि पाण्याचे पाणी होईलच. ज्या खुनामुळे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. त्या प्रकरणाचे गांभीर्य अत्यंत मोठे आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे जसे पोलिसांचे कर्तव्य आहे. तसेच महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या संभावित खुनाचा आणि त्यामागील कटकारस्थाने करणाऱ्यांचा खुलासा होणे, तितकेच गरजेचे आहे. महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. या राज्यात सुख आहे समृद्धी आहे. तेव्हा या सुख समृद्धीला नजर लागू नये. अशी सर्वसाधारण जनतेची मनीषा आहे. आज महाराष्ट्राची राजकीय आणि सार्वजनिक जीवनात या वाल्मीक कराडमुळे सर्वत्र बदनामी होत आहे. ही बदनामी थांबवणे हे सुद्धा शासनाचे काम आहे. अजूनही या प्रकरणाचा हवा तेवढा गंभीरपणे विचार झालेला नाही. ही गोष्ट सरकारला नक्कीच भूषणावह नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी कठोर भूमिका घेऊन कराड यांचे गुन्हेगारीचे वऱ्हाड उघडकीस आणावे, असे केवळ बीडच्याच नाही तर अखिल महाराष्ट्रातील जनतेला सुद्धा वाटते. त्यातल्या त्यात या कराडने आपले पाय पोलिसांच्या सीआयडी मुख्यालयाला लावले, हे महत्त्वाचे. कराडने आत्मसमर्पण करतानाही जणू काही आपण शहीद होत आहोत. अशा पद्धतीचा शहीदी बाणा दाखवण्यासही कमी केले नाही. आता या प्रकरणाचा शेवट कसा होतो. ते महाराष्ट्राची जनता उघड्या डोळ्यांनी बघत आहे. न्यायदेवतेचा विजय असो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## काम दाखवण्यासाठी मंत्र्यांना १०० दिवसांचा रोड मॅप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:
पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखे लोकाभिमुख पारदर्शक सरकार चालवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अॅक्टिव्ह मोडवर काम सुरू केले आहे. फडणवीस यांनी आतापर्यंत एकूण ९ मंत्रालयांच्या आगामी १०० दिवसांच्या कृती आराखड्याची सविस्तर आढावा बैठक घेतली आहे. विहित मुदतीत निकालाभिमुख कामे करण्याचा दबाव मंत्री व सचिवांवर निर्माण झाला आहे.

फडणवीसांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसीय नियोजन आराखड्याच्या अनुषंगाने परिवहन, बंदरे व नागरी विमानचालन, सांस्कृतिक कार्य, ग्रामविकास, अन्न व नागरी पुरवठा, वस्त्रोद्योग विभागांची बैठक झाली.

यापूर्वी त्यांनी उच्च व तंत्रशिक्षण, वन व कृषी विभागाची अशीच आढावा बैठक घेतली होती. विशेष म्हणजे फडणवीस यांची ही कार्यशैली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीशी मिळतीजुळती असल्याचे सांगण्यात येत आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून आढावा

फडणवीस यांनी आयएएस अधिकारी श्रीकर परदेशी यांना सचिव बनवले आहे. परदेशी यांनी पंतप्रधान कार्यालयात उपसचिवपद भूषवले आहे. मेट्रोवुमन अश्विनी भिडे यांना मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव बनवून सीमओमध्ये आणले आहे.

सर्व मंत्र्यांना त्यांचे खासगी सचिव आणि कर्मचारी नियुक्त करण्यापूर्वी मुख्यमंत्री कार्यालयाला माहिती देण्यास सांगण्यात आले आहे. अशा सर्व खासगी सचिवांची पोलिस पडताळणी करण्याबरोबरच त्यांच्या रेकॉर्डची छाननी केली जात आहे. विधानसभा व मंत्रालयाचे कामकाज बाजार होऊ देणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

## आरटीजीएस : प्राप्तकर्त्याचे नाव कळणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:
१ एप्रिलपासून सर्व बँकांमध्ये आरटीजीएस-एनईएफटी पेमेंटमध्ये ज्याला पैसे पाठवलेत त्या प्राप्तकर्त्याचे नाव पाहता येईल. रिझर्व्ह बँकेने नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला ग्राहकांचे चुकांपासून संरक्षण करण्यासाठी व फसवणूक टाळण्यासाठी व्यवहार करण्यापूर्वी बँक खात्याचे नाव सत्यापित करण्याची सुविधा विकसित करण्यास सांगितले आहे. सध्या, लूकअप सुविधा यूपीआय आणि आयएमपीएसमध्ये पेमेंट सुरू करण्यापूर्वी प्राप्तकर्त्याच्या नावाची पडताळणी करण्याची सुविधा प्रदान करते.

## गुरुजींना बारबंदी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१:
३१ डिसेंबर थर्टी फर्स्टचे औचित्य साधून आश्रमशाळेतील काही कर्मचारी बारचा आधार घेतील असा अंदाज आहे. त्यासाठी विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. पथकामार्फत बार, हॉटेल या ठिकाणी अचानक भेट देऊन तपासणी केली जाईल आणि तपासणीत जे मुख्याध्यापक, गृहपाल, शिक्षक शिक्षकेतर बारमध्ये दिसतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल असे आदेश सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवणचे अकुनुरी नरेश यांनी काढले आहे.

शाळेतील कर्मचारी हे महत्त्वाचे घटक मानले जातात, तरीही काही कर्मचारी बारमध्ये जाऊन मद्यपान करतात. यामुळे अपघात होऊन काही कर्मचारी कायमचे जायबंदी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यावर उपाय म्हणून शाळेच्या आवारात तंबाखू, गुटखा बाळगण्यासही बंदी घातली आहे, बारमध्ये कर्मचारी आढळल्यास त्याच्यावर देखील कठोर कारवाई केली जाणार आहे. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांच्या अपघातात घट झाली आहे.



■ नागपूर : नववर्षाचे स्वागत करण्यासाठी मुंगळवारी सर्वत्र जय्यत तयारी करण्यात आली होती. आकाशात उडणारे फुगे खरेदी करण्यासाठी तरूणाईची प्रचंड गर्दी झाली होती.

## चंद्राबाबू नायडू सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१:



आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू हे भारतातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे ९३१ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता आहे. पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी या केवळ १५ लाख रुपये संपत्तीसह देशातील इतर मुख्यमंत्र्यांच्या तुलनेत सर्वात गरीब आहेत.

दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे १३.२७ कोटींची मालमत्ता आहे. एकूण ३१ मुख्यमंत्र्यांच्या मालमत्तांचा विचार केल्यास त्यात फडणवीस यांचा क्रमांक १२ वा लागतो.

शरद पवार समर्थक आमदार, खासदारांचा आग्रह

## अजित पवारांकडे चला...

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१:



विधानसभेला पुन्हा पाच वर्षासाठी विरोधात बसण्याची वेळ आल्यामुळे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे काही आमदार, खासदार प्रचंड अस्वस्थ झाले आहेत.

८, ९ जानेवारीला होणाऱ्या पक्षाच्या बैठकीत सत्तेसोबत जाण्याचा निर्णय पक्षाने घ्यावा यासाठी आग्रही भूमिका मांडण्याचे नियोजन त्यांनी केले आहे. आपला पक्ष अजित पवारांच्या पक्षात विलीन करून एकच राष्ट्रवादी जोमाने वाढवावी अशीही त्यांची भूमिका आहे. त्यावर शरद पवार, सुप्रिया सुळे काय भूमिका घेतात, यावर पुढील घडामोडी ठरणार आहेत.

सत्ता नसल्याने पुढील ५ वर्षे मतदारसंघातील विकासकामे होणार नाहीत. मग पुढच्या निवडणुकीला सामोरे कसे जायचे, हा प्रश्न या नेत्यांना सतावतो आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण करावे आणि संघटन अधिक मजबूत करून पुढची वाटचाल करावी, असे बहुतेकांचे मत आहे. जितेंद्र आव्हाड, रोहित पाटील आणि उत्तम जानकर या तिघांचा मात्र या प्रस्तावाला विरोध आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली या राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व कायम ठेवावे आणि विरोधी पक्षाची भूमिका बजावावी, असे त्यांना वाटत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात ८ जानेवारीला या बैठकीला प्रारंभ होईल. स्वतः शरद पवार या बैठकीला उपस्थित राहाणार असून पक्षाच्या पुढील वाटचालीसंदर्भात महत्त्वाची चर्चा आणि निर्णय होणार असल्याने पक्षाचे आमदार, खासदार, माजी आमदार, माजी खासदार आणि पक्षाच्या जिल्हाध्यक्षांना देण्यात आले आहेत.

## गृहमंत्र्याच्या शहरात वर्षभरात ९० हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१:
गृहमंत्र्यांचे शहर असूनही नागपुरात गुन्हेगारी शहरात झपाट्याने वाढत आहे. गेल्या वर्षभरात तब्बल ९० हत्यांच्या घटनांनी उपराजधानी हादरली आहे.

गेल्या ६ दिवसांत तर तब्बल ७ हत्याकांडाच्या घटना घडल्या आहेत. एकामागून एक होत असलेल्या हत्याकांडांनी नागपूरकरांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. या वाढत्या हत्याकांडांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उपराजधानीत गेल्या काही महिन्यांपासून हत्याकांडाच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. जानेवारी ते डिसेंबर महिन्यांत ९० हत्याकांडाच्या घटना घडल्या आहेत. मिझार्पूर या वेबसिरिजमध्ये दिवसाढवळ्या गुंड भरचौकात खून करीत असल्याचे दाखविण्यात आले आहे. तशीच परिस्थिती आता नागपुरातही आहे.

पोलिसांचा वचक नसल्यामुळे गुन्हेगारांची हिम्मत वाढली आहे. वैयक्तिक कारणांसह किरकोळ कारणांमधून या हत्या झाल्याचे उघड झाले. दिवसाढवळ्या चाकूने भोसकणे, पैशांची मागणी करत दगडाने ठेचून खून, चाकूहल्ला असे प्राणघातक हल्ले शहरात वाढले. गेल्या सहा दिवसांत सात हत्येच्या घटना घडल्या. अनेक पोलीस कर्मचाऱ्यांचे गुन्हेगारांशी ह्यअर्थपूर्णह्न संबंध असून त्यात अंमली पदार्थ तस्करांचाही समावेश आहे. शहरात सध्या सुरू असलेला हत्यासत्रासाठी अनेक प्रकारची कारणे देण्यात आली. त्यात वैमनस्य, टोळीयुद्ध, युवक-युवतीमधील प्रेमसंबंध, विवाहित महिला व पुरुषांचे अनैतिक संबंध, धार्मिक तेढ, कौटुंबिक वाद, संपत्तीच्या वादासह अन्य कारणांचा समावेश आहे. परंतु, शहरात सर्वाधिक हत्याकांड कौटुंबिक कारण आणि अनैतिक संबंधातून घडलेले आहेत. गेल्या वर्षी एकूण ७९ हत्येच्या घटना नागपुरात घडल्या होत्या. मात्र, यावर्षी आकडा वाढून ९० वर पोहचला आहे. नागपूरची वाटचाल मिझार्पूर होण्याच्या दिशेने सुरू आहे.

### महिलांची सुरक्षा धोक्यात

महिला व जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र, उपराजधानीत महिलांवर लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार आणि विनयभंगाच्या घटनांसह महिलांविरुद्धच्या गुन्ह्यात वाढ झाली आहे. पोलीस ठाण्यात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध तक्रार अर्ज दाखल केल्यास पोलीस गांभीर्य दाखवत नाहीत. अशा तक्रारींची तत्काळ दखल घेतल्या जात नाही. त्यामुळे गुन्हेगारीमध्ये वाढ होत आहे.

अंबिका बहुउद्देशिय शिक्षण संस्था
सालेकसा व्दारा संचालित
अनु. कचारगड आदिवासी
माध्यमिक आश्रम शाळा पिपरीया
ता. सालेकसा, जि. गोंदिया तर्फे
जिल्ह्यातील सर्व जनतेला
नुतन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा..!

ग्राम पंचायत कवठाळा
तर्फे नवीन वर्ष - २०२५
च्या समस्त जनतेला
हार्दिक शुभेच्छा!



## संक्षिप्त

### एमएचटी-सीईटीची ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु

पुणे, दि. ३१ : प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये होणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक राज्य समाइक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केले आहे. त्यानंतर आता अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या एमएचटी-सीईटीचीविद्यार्थी नोंदणीची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. सीईटी सेलकडून पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या एकूण १९ प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. त्यासाठीचे संभाव्य वेळापत्रक सीईटी सेलने उपलब्ध करून दिले आहे. त्यानुसार सीईटी परीक्षा मार्चपासून सुरू होणार आहेत. या परीक्षांसाठीची नोंदणी प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी, शिक्षणशास्त्र-शारीरिक शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमएड आणि एमपीएड), तीन वर्षे विधी अभ्याससक्रम अशा काही अभ्यासक्रमांच्या सीईटीची ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सीईटी सेलच्या नियोजानुसार अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, कृषि पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची एमएचटी-सीईटी ९ ते २७ एप्रिल या कालावधीत घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठीची ऑनलाइन नोंदणी सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना ३० डिसेंबर ते १५ फेब्रुवारी या कालावधीत ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. अधिक माहिती सीईटी सेलच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

### कारखान्यातून इलेक्ट्रिक साहित्याची चोरी

भिवंडी, दि. ३१ : प्रतिनिधी

अज्ञात चोरट्याने कारखान्याची भिंतीखालील जाळी तोडून आत प्रवेश करून कारखान्यातील इलेक्ट्रिक साहित्याची चोरी केल्याची घटना खाडीपार परिसरातून समोर आली आहे.याप्रकरणी निजामपूरा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,नागेश बालसिधया चन्ना (५२) हे पद्मानगर मध्ये राहत असून त्यांचा खाडीपार परिसरातील महाराजा हॉटेल जवळ घरत कंपाऊंड मध्ये हाऊस नं.८८२ गाळा नं.३ या ठिकाणी पॉवर लुम (टेक्टस्टाईल) कारखाना आहे.दरम्यान २० ते २७ डिसेंबर च्या कालावधीत अज्ञात चोरट्याने कारखान्याच्या पाठीमागील भिंतीच्या खिडकी खालील लोखंडी जाळी तोडून त्यावाटे आत प्रवेश करून मशीन मोटरचे ६ नग,मशीन पॅनलचे ६ नग, मशीनच्या डोपपिन ६ पट्ट्या,६ एकुलेटार अशा एकूण ३ लाख ९० हजार रुपये किमतीचा इलेक्ट्रिक साहित्य चोरून नेला आहे.याप्रकरणी अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोउनि वडगिरे करीत आहेत.

### पडघ्यातील अद्वैत जाधवची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत निवड

भिवंडी, दि. ३१ : प्रतिनिधी

भारतातील वाय.एस.सी.एल. या यंग स्टार्स क्रिकेट लीग मध्ये १४ वर्षांखालील वयोगटातील महाराष्ट्र राज्यातून निवड होऊन दिल्ली, नोएडा येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय (लेदर) क्रिकेट स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील पडघा समतानगर येथिल कु.अद्वैत अमोल जाधव याने गोलंदाज म्हणून उत्कृष्ट गोलंदाजी करून महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करून त्याची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे.तर ग्रामीण भागातील अद्वैत अमोल जाधव हा चेहरा दिल्ली, नोएडा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत खेळताना दिसणार आहे. तर या निवडीने विविध स्तरावर अद्वैत जाधव याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### भोंदूकडून महिलेवर बलात्कार

पुणे, दि. ३१ : प्रतिनिधी

दैवीशक्ती प्राप्त झाल्याची बतावणी करुन एका भोंदूने महिलेवर चाकुच्या धाकाने बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांनी भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि महिलेची ओळख होती. दैवीशक्ती अवगत आहे, तसेच माझ्या अंगात संचार होतो, असे सांगून भोंदूने महिलेला जाळ्यात ओढले. त्यानंतर आरोपी महिलेच्या घरी आला. महिला आणि तिची दोन मुले घरात होते. भोंदूने महिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना नुकतीच घडली. घाबरलेल्या महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक सावंत तपास करत आहेत.

# आमदारांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर भिवंडीत आरटीओची दखल; 25 रिक्षा जप्त

भिवंडी, दि. ३१ : प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यापासून शहरातील विविध भागात होणारी वाहतूक कोंडी आणि अपघात या समस्येवर मार्ग काढण्यासाठी महानगरपालिकेचे आयुक्त आणि वाहतूक पोलीस विभाग यांना वारंवार सूचना करूनही उपायोजना होत नाही.या पत्रकारांशी बोलताना आमदार महेश चौघुले यांनी येत्या १५ जानेवारीपर्यंत सुधारणा न झाल्यास भिवंडीकर नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.त्याची दखल घेत शनिवारी २८ डिसेंबर रोजी भिवंडीत ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी दाखल होत शहरात ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करून त्यांनी विना कागदपत्रांच्या व्यवसाय करणाऱ्या २५ रिक्षा जप्त केल्या. भिवंडी शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्याच्या निमित्ताने उपाययोजना करण्यासाठी शहरातील वाहतूक विभागाच्या कार्यालयात आमदार महेश चौघुले यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (२६ डिसेंबर) रोजी मिटिंग घेण्यात आली होती. या मिटिंगमध्ये ठाणे वाहतूक पोलीस विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ, भिवंडी वाहतूक विभागाचे सहा. पोलीस आयुक्त शरद ओहोळ, पोलीस निरीक्षक सुधाकर खोत, भिवंडी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, समाजसेवक अशोक जैन आणि माजी नगरसेवक श्याम अग्रवाल यांच्यासह भिवंडीकर नागरिक उपस्थित होते.यावेळी भिवंडी शहरात येण्यासाठी व शहराबाहेर जाण्यासाठी अंजूरफाटा ते नदीनाका आणि कल्याणरोड ते



साईबाबा बायपास हे दोन रहदारीचे प्रमुख मार्ग असून या मार्गावर नेहमी वाहतूक कोंडी होत असते. हि वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आमदार महेश चौघुले यांनी वाहतूक विभागाला विविध सूचना करून कामात सुधारणा करून निर्णय घेण्यास सांगितले.तसेच उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी बेशिस्त वाहनचालकांवर नियंत्रण आणण्यासाठी सकाळी आणि सायंकाळी वाहतुकीच्या ठिकाणी अधिकचे कर्मचारी ठेवण्याच्या सूचना त्यांनी स्थानिक वाहतूक अधिकाऱ्यांना केल्या.तसेच वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांनी पुढाकार घ्यावा तसेच स्थानिक नागरिकांनी देखील त्यांना सहकार्य करावे,असे सांगितले.या मीटिंगमध्ये घेतलेल्या उपाययोजनेचा आढावा १५ जानेवारीपर्यंत घेण्यात येणार असून त्यानंतर सुधारणा न झाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आमदार महेश चौघुले यांनी दिला.यावेळी नदिनाका ते अंजूरफाटा आणि कल्याणरोड ते साईबाबा बायपास हे मार्ग अरुंद असल्याबाबतच्या विषयाबाबत आमदार यांना पत्रकारांनी छेडले असता आमदार चौघुले यांनी सांगितले कि, या मार्गावरील अतिक्रमणे हटवून त्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.यासाठी मनपा आयुक्तांना वारंवार सूचना करूनही त्यांनी नागरिकांच्या या समस्येकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे.यानंतर शनिवारी रोजी भिवंडीत ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी भिवंडीत दाखल झाले आणि त्यांनी जकातनाका,तीनबत्ती, वंजारपाटी नाका आणि एस. टी. स्थानक या ठिकाणी रिक्षांची सक्तीने तपासणी करीत विनाकागदपत्रे असलेल्या २५ रिक्षा जप्त करून त्या एस. टी. स्थानकातील दुरुस्ती विभागाच्या जागेत ठेवल्या असून त्या रिक्षा स्क्रॅबमध्ये काढणार असल्याची माहिती सूत्राने दिली.त्यामुळे अवैध वाहन चालविणाऱ्या चालक आणि मालकांमध्ये घबराट पसरली आहे.

## परवडणाऱ्या घरांमध्ये अहमदाबाद पहिले, पुणे दुसरे तर मुंबई सगळ्यात शेवटी!

पुणे, दि. ३१ : प्रतिनिधी

देशात सर्वाधिक परवडणारी घरे यंदा गुजरातमधील अहमदाबाद शहरात आहेत. त्याखालोखाल पुण्याचा दुसऱ्या क्रमांक असून, मुंबईतील घरे महाग असल्याने या शहराचा शेवटचा क्रमांक लागला आहे.

घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याच्या गुणोत्तरावरून परवडणारी घरे असलेल्या शहरांची क्रमवारी नाइट फ्रँक इंडियाने जाहीर केली आहे. यात देशातील मुंबई, पुणे, दिल्ली, कोलकाता, बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई आणि अहमदाबाद या शहरांचा समावेश आहे. यानुसार, देशात सर्वाधिक परवडणारी घरे अहमदाबादमध्ये आहेत. तिथे घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण २० टक्के आहे. यात पुणे दुसऱ्या आणि कोलकाता तिसऱ्या क्रमांकावर आहेत. तिथे घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण अनुकमे २३ टक्के आणि २४ टक्के आहे.

देशात परवडणाऱ्या घरांमध्ये मुंबईचे स्थान शेवटचे आहे. मुंबईत घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाचे प्रमाण ५० टक्के आहे. घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत मासिक हप्त्याचे प्रमाण जेवढे कमी असेल, तेवढी घरे जास्त परवडणारी असतात. मुंबईतील घरे परवडण्याच्या बाबतीत काठावर आहेत. परवडणाऱ्या घरांमध्ये चेन्नई चौथ्या स्थानी, बंगळुरू व दिल्ली संयुक्तपणे पाचव्या स्थानी आणि हैदराबाद सहाव्या स्थानी आहे. या चारही शहरांमध्ये घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत आहे, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

**परवडणारी घरे कशी ठरवितात?**

परवडणारी घरे ठरविताना त्या शहरातील घरांची सरासरी किंमत विचारात घेतली जाते. त्यातील ८० टक्के गृहकर्ज रक्कम आणि कर्जाची मुदत २० वर्षे धरून मासिक हप्ता निश्चित केला जातो. त्या शहरात एका कुटुंबाला सरासरी घरगुती उत्पन्नापैकी किती टक्के रक्कम मासिक हप्त्यासाठी द्यावी लागते, त्यावरून परवडणारी घरे ठरविली जातात. सर्वसाधारणपणे उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाचा मासिक हप्ता ४० टक्के असावा. हा हप्ता उत्पन्नाच्या तुलनेत ५० टक्क्यांवर गेल्यास बँकाही गृहकर्ज देत नाहीत.

## पडघा टोल नाक्यावर वाहनांच्या दीड किलोमीटर रांगा

### टोल कर्मचाऱ्यांची खासदार बाळ्या मामा म्हात्रेंकडून खरडपट्टी

कल्याण, दि. ३१ : प्रतिनिधी





मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा टोल नाक्यावर वाहनांच्या दोन्ही बाजुने दीड ते दोन किलोमीटर रांगा लागल्या आहेत. सुट्टीचा दिवस आहे. नागरिक अधिक संख्येने बाहेर पडले आहेत, हे माहिती असुनही पडघा टोल नाक्यावरील कर्मचारी टोल घेण्याचे काम संथगतीने करत असल्याचे रविवारी रात्री कल्याण लोकसभेचे खासदार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांच्या निदर्शनास आले. याच रस्त्याने जात असलेल्या खासदारांना टोल नाक्यावरील कोंडीचा फटका बसला. यामुळे संतप्त झालेल्या खासदार म्हात्रे यांनी वाहनातून उतरून पडघा टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांना जलदगतीने काम करण्यास सांगून वाहनांच्या रांगा कमी करण्यासाठी खडसावले.

पडघा टोल नाक्याच्या दोन्ही बाजुला वाहनांच्या रांगा लागल्या आहेत हे माहिती असुनही आपण संथगतीने काम करताच कसे. ही वाहने पटापट सोडण्याचे आपले काम नाही का, असे प्रश्न खासदार बाळ्या म्हात्रे यांनी टोल कर्मचाऱ्यांना केले. सुट्टीनिमित्त नागरिक अधिक संख्येने घराबाहेर पडले आहेत. काहींना पर्यटनस्थळी जायचे असेल. असे लोक तेथे पोहचणार कधी, असा सवाल खासदारांनी केला.

रविवारी रात्री खासदार बाळ्या मामा म्हात्रे मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा टोल नाका येथून जात होते. त्यांना रस्त्याच्या दोन्ही बाजुला टोल वसुलीमुळे दीड किलोमीटरच्या रांगा लागल्याचे दिसले. त्यांचेही वाहन या टोल नाक्यावरील कोंडीत अडकले. टोलनाक्यावरील कर्मचारी टोल वसुलीचे काम अतिशय संथगतीने करत असल्याचे निदर्शनास आल्यावर खासदार बाळ्या मामा म्हात्रे त्यांच्या वाहनातून खाली उतरले. त्यांनी टोल वसुली चौकीतील कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. तुम्ही लोक अतिशय संथगतीने काम करता म्हणून टोल नाक्याच्या दोन्ही बाजुला रांगा लागल्या आहेत. हे तुम्हाला दिसत नाही का. टोल वसुली करून तुम्ही लोकांना उगाच कोंडीमध्ये अडकवता, अशा शब्दात खासदारांनी टोल कर्मचाऱ्यांना खडसावले.

खासदारांच्या आक्रमक भूमिकेमुळे टोल नाक्यावरील रांगेत अडकलेल्या प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. खासदारांच्या आक्रमक पवित्र्यानंतर मात्र टोल कर्मचारी सतर्क झाले. त्यांनी टोल शुल्क वसुली सयंत्रावरील हात गतीने चालवून टोल नाक्यावरील वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी प्रयत्न केले.

'नववर्षानिमित्त अधिक संख्येने नागरिक पर्यटनासाठी बाहेर चालले आहेत. काही बाहेरगावाहून येत आहेत. रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली आहे. त्याचा भार टोल नाक्यावर येत आहे. टोल नाक्यावरील टोल शुल्क पावती देणारे सयंत्र काम करते त्याप्रमाणे आम्ही काम करतो. याठिकाणी संथगतीने काम करण्याचा प्रश्न नाही,' असे टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी सांगितले.

## येळकोट येळकोट जय मल्हार! सोमवती अमावास्येनिमित्त जेजुरीत लाखो भाविकांची हजेरी

जेजुरी, दि. ३१ : प्रतिनिधी

मार्गशीर्ष महिन्यातील आणि या वर्षातील शेवटची सोमवती अमावस्या असल्याने जेजुरीत आज सुमारे चार लाखावर भाविकांनी कुलदैवत खंडोबाचे दर्शन घेतले. रांगेत उभे राहून भाविक दर्शन घेत होते. सदांनदाचा जयघोष आणि भंडारा खोबऱ्याची मुक्त हस्ताने उधळण करीत यात्रा पूर्ण करीत होता. या वर्षातील शेवटची यात्रा, पुढील सण २०२५ मध्ये एकही सोमवती यात्रा नसल्याने भाविक मोठ्या संख्येने देवदर्शन करण्यासाठी काल रविवार पासूनच जेजुरीत येत होता.

रविवारी उत्तररात्री पहाटे ४ वा. सोमवती आमवस्येला प्रारंभ होत असल्याने ग्रामस्थांनी भर सोमवती यात्रेचा निर्णय घेतला होता. संपूर्ण दिवसभर अमावस्या असल्याने भाविक जेजुरीत मिळेल त्या वाहनाने येत होते. दुपारी १ वाजता पेशव्यांच्या आदेशाने देवाच्या उत्सव मूर्तींचा



पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी काढण्यात आला. यावेळी देव संस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त मंगेश घोणे, पोपट खोमणे, अनिल सौन्दडे, डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड विश्वास पाणसे, ॲड पांडुरंग थोरवे उपस्थित होते.

गडकोटातील मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालून सोहळ्याने कऱ्हा स्नानासाठी कूच केले. यावेळी देव संस्थानच्या वतीने बंदुकीची फैरी झाडून सलामी देण्यात आली. गडातील, व गडकोटाच्या सज्जातील भाविकांनी 'येळकोट येळकोट जय मल्हार' , तसेच 'सदांनंदाचा येळकोट' चा जयघोष करीत भंडार खोबऱ्याची मोठ्या प्रमाणावर उधळण करीत देवाला मान दिला. संपूर्ण गडकोट पिवळ्या जर्द भंडाऱ्यात न्हाऊन निघाला होता.

तळपत्या सूर्य देवाला साक्षी ठेवत पालखी सोहळा गड कोटातून कऱ्हा स्नानासाठी बाहेर पडला. खांदेकरी, मानकऱ्यांनी उत्सव मूर्तींची वजनाने खूप जड असणारी पालखी आपल्या खांद्यावर लीलया पेलत गडावरुन शहरातील मुख्य नंदी चौकात आणली. तेथून ऐतिहासिक चिंच बागेतील होळकर मंदिराचा मान घेऊन जांनुबाई चौकं मार्गे शिवाजी चौकात सोहळा आला. तेथून कोथळे रस्त्याने सोहळ्याने कऱ्हा नदीकडे कूच केले. भेसळयुक्त भंडारा बंदी आणि महाद्वार पथावरील अतिक्रमणे हटवाल्याने भाविकांनी मोकळा श्वास घेतला. समाधान व्यक्त केले.

## सायन-पनवेल महामार्ग आणि शहरातील मुख्य रस्त्यांवर डीप क्लीनिंग मोहीम



नवी मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी

स्वच्छ नवी मुंबई शहर सर्व दृष्टीने स्वच्छ असावे याकरिता दररोजच्या नियमित स्वच्छतेप्रमाणेच शनिवार व रविवार या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष यांच्या वतीने दुर्लक्षित व पडीक जागांची तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारीत नसलेल्या सायन पनवेल महामार्गावर सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पदपथांच्या कडेला घट्ट झालेली माती तसेच झाडांच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्या आणि पालापाचोळा यांची बारकाईने स्वच्छता करण्यात आली.

नेरूळ येथील एलपी जंक्शनपासून नेरूळ रेल्वे स्टेशन आणि नेरूळ रेल्वे स्टेशन ते हावरे जंक्शन तसेच हावरे जंक्शन ते अपोलो जंक्शन अशा सर्व बाजूंच्या मुख्य रस्त्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे सायन पनवेल हायवेवरही साफसफाई करण्यात आली. विशेष म्हणजे पालापाचोळा व कचरा उचलून झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अत्याधुनिक फॉगर्स मशीनद्वारे स्वच्छ केलेले पदपथ, रस्ते आणि दुर्लक्षित जागा पाणी मारून स्वच्छ करण्यात आल्या. महत्त्वाचे म्हणजे यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रातून शुद्ध केलेल्या प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात आला. अशाप्रकारे फॉगर्स वाहनाद्वारे रस्ते सफाई केल्याने हवेतील धुळीचे प्रमाण कमी होऊन प्रदूषणही कमी होणार आहे. अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम तुर्भे विभाग कार्यालय परिसरातही राबविण्यात आली. नियमित स्वच्छतेप्रमाणेच अशा प्रकारच्या डीप क्लिनिंग मोहिमा राबवून नवी मुंबई परिसरातील सर्वांगीण स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे.

## व्यवस्थेला थेट प्रश्न विचारणाऱ्या "आंबेडकरी आई" या अभिनव ग्रंथाचे प्रकाशन

मुंबई, दि. ३१ : प्रतिनिधी



आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेल्या आणि समग्र व्यवस्थेला थेट प्रश्न विचारणाऱ्या "आंबेडकरी आई" या अभिनव ग्रंथाचे शनिवारी मोठ्या दणक्यात प्रकाशन झाले. या ग्रंथात ४२ मुलींनी त्यांच्या आईने आंबेडकरी मूल्यांच्या आधारे त्यांना कसे घडवले, याचे सत्यकथन आहे. या निमित्ताने आंबेडकरी स्त्री संघटनेने आंबेडकरी आई या नव्या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली आहे.

डॉ. आंबेडकर वाङ्मयीन अभ्यास मंडळ आणि आंबेडकरी स्त्री संघटनेच्या पुढाकाराने दादरच्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात माजी कुलगुरू अर्थतज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सिसिलिया कार्व्हालो, डॉ. प्रज्ञा पवार, डॉ. अजित मगदुम यांच्या उपस्थित या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. ज्येष्ठ लेखिका प्रा. आशालता कांबळे, डॉ. श्यामल गरुड यांनी 'आंबेडकरी आई' पुस्तक संपादित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरीत झालेल्या स्त्रिया स्वत: कशा जगल्या, गरिबी असूनही त्यांनी कसे दिवस काढले आणि आपल्या मुलांना कसं घडवले याचा पट ४२ मुलींनी या ग्रंथात मांडला आहे.

या ग्रंथात दिसणाऱ्या आईचे मातृत्व हे जैविक मातृत्वापासून सामाजिक मातृत्वापर्यंत सामावलेले आहे. हे फक्त आईचं चरित्र नसून ते आजी, पणजीचं चरित्र आहे. आंबेडकरी आई या नावातच संघर्षाचा पट आहे. या आईंनी आपल्या लेकींना जीवनाचे सत्व, तत्व दिले. आंबेडकरी आईचा प्रवास हा मनुस्मृतीपासून संविधानसंस्कृती पर्यंतचा आहे. हे केवळ स्मृतीरंजन नाही असे प्रतिपादन डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी यावेळी केले.

तर आपल्या भाषणात डॉ. अजित मगदुम म्हणाल्या की, आईविषयी लिहायचं म्हटलं की भावनिकता येते. पण हे लेखन भावनिकतेने लिहिलेले नसून तटस्थपणे वास्तव मांडणी आहे. या आंबेडकरी आईंनी आपल्या नैतिक विचारातून, व्यावहारिक शहाणपणातून सामाजिक चारित्र्याचा वस्तुपाठ ठेवला आहे. तो सर्व समाजाला दिशादर्शक ठरेल.

डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी आमच्यासाठी शिक्षण म्हणजे अक्षर ओळख नव्हे. गुलामीला उत्तर देण्याची सुरुवात शिक्षणाने होते. याचे भान असणाऱ्या या आई आहेत, असे प्रतिपादन केले.

तर आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आंबेडकरी आईत आत्ममग्नता नाही, असे सांगून दलित सहित्याचे हे पुढचे स्थित्यंतर आहे असा गौरव केला. अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय ग्रंथांचा संदर्भ देत या ग्रंथाचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले. दलित साहित्यातील साचलेपण या पुस्तकाने दूर केले आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

दरम्यान, ग्रंथाच्या संपादिका प्रा. आशालता कांबळे यांनी या ग्रंथाची संकल्पना मांडली. नंदा कांबळे आणि सुरेखा पैठणे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केले. कार्यक्रमात प्रणेश वालावलकर यांनी रेखाटलेले प्रत्येक आईचे रेखाचित्र पडद्यावर दाखवण्यात आले. या कार्यक्रमाला पुस्तकात वर्णन केलेल्या अनेक आईंनी उपस्थिती लावली होती. यात उर्मिला पवार, हिराताई बनसोडे, हिराताई पवार याही उपस्थित होत्या. याशिवाय ज्योती म्हापसेकर, ज. वि, पवार, सुरज येंगडे, डॉ. श्रीधर पवार यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. दीक्षा राजेश शिर्के आणि वैभवी अडसूळ यांनी आपल्या गाण्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

## पुणे ते अहिल्यानगरसह शिर्डी, नाशिक या नवीन रेल्वेमार्गांच्या सर्वेक्षणास मान्यता

पुणे, दि. ३१ : प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून बहुप्रतीक्षित पुणे ते अहिल्यानगर (अहमदनगर), साईनगर शिर्डी ते पुणतांबा आणि साईनगर शिर्डी ते नाशिक या तीन रेल्वेमार्गांच्या सर्वेक्षणास रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्यता दिली आहे. तसेच नगर शहर - पुणे - नाशिक दरम्यानची रेल्वे जोडणी सुधारण्यासाठी २४८ किमी लांबीच्या दौंड - मनमाड मार्गाच्या दुहेरीकरणास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे एकूण २४८ किमीपैकी १७८ किमीचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित ७० कि. मी.चे काम प्रगतीपथावर आहे. याशिवाय तीन नवीन दुहेरी रेल्वेमार्गांना केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. नाशिक - साईनगर शिर्डी (८२ किमी), पुणे - अहमदनगर (१२५ किमी) दरम्यान नवीन दुहेरी ट्रॅक आणि साईनगर शिर्डी - पुणतांबा (१७ किमी) दरम्यान नवीन दुहेरी ट्रॅक अशा तीन रेल्वे प्रकल्पांसाठी सर्वेक्षणास मान्यता देण्यात आली आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर डीपीआर (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट) तयार करण्यात येणार आहे.

# प्लास्टिक कोटींग डिश, कप, ग्लास विक्रीवर बंदी

**विक्री, साठा करणाऱ्यांवर मनपा करणार कारवाई**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३१ :** शहरात प्रतिबंधित प्लास्टिक कोटींग असलेले डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर वापर, विक्री, साठा, उत्पादन व वितरण करणाऱ्यांवर होणार कारवाई करण्यात येणार आहे, असे महापालिकेच्या वतीने कळवण्यात आले आहे.

अकोला महापालिका क्षेत्रामध्ये चहा विक्रेत्यांद्वारे चहाकरता छोटे कप वापरण्यात येत आहेत. या कपला आतील भागात प्लास्टिकचे पातळ वेष्टन असल्यामुळे सदर कप्स मधे गरम चहा टाकल्यामुळे आतील मायक्रो प्लास्टिक वितळून या मायक्रो प्लास्टिकचे लाखो कण पोटात जातात त्यामुळे कॅन्सरसारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. तसेच चहा, ज्युस, लस्सी, पाणी आदीकरिता प्लास्टिकचे पातळ वेष्टन असलेले कागदी कपमुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती होत असून, यामुळे नालेही तुबंल्याचे चित्र शहरात आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, अधिसूचना १५ जुलै २०२२ नुसार प्लास्टिक लेपित तसेच प्लास्टिक थर असणाऱ्या पेपर/अल्यमिनियम आदी पासून बनवलेल्या डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर आदी एकल वापर उत्पादनांवर बंदी असल्याने संबंधित प्लास्टिक उत्पादक, वितरक, साठवणूकदार, विक्रेते, हॉटेल व्यवसायीक, चहा, ज्युस इत्यादि विक्रेते यांनी अशा प्रतिबंधित वस्तूंचा वापर, विक्री, साठा, उत्पादन व वितरण करु नये. कोणत्याही व्यावसायिकांकडे कोणत्याही प्रकारचे प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्यास त्यांच्याविरुद्ध प्रथमतः आढळल्यास त्यांच्यावर ५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई, दुसयांदा आढळल्यास १० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई तसेच तिसयांदा आढळल्यास त्यांच्यावर २५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई आणि नियमानुसार कारवाई प्रस्तावीत करण्यात येणार आहे. शहरातील सर्व प्रकारच्या व्यावसायिकांनी याची नोंद घेऊन शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिकचा वापर, विक्री, साठा, उत्पादन व वितरण संपूर्णपणे बंद करून अकोला महापालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

# माळी समाज वधू-वसरिचय मेळावा

**६८८ जणांचा सहभाग**




■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३१ :** माळी समाज सेवा बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने माळी समाजाच्या राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळावा खडकी येथील छत्रपती शिवाजी महाराज पटांगणाच्या बाजूला आयोजित करण्यात आला. मेळाव्यात ६८८ युवक-युवतींनीरिचय करून दिला. श्रम व पैसा वाचवण्यासाठी परिचय मेळावे होणे, ही काळाची गरज असल्याचे मत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा संगीता अढाऊ यांनी व्यक्त केले.

मेळाव्यासाठी आधी समाजातील इच्छुक १४०० मुला-मुलींची नोंदणी झाली होती. मेळाव्याच्या ठिकाणी नवीन तीनशे जणांनी नोंदणी केली. अतिथींचे स्वागत महात्मा ज्योतिराव फफुले, सावित्रीबाई फफुले यांची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले. राज्यभरातून १५ हजारांवर बांधव मेळाव्यात सहभागी झाले होते. मेळाव्यात माजी आमदार तुकाराम बीडकर, माजी आमदार बळीराम सिरस्कार, ओबीसी नेते संतोष हुशे, ओबीसी महामोर्चाचे कार्याध्यक्ष ॲड. संतोष रहाटे, महेश गणगणे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अर्थ मंत्रालयातील वरिष्ठ कक्ष अधिकारी प्रशांत वानखडे, माजी महापौर अर्चना मसने, अध्यक्ष डॉ. वामनराव वानखडे, जिल्हा उपनिबंधक अधिकारी प्रवीण लोखंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन विनोद इंगळे, ज्योती इंगळे, साक्षी काळे यांनी केले. प्रास्ताविक मेळाव्याचे अध्यक्ष प्राचार्य गजेंद्र काळे यांनी तर आभार मेळाव्याचे कार्याध्यक्ष मनीष हिवराळे यांनी मानले.

# रासेयो शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पातूर, दि. ३१ :** पातूर तालुक्यातील आस्टुल येथील सिद्धार्थ विहार उच्च माध्यमिक विद्यालय पास्टूल राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात व्यक्तिमत्त्व विकास आणि सोशल मीडियाचा वाढता वापर यावर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. विनय खंडारे होते. याप्रसंगी अकॅडमीचे सहसचिव अविनाश पोहरे यांनी समाजातील सोशल मीडिया बद्दल कोणती काळजी घ्यावी, समाजाला बळकट करण्यासाठी कसा उपयोग करू शकतो, याबाबत मार्गदर्शन केले.तत्पूर्वी ग्रामीण युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते सतीश हातोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या वयात चांगले शिक्षण घेऊन स्वतः चा आदर्श निर्माण करून वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले. समाजातील वाढती फफसवणूक कशी होते आणि त्या अनुषंगाने आपण कसे दक्ष राहावे , याबाबत बौद्धिक सत्रामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. प्रवीण इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन तेजस्विनी घुगे, समीक्षा इंगळे यांनी केले. आभार अनुराधा केकन यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. कीर्ती किरतकर, प्रा. संगीता इंगळे, प्रा. छाया राठोड, प्रा. विनय खंडारे, प्रा. मंगेश इंगळे, प्रा. योगेश मेहरे, प्रा. सनी इंगळे, गजानन शिंदे, बळीराम वाणी आदीसह शिक्षक-शिक्षिका होते. कार्यक्रम सिद्धार्थ शिक्षण संस्थेचे सचिव शैलेश इंगळे आणि मुख्याध्यापक सिद्धार्थ वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

# समर्थ कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय किसान दिन साजरा



**देऊळगावराजा:** स्थानिक समर्थ कृषी महाविद्यालयात माजी प्रधानमंत्री चौधरी चरण सिंह यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय किसान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे होते. प्रा. मोहजितसिंह राजपूत, रा से यो कार्यक्रम अधिकारी प्रा किरण ठाकरे, प्रा विलास सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी सुरुवातीला चौधरी चरण सिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. प्राचार्य डॉ. मेहेत्रे यांनी यावेळी माजी प्रधानमंत्री चौधरी चरण सिंह यांचे शेतीसाठी असलेले योगदान व कृषी शिक्षणात असलेला सहभाग याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. अन्य मान्यवरांनीही मनोगत वक्त केले. या कार्यक्रमास प्रा. सचिन सोळंकी, प्रा. विजय पवार, प्रा. विकास म्हस्के, प्रा. संदीप टेकाळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

# दोन्ही जावांनी पाठोपाठ घेतला अखेरचा श्वास

**बोरगावमंजू:** जाऊ आणि जेठाणी यांनी आयुष्य सोबत काढले. ८०-८२व्या वर्षी अखेरचा श्वासही त्यांनी पाठोपाठ घेतल्याची हृदयद्रावक घटना अकोला शहरातील लहान उमरी येथे सोमवारी घडली. या जाऊ जेठाणी यांची अंत्ययात्राही सोबत निघाली होती. सोमवारी सायंकाळी त्यांच्यावर उमरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले. जेठाणी वत्सलाबाई मोतीराम खंडारे (८२) तसेच जावू भागीरथीबाई जोतिराम खंडारे (८०)असे दोघींची नावे आहेत.

एकत्र कुटुंबपद्धतीत असल्याने वत्सलाबाई आणि भागीरथीबाई यांनी मोठ्या संस्काराने आणि प्रेमाने एकत्र कुटुंबाचा गाढा ओढला. सुरुवातीच्या काळात परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी संकटावर मात करत आपल्या कुटुंबाचे भरणपोषण केले. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात मजुरी करुन आपली मुले नगरसेवक सुभाष खंडारे, छगन खंडारे, शीलाबाई सिरसाट, प्रकाश खंडारे, रामचंद्र खंडारे व उषाबाई वानखडे यांना उच्चविद्या विभुषितही केले. दोघीही अखेरपर्यंत मैत्रिणीसारख्या राहिल्या. अखेरचा श्वासही त्यांनी सोबतच घेत जेठानी वत्सलाबाई व जावू भागीरथीबाई या दोघींनी ३० डिसेंबरला दोन तासाच्या फफरकाने जगाचा निरोप घेतला. त्यांच्या निधनाची बातमी वा ?यासारखी पसरताच परिसरात व नातेवाईकही हळहळले. त्यानंतर या दोघींचेही अंत्यसंस्कार सोबतच करण्याचे ठरले. त्यानुसार दोघी जेठाणी व जाऊ यांची एकच अंत्ययात्रा निघाली. त्यांची निघालेली अंत्ययात्रा पाहून अनेकांचे मन हेलावले. दोघींवरही सोबतच उमरी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या अंत्ययात्रेला जिल्ह्यातील गणमान्य व्यक्तींनी हजेरी लावली होती. सोमवारी पहाटे साडेसहाच्या सुमारास लहान जाऊ भगिरथाबाई यांचे निधन झाले.

# वीज ग्राहकांना वेळेमध्ये सेवा न दिल्यास कर्मचाऱ्यांना आर्थिक दंड

**महावितरणचे संचालक अरविंद भादीकर यांनी घेतली आढावा बैठक**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ३१:** केंद्र शासनाच्या 'इझ ऑफफ लिव्हिंग' (राहणीमान सुलभता) अभियानानुसार वीज ग्राहकांना राज्य वीज नियामक आयोगाने निश्चित केलेल्या मानकानुसार उत्तम आणि निश्चित वेळेत सेवा देणे आणि त्या सेवेत सातत्य राखणे, ही महावितरणची जबाबदारी आहे. हे लक्षात घेऊन काम करा. ही सेवा ग्राहकांना निश्चित कालावधीत न मिळाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्याला जबाबदार धरून त्यांना आर्थिक दंड ठोठावण्यात येणार आहे. तसेच वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे, ग्राहक सेवेत गुणात्मक सुधारणा करणे, ग्राहकाभिमुख विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना शंभर टक्के वीज बिल वसुली करण्याचे निर्देश महावितरणचे संचालक (संचालन) अरविंद भादीकर यांनी दिले.

विद्युत भवन येथे शुक्रवारी झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, एसई दीपक देवहाते, एसई प्रवीण दरोली, एसई दीपाली माडेलवार यांच्यासह विभाग प्रमुख, कार्यकारी अभियंते, व्यवस्थापक वित्त व लेखा, शहर विभागातील उपविभागीय अधिकारी उपस्थित होते. या वेळी भादीकर म्हणाले, की वितरण हानी कमी करण्यासाठी महावितरणने ठरवून दिलेल्या कृती आराखड्यानुसार काम होणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्राहकांना वापरानुसार अचूक वीज बिल देणे, ग्राहकांचे नादुरूस्त मीटर बदलणे, वीज चोरीला आळा घालण्यासाठी नियमित ग्राहक -मीटर तपासणी मोहीम राबवणे, वीज चोरी असलेल्या क्षेत्रात इन्सुलेटेड वीज वाहिनींचा वापर करणे, ग्राहकांना तत्काळ वीज जोडणी देणे, ग्राहकांच्या खंडित वीजपुरवठा, देयक दुरुस्ती इत्यादी तक्रारींचे त्वरित निवारण करणे आदींचा समावेश आहे. कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांसाठी महावितरणने 'अभय योजना' जाहीर केली असून, त्यामध्ये संपूर्ण व्याज व विलंब आकाराची माफी असूनही ग्राहक प्रतिसाद मिळत नसल्याने सर्व थकबाकीदार पीडी ग्राहकांची प्राधान्याने तपासणी करणे, अनधिकृत वीज पुरवठा आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करणे, अन्य ग्राहकाच्या नावाने त्या जागेवर नवीन कनेक्शन दिलेले आढळल्यास जुनी थकबाकी त्या नवीन ग्राहकांकडे वळती करणे, तसेच विभागवार पथके तयार करून वीज चोरी पकडणे, पीडी ग्राहकांच्या ठिकाणी विजेचा वापर होत नसल्यास अथवा संबंधित इमारत ढासळली असल्यास त्या जागेवर असलेलर महावितरणची थकबाकी भरणे जुन्या किंवा नवीन ग्राहकास अनिवार्य असल्याचे सूचनाफफलक लावण्याचे निर्देश दिले. महावितरणने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे प्रत्येक वीज वाहिनीला लावण्यात आलेल्या अत्याधुनिक मीटरमुळे २४,७ माहिती उपलब्ध होत आहे. त्यानुसार विशिष्ट कालावधीत विशिष्ट वाहिनीचा किंवा भागाचा वीज पुरवठा किती वेळा खंडित झाला याची माहिती थेट वरिष्ठ कार्यालयाला उपलब्ध होणार असल्याने वीज खंडित होण्याच्या घटना यापुढे कमी होऊन याचा फायदा सुरळीत वीज पुरवठ्यासाठी होणार आहे. यासह इतर महत्वाच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकायांना दिल्य आहेत. या प्रकाराबाबत संचालकांची नाराजी वीज गळती कमी करण्याच्या दृष्टीने या वर्षी अमरावती जिल्ह्यात ११२४३ नादुरुस्त मीटर बदलण्याचे काम सोडले तर वीज चोरीला आळा घालण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवणे, वीज चोरी पकडणे, गुन्हे दाखल करणे, अत्यल्प तसेच सरासरी वीज बिल असलेल्या ग्राहकांची तपासणी करणे, याबाबत विशेष प्रयत्न झाले नसल्याने संचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

# कृषी कुंभमेळ्यात अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा जागर

**शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद?**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ३१ :** रयेथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रकल्प (आत्मा) यांच्या संयुक्त सहकार्याने डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठ क्रीडांगणावर आयोजित 'ॲग्रोटेक' कृषी प्रदर्शनाला शेतकरी बांधव, महिला शेतकरी, ग्रामीण भागातील तरुण व विद्यार्थांचा प्रतिकुल हवामानात उदंड प्रतिसाद लाभत आहे. रविवारी, २९ डिसेंबर प्रदर्शनाचा शेवटचा दिवस आहे. 'ॲग्रोटेक' मध्ये एकूण ५ डोम उभारले असून, पहिल्या डोममध्ये कृषी विद्यापीठांची विविध शोभिवंत, आकर्षक पुष्प प्रदर्शन कौशल्यपूर्ण बोन्सायसह थाटली आहे. द्वितीय डोममध्ये विद्यापीठाच्या विविध विभागांची तंत्रज्ञान दालने थाटली आहेत. यामध्ये एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, शास्त्रोक्त कापूस लागवड तंत्रज्ञान प्रदर्शित केली आहे. विषमुक्त शेतीला अधिक प्रोत्साहन देत सेंद्रिय, नैसर्गिक शेतीचा पुरस्कार करून विषमुक्त शेती प्रमुख आकर्षण ठरले आहे. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर आधारित शेती ही प्रदर्शनाची प्रमुख संकल्पना असून, त्यात पिक वाण, तांत्रिक शिफारशी पुरते मर्यादित न राहता शेती पूरक व्यवसाय, एकात्मिक शेती व्यवस्थापन ज्यात पशुपालन, जातिवंत गायी, म्हशी, कोंबड्या, बकरी व बदक पालनासह चारा उत्पादन, कमी प्रतीच्या चाऱ्याची मूल्यवृद्धी, दुग्धपदार्थ निर्मिती व विक्रीचा समावेश आहे. फफळ प्रक्रिया उद्योगात जाम, जेली, स्क्वश, मार्मालेड, सिरप व लोणचे आदीसह जांभूळ, केळी, संत्री, लिंबू, सीताफळ, पपई, पेरू, आवळा आदी फळ पिकांचे मूल्यवृद्धी साधण्याचे तंत्र अभ्यासण्यासाठी प्रदर्शनार्थींचा प्रतिसाद लाभत आहे. च अभिनव शेती अवजारे, यंत्रे, सूक्ष्म सिंचन पद्धती, ट्रॅक्टर, कापणी पश्चात मूल्यवर्धन करणारे संयंत्र ज्यात पीकेव्ही मिनी दाल मिल, सीताफळ गर काढणी यंत्र, मिरची बीज निष्कासन यंत्रासह इतर अनेक यंत्रे शेतकऱ्यांचे कुतुहल वाढवत आहेत. ग्रामबीजोत्पादन, सेंद्रिय शेती, एकात्मिक अन्नद्रव्य व तण व्यवस्थापनाचे तंत्र जाणून घेण्यासाठी शेतकरी गर्दी करत आहेत. तर एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञान, फळबाग, फुलशेती, भाजीपाला लागवड तंत्रज्ञान, शेती पूरक व्यवसायांचे विविध व उपलब्ध संसाधनावर आधारित फायदेशीर तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन पद्धती, पाणलोट व्यवस्थापन, औषधी व सुगंधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान, रोप वाटिका, फळे व दुग्ध प्रक्रिया उद्योग आदी तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. कोरडवाहू पिकासाठी 'हवामान लवचिक आंतरपीक पद्धती' याचे तंत्रज्ञान प्रदर्शित केले आहे. इलेक्ट्रीक बैलाचे प्रदर्शनात आकर्षण ॲग्रोटेक कृषी प्रदर्शनातील मालेगाव (जि. वाशीम) येथील अनिल कृषी सेवा केंद्राच्या स्टॉलवर 'इलेक्ट्रीक बैल' उपकरण पाहण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी होत आहे. नांगरणी सोडून पंजी, वखरणी, पेरणी,डवरणी, फवारणी आदी शेतीकामासाठी उपयुक्त आहे. शेतात बैल करत असलेली ९९ टक्के कामे या इलेक्ट्रीक बैलाच्या सहाय्याने करणे शक्य आहे. रात्री तीन तास चार्जिंग केले की आठ तास हा इलेक्ट्रीक बैल काम करु शकतो. ४ लाखाचा हा इलेक्ट्रीक बैल आहे. त्यात शेतकऱ्याला दीड लाख अनुदान आहे तर 'पोकरा' योजनेत गाव असलेल्या शेतकऱ्यांना ६० ते ७० टक्के सबसिडी हे यंत्र खरेदी करणाऱ्याला आहे, अशी माहिती विक्रेते सदानंद व चंद्रकांत गायकवाड यांनी दिली.

# अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी

**वाहनचालकांना त्रास: फफुटपाथवर ताबा**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुसद, दि. ३१ :** पुसद शहरातील मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. येथील नगरपालीका प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलिसांच्या मदतीने काही वर्षांपूर्वी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली होती. यानंतर आता पुन्हा फुटपाथवर दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे.

बसस्थानकासमोर व छत्रपती शिवाजी महाराज चौकात सिग्नलवर वाहने थांबल्यानंतर अरुंद रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत असल्याने नागरिकांना त्रास होत आहे. बसस्थानकासमोरील अतिक्रमण धारकांनी फूटपाथचा ताबा घेतला आहे. मध्यवर्ती बाजारपेठेपासून ते बसस्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावर दिवसभरात कधीही वाहतुकीची कोंडी होते. फुले चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मार्गक्रम करताना वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागते. फुटपाथवरील अतिक्रमणे दुकानदार हटवत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडी होण्याचे मुख्य कारण म्हणजे अतिक्रमण आहे. बाजारातील दुकानदार आपल्या दुकानासमोर ३ ते ५ फूटापर्यंत अतिक्रमण करून आपला माल रस्त्यावर ठेवतात. मुख्य बाजारपेठेतील मार्ग अतिक्रमणाच्या जाळ्यात अडकला आहे. अतिक्रमण हटवल्यास वाहनधारकांचे आर्थिक नुकसान कमी होऊन वेळेचीही बचत होणार आहे. मात्र, वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने तासनतास वाहनधारक त्रस्त राहतात.

# दिव्य सेवा प्रकल्प ग्राम, शहरी अध्ययन शिबिराचा समारोप



**बुलडाणा:** दिव्य सेवा प्रकल्प द्वारे ग्राम शहरी अध्ययन विचार धारा शिबिराचे ३० डिसेंबर पर्यंत आयोजन केले होते. मात्र भारताचे अर्थ तज्ञ, व माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे या शिबिराची सांगता डॉ. मनमोहन सिंग यांच्या जीवनावर मनोगताने करण्यात आली. या शिबिराला उप कार्यकारी अभियंता क्षितिजा गायकवाड, उपकार्यकारी अभियंता विवेक वाघ यांच्या मदतीने दिव्य सेवा प्रकल्पाला रोहित्र मिळाले. आता प्रकल्प २४ तास लाईन राहण्यासाठी आमदार संजय गायकवाड, आणि राज्य विद्युत मंडळाचे सहकार्य लाभले .आज रोजी प्रकल्प मध्ये शेकडो मनोयात्री माता बांधव आश्रयाला आहे. कवी सत्य कुटे, गझलकार नाजीम खान, कवी अजय जाधव,डॉ दीपक केळकर,महिला बाल कल्याण अधिकारी गजानन कुसंबे, डॉ.साधना भवटे यांची उपस्थिती लाभली. युवा महोत्सव जीवन मैत्रीचे ग्राम शहरी अध्ययन शिबिरामध्ये आयुष्यातील सर्वात चांगले आठवणी मिळाल्या असे मनोगत व्यक्त केले.

# बुडालेल्या तरुणाचा मृतदेह अखेर आढळला



■ **महासागर प्रतिनिधी,**
**दिग्रस, दि. ३१ :** शहरातील वाल्मीकनगर जवळील दिग्रस आर्णी बायपास पुलाजवळ धावंडा नदीच्या पात्रात एक तरुण दोन दिवसापूर्वी बुडाल्याची घटना घडल्याने शहरातील नागरिकांची नदी काठी एकच गर्दी उसळली. दोन दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर त्याचा मृतदेह थोड्या अंतरावर नदीच्या पात्रात तरंगताना दिसला. भूषण माणिकराव गावंडे (वय ३०) वर्ष रा. दत्तनगर दिग्रस असे मृतकाचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, शहरातील दत्त नगर येथील भूषण गावंडे हा तरूण दोन दिवसापूर्वी नदी पात्रात बुडाला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी घटनास्थळी बोट व गोताखोराच्या मदतीने दोन दिवस धांवडा नदीत शोध कार्य राबवले. परंतु त्याचा सुगावा लागला नाही. शनिवारी, दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता घटनास्थळावरुन काही अंतरावरच त्याचा मृतदेह तरंगताना दिसला. तेव्हा कुंदन खोडे व मोहम्मद परसुवाले सोबत सहकाऱ्यांनी त्याला पाण्याबरोबर काढले. नेमका तो पाण्यात कसा पडला याबाबत अद्याप कळू शकले नाही. या प्रकरणी आकस्मिक मृत्युची नोंद केली असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

# संतोष देशमुख, सूर्यवंशीच्या मारेकऱ्यांवर कारवाई करा

**संयुक्त न्याय संघर्ष समितीचे आंदोलन**




■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ३१:** बीड-परभणी संयुक्त न्याय संघर्ष समिती अमरावतीच्या वतीने स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक इर्विन येथे एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय देण्याच्या मागणीसाठी झालेल्या या आंदोलनात सामाजिक, राजकीय, पुरोगामी तथा आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

राज्यात गुन्हेगारीच्या घटना वाढलेल्या आहेत. यासाठी सरकारने कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. सरपंच संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी त्यांच्या मारेकऱ्यांना तत्काळ गजाआड करून कठोर शिक्षा द्यावी आणि शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय देऊन त्यांच्या परिवाराला दिलासा द्यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. विविध पदाधिकारी व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनी या वेळी आपले विचार व्यक्त केले. आंदोलनात अरविंद गावंडे, मनीष पाटील, जयंत इंगोले, भैयासाहेब मेटकर, दिनेश देशमुख, नितीन देशमुख, किशोर बोरकर, अंकुश डहाके, अनिकेत देशमुख, सागर देशमुख, बाळकृष्ण आढाऊ, अंबादास काचोळे, ठवरे, कैलास चव्हाण आदी प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान या आंदोलनाला माजी आमदार बच्चू कडू यांनीही भेट दिली आहे.

# मेधाताई 'तिरंग्या'तील 'हिरव्या' रंगाचं करायचं काय?

**पुण्यात सदाशिव पेठेत 'कलर वॉर' रंगलं अन् पुरोगामी महाराष्ट्राला डोक्याला हात लावायची वेळ आली. देशातील, राज्यातील, एवढेच नव्हे तर मेधाताईंच्या पुण्यातील प्रश्न इतके मोठ्या प्रमाणावर आहे की, त्या खासदार असून देखील त्यांची सहा वर्षांची कारकीर्द अपुरी पडेल. परंतु महाराष्ट्रातील जनतेची सध्याची 'मेंटॅलिटी' लक्षात घेऊन त्यांनी आता दिसेल तेथील हिरवा रंग नष्ट करण्याचा पण उचललेला दिसतो. सदाशिव पेठेत एका भिंतीच्या कोपऱ्यात हिरवा रंग देण्यात आला होता. तिथं चादर लावून फुलं चढवण्यात आल्याचा प्रकार समोर आला. हा प्रकार समोर आल्यानंतर मेधाताईंनी स्वत: हिरव्या रंगावर भगवा रंग दिला व त्याठिकाणी गणपतीचा फोटो ठेवला. त्यामुळे पुण्यातील सर्व समस्या सुटल्यातच जमा आहेत. पण आता हिंदू समारंभात हिरव्या साडीला, लग्नात हिरव्या चुड्याला इतकं महत्व दिले गेले आहे, त्याचे काय करायचे? मागील विधानसभेच्या निवडणुकीत चंद्रकांतदादा पाटील यांनी त्यांची विधानसभेची उमेदवारी कापून स्वतःची उमेदवारी जाहीर केली होती. त्यावेळी डोळ्यात अश्रू आलेल्या मेधाताईंचे जवळपास पाच वर्षांनंतर राज्यसभेच्या माध्यमातून पुनर्वसन करण्यात आले. परंतु राज्यसभेत नेमके काय काम करायचे? कोणते प्रश्न मांडायचे? याचा त्यांना अंदाज आलेला दिसत नाही. त्यामुळे जनतेच्या समस्या लक्षात घेण्याऐवजी सध्या त्यांना हिंदुत्वाने इतके पछाडले आहे की, हिरव्या रंगाची त्यांना प्रचंड ॲलर्जी निर्माण झाली आहे. संपूर्ण देशातील हिरवी वनसंपदा भगवी कशी करायची? याचा शोध लावण्याची आता गरज निर्माण झाली. मेधाताई प्राध्यापक आहेत, आता त्यांनी यावर देखील संशोधन केले तर संपूर्ण देश भगवा होऊन जाईल. परंतु 'निधर्मीवादी' भारत देशातील 'तिरंगा' झेंड्यातील 'हिरव्या' रंगाचे करायचे काय? याचेही उत्तर त्यांनी दिले तर बरे होईल!**





सदाशिव पेठेतील ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या शेजारील गल्लीत हिरवा रंग देऊन, त्याठिकाणी हार, फुले, अगरबत्ती लावण्यात आली होती. ती भिंत एका संस्थेच्या इमारतीचा भाग आहे. कुणीतरी कार्यकर्त्याने मेधाताईंना या घटनेची माहिती देताच, देशातील तो एक ज्वलंत प्रश्न समजून त्यांनी तातडीने तेथे धाव घेऊन 'पेंटर'ची भूमिका घेतली. त्यांच्या मते असा अचानक हिरवा रंग का दिला जातोय? त्यामागील खेळी काय आहे? याची उत्तरे त्यांनी आपल्या कृतीतून दिली आहे. पण बरं झालं हिरवा रंग देणारा गृहस्थ हिंदू होता. अन्यथा विद्वत्तेचे माहेरघर असलेले पुणे अशांत झाले असते. रंग बदलण्यापूर्वी निदान तो रंग कोणी दिला? याचे भान खासदार मॅडमनी ठेवले पाहिजे होते. त्यांच्या मते महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागात अशा गोष्टी चालू आहेत. हळूहळू जागा काबीज केल्या जातात. छोट्या पद्धतीने सुरू झालेली कृती मोठ्या प्रार्थना स्थळांमध्ये रूपांतरित होतात, असा त्यांचा आरोप आहे. अशा घटना आम्ही सहन करणार नाही, असा इशाराच त्यांनी देवून टाकला आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

घटनास्थळी हिरवा रंग लावला होता, तिथे गणपती बाप्पांची प्रतिमा कडेला होती. आणखी दोन-तीन प्रतिमा तिथे होत्या. याचाच अर्थ ज्या कोणी तो रंग दिला होता, त्या हिंदूंच्या मनात पवित्र भावना असेलच. परंतु गणपतीच्या ठिकाणी हिरवा रंग नको अशी तर भूमिका कुलकर्णींची नाही ना? हिरवा रंग देणारी व्यक्ती हिंदू आहे, असे समोर येताच 'हिंदूंचावापर करण्याचे एक नवीन तंत्र' असू शकतं, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

हिंदू भरकटला असेल, तर आम्ही त्यांना जागं करू, असे त्या म्हणाल्या. मग आता या हिरव्या रंगाचे करायचे तरी काय? मेधाताईंच्या पक्षाचे लोकसभेत व राज्यसभेत बहुमत आहे. त्यामुळे त्यांनी भारतातून 'हिरवा' रंगच हद्दपार करावा, असा ठराव मांडायला हरकत नाही. तसेच जो कोणी घरादाराला किंवा कोणत्याही ठिकाणी हिरवा रंग वापरेल, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचा कायदा निर्माण केला तर बरे होईल.

खरं म्हणजे खासदार होऊन जनतेच्या समस्या सोडविण्याची त्यांना गरज नसेल, तर त्यांनी साध्वी होऊन धर्मप्रचार प्रसाराच्या कार्यात योगदान दिले तर संपूर्ण देशात त्यांची प्रतिमा तयार होईल. कारण खासदार व्यक्तीने असा बालिशपणा करणे पुणेकरांना देखील आवडले नसेल. पुण्यातील खून सत्र त्यांना माहीत नाही का? अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्या त्या ठिकाणी तातडीने रंगाचा कुंचला घेण्यात घेऊन जाण्याऐवजी 'वेपन' घेऊन गेल्या असत्या तर त्यांना पुणेकरांनी डोक्यावर घेतले असते. मेधाताई प्राध्यापक आहे. त्या कोणत्या विषयाच्या प्राध्यापक आहे हे महाराष्ट्राला माहीत नाही. पण रंगसंगती शिकवताना शिक्षकांनी 'तानापिहीनिपांजा' ही रंगाची शिकवण दिली होती. त्यातून आता नव्या शिक्षण पद्धतीत 'ही' वजा करायचा का? हे पण त्यांनी सांगून टाकावे.

सदाशिव पेठेतील ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या शेजारील गल्लीमध्ये हिरवा रंग देऊन तिथे हार, फुले, अगरबत्ती लावून पूजा करण्यात आल्याचे म्हटले जात होते. ती वस्तुस्थिती सत्य देखील असू शकेल. पण याबाबतीत त्यांना काही संशय असेल तर खासदार या नात्याने ते पोलिसांना कळवू शकत होते. परंतु त्यांनी स्वतः जागेवर जाऊन हातात रंगाचा डबा घेतला हे काही महाराष्ट्रातील जनतेला योग्य वाटले नाही. एवढेच नव्हे तर 'हिरव्या रंगावर भगवा रंग असा चढवला की मजा आली' हे त्यांचे वक्तव्य समाज घडविणाऱ्या एका प्राध्यापिकेला शोभणारे वाटतचं नाही. 'आम्ही भगवे पांघरलेले आहोत, आम्ही श्री राम पुजारी आहोत' या त्यांच्या वक्तव्याशी महाराष्ट्र सहमत असू शकेल. परंतु रंगावरून युद्ध करणे, वाद करणे व ते देखील देशातील सर्वोच्च सभागृहातील सदस्यांने हे त्यांना तरी पटले असेल का?

आपल्या राष्ट्रध्वजाच्या तळाशी असलेलाहिरवा रंग प्रजनन, विश्वास आणि समृद्धी दर्शवतो. हा एकरंग आहेजो जीवन, यश आणि आनंद दर्शवतो. तो निसर्गाचा रंग असून प्रगती, भरभराट, समृद्धी, सुसंवाद, स्थिरता, संतुलन, सहनशक्ती, अंत:र्बाह्य सौंदय आणि चैतन्याचे प्रतीक आहे.

हिरवा शीत रंग थंडावा देणारा आहे. लाल, पिवळा, निळा, केशरी, जांभळा, ग्रे, ब्राऊन ह्यापैकी कोणत्याही रंगाबरोबर हिरवा रंग उठून दिसतो. पण हिंदुत्वाने पूर्ण पछाडलेल्या मेधाताईंना समजून सांगणे आता अशक्य वाटते. राज्याच्या, देशाच्या विकासासाठी काही महत्त्वाचे, धोरणात्मक आणि दूरदृष्टी ठेवून विकासाचे आराखडे आखायचे, त्यांची अंमलबजावणी करायची हे काम आता कोणाकडे सोपवायचे? याचे उत्तरही मेधाताईंनी दिले पाहिजे.

### खासदार मेधाताईंची भूमिका

आम्हाला कुठल्याही प्रकारे अशा ठिकठिकाणी कॉर्नर बळकवलेले चालणार नाहीत. दुसरी गोष्ट रेल्वे लाईनच्या कडेला देखील ठिकठिकाणी पीर आणि मजारी आहेत. हिंदू धर्माशिवाय इतर कोणाची प्रार्थना केली जावी हे पटतं नाही. मग हे पीर कसे काय अचानक येतात? आपल्याकडे सुद्धा कोणी महंत, साधुसंत किंवा अशी एक महात्मा व्यक्ती जेव्हा दिवंगत होते, तेव्हा ते समाधी घेतात. पण ते जाहिर असते, त्यांचं नाव आपल्याला माहिती असतं. ते समाधी स्थळ माहिती असते. त्या व्यक्तीचं नाव आणि कार्य आपल्याला माहिती असेल आणि त्यांना आपण रस्त्याच्या कडेला काही समाधी स्थान करत नाही. तर हे सगळं फेक असतं. तर या फेक गोष्टींपासून सगळ्या हिंदूंनी सावध राहायला पाहिजे, आपल्या जागा आपण संरक्षित केल्या पाहिजेत. राज्यातीलच एक उदाहरण देते की, मलंग बाबा 'नाथपंथीय' बाबा होते आणि आता तिथे 'हाजी मलंग' या नावाने ते प्रचलित केले गेले. ते तीर्थक्षेत्र हिंदूंचे तीर्थक्षेत्र आहे. वेगवेगळ्या लोकांनी अतिशय चुकीच्या पद्धतीने कार्यनीती अवलंबून आता ते सर्व धर्मीय प्रार्थनास्थळ केले आहे. ते सर्व धर्मीय प्रार्थना स्थळ नाही, ते केवळ तीर्थक्षेत्र आहेत. अशा बाबतीत आपण अलर्ट राहिले पाहिजे असं मला वाटतं!

### नवहिंदुत्ववादी राणे बोललेच

ज्याप्रमाणे सरदारजींबद्दल हल्केफुल्के विनोद नेहमी प्रसिद्ध केले जातात. त्याचप्रमाणे पुणे शहरातील सदाशिव पेठेबाबत सोशल मीडियात अनेक विनोद प्रसिद्ध होत असतात. तो प्रकार निख्खळ मनोरंजनाचा असतो. पुणेकर सुहृदयी व प्रेमळ आहेत. एकमेकाला समजून घेण्याची त्यांची वृत्ती आहे. त्यामुळे त्या विनोदाला ते देखील हसत हसत दात देतात. पण पुणेकरांचा घरचा मामला असतांनाही मेधा कुलकर्णींच्या या कृतीवर नवहिंदुत्ववादी नितेश राणे या नवोदित मंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली नसती, तर कदाचित काहीतरी चुकल्यासारखे वाटले असते. कारण आता हिंदुत्वाचा एक ज्वलंत हिंदुत्ववादी म्हणून नुकताच पुढे आलेला हा नेता आहे. राणे कुटुंबियांची दीर्घकाळ काँग्रेसमध्ये वाटचाल झालेली आहे. त्यावेळी ते कमालीचे 'सेक्युलर' होते. परंतु संपूर्ण कुटुंबीयांना भाजपने सत्तेची पदे दिल्याने हिंदुत्वाचा पुकारा त्यांना करावाच लागतो. त्यामुळे त्यांनी मेधाताईंचे अभिनंदन केले असेल, तर ते काही वावगे ठरणार नाही. परंतु, हिरवं आक्रमण होत आहेत, हिरवे साप वळवळतात आणि वातावरण खराब करतात, असे फुत्कार सोडण्याची संधी काही त्यांनी दवडली नाही.

●●●●●●●●●

# पेशव्यांना शिकस्त देणारे महार सैनिक!

ब्रिटिश साम्राज्याने ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर यांच्या प्रमुखांशी शांतता करार वा तह करून त्या-त्या संस्थानांचा भाग आपल्या राज्याला जोडला होता. 13 जुन 1817 रोजी पेशवे आणि गायकवाड घराण्यात महसुलावरून वाद झाला. त्यात बाजीराव पेशवे यांनी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतली व बडोदा संस्थानाचा मोठा भाग पेशवाईत समाविष्ट केला.

परंतु यासाठी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतल्यामुळे अप्रत्यक्षपणे तो भाग ब्रिटिशांनी आपल्या राज्यास जोडला. यामुळे मराठा साम्राज्य ब्रिटिश अधिनस्त झाले आणि पेशवे केवळ नामधारी उरले. अल्पावधीतच पेशव्यांनी ब्रिटिशांना नमवण्याचा प्रयत्न खडकीची लढाई केला. परंतु ब्रिटिशांनी तेथेही पेशव्याचा पराभव केला. ही लढाई 5 नोव्हेंबर 1817 रोजी झाली होती. त्यानंतर पेशवे यांनी तेथून सातारा येथे पळ काढला आणि ब्रिटिशांनी पुण्यावर ताबा मिळवला.

पुणे हे चार्लस बार्टन बर व कर्नल जनरल स्मिथ यांच्या नेतृत्वाखाली होते. आणि ते पेशव्यांचा पाठलाग करत होते. दरम्यान कर्नल स्मिथ याला भिती वाटत होती की पेशवा तेथूनही निसटून कोकणात जातील व तेथे राज्य करतील, म्हणून त्याने कर्नल बर याला कोकणात आणखी कुमक पाठवण्यास सांगितली आणि एक जास्तीची कुमक शिरूर येथे ठेवण्यास सांगितली. पेशवे कर्नल स्मिथचा पाठलाग चुकवून निसटून जाण्यात यशस्वी झाले.

परंतु दक्षिणेकडून कर्नल थेओफिलस प्रिझलर सैन्यासह तयार होताच, ते पाहून पेशव्यांनी मार्ग बदलला आणि पूर्वेकडे चालत नाशिकच्या वायव्य भागातून पुढे सरकले आणि कर्नल स्मिथ त्यांच्यावर हल्ला करेल या भीतीने ते पुन्हा पुण्याकडे वळले. डिसेंबर 1817च्या अखेरीस कर्नल बरला बातमी समजली की पेशवे पुण्यावर चालून येत आहेत. तेव्हा त्याने शिरूर येथील सैन्याला मदतीसाठी तयार राहण्यास सांगितले. सैन्य पुढे सरसावले आणि त्यांची लढाई कोरेगाव भिमा या गावात झाली. पेशवा दुसरा बाजीराव नासिककडे न जाता ओझरचा घाट उतरून जुन्नर खेडावरून 30 डिसेंबर रोजी चाकण येथे येऊन पोहचला, अशी बातमी स्मिथ यास कळली. पूर्वी कोंकणांतून मुंबईकडून इंग्रज फौज येत होती तिला गाठावे किंवा पुण्यावर येऊन ते शहर एकदम हस्तगत करावे असा बाजीरावाचा बेत असल्याचे स्मिथ यास दिसून आले.

दोन्ही गोष्टी इंग्रजांस बिकटच होत्या. पुण्यास इंग्रजांचा बंदोबस्त अगदींच तात्पुरता होता. त्याने आपल्या मदतीस शिरूरहून जास्त फौज बोलावली होती, त्यावरून कॅ. स्टॉन्टन थोडे इंग्रज सैन्य बरोबर घेऊन 31 डिसेंबर 1817 रोजी रात्री 8 वाजता शिरूरहून निघा, तो दुसऱ्या दिवशी सकाळी 10 वाजता कोरेगांवजवळ येऊन उतरला. तेथील टेकडीवरून त्याला पेशव्याची प्रचंड फौज भीमा नदीच्या काठीं दिसली. स्टॉटनची बातमी बापू गोखल्यास होतीच. घोडनदीहून वरील इंग्रज फौज पुण्यास येत होती तिची बाजीरावाशीं अकस्मात गाठ पडली. बापू गोखल्यास श्रीमंतानी आज्ञा केली, की आज लढाई करून आम्हास पुढे जाण्यास मार्ग करून द्यावा. गावास लहानशी तटबंदी होती तेथे इंग्रज आश्रयार्थ गेले. त्यावर दुसऱ्या बाजूने मराठ्यांनी तोफांचा मारा सुरू केला. जागा अडचणीची असल्यामुळे तोफा बंद करून मराठ्यांकडील अरबांनी व पायदळांनी इंग्रजांवर चालून घेतले. तेव्हा संगिनीचे व तरवारीचेच युद्ध झाले. दोन्ही बाजूंचे भरपूर नुकसान झाले. रात्री 9 वाजेपर्यंत लढाई चालून मराठ्यांचे सैन्य आपल्या छावणीकडे परत आलें.

सकाळी इंग्रजांच्या सैनिकांनी पाहिले तर मराठा सैन्य निघून गेल्याचे दिसले. इंग्रजांचे 275 मारले गेले तर 175 जखमी झाले, त्यापैकी बहुतेक होतकरूच होते. मराठ्यांचे सुमारे 500-600 लोक पडले. बाजीराव तर अगोदरच जेजुरीच्या वाटेने साताऱ्याकडे निघाला होता. पाठीमागून जनरल स्मिथ येत असतां त्यास ओझरच्या घाटात त्रिंबकजी डेंगळ्याच्या रामोशांनी इतके सतावून सोडले की, 2 जानेवारी 1818 रोजी जेमतेम तो चाकणला येऊन पोचला.

कोरेगावची लढाई ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई 1 जानेवारी 1818 रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण 834 सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ. स्टॉटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडीचे सुमारे 500 महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने 25000 सैनिक होते, ज्यातील 20000 घोडदळ, 5000 पायदळ सतत तैनात असत.

कंपनी सरकारच्या सैन्यांनी हल्ला करु नये यासाठी प्रत्येकी 600 सैनिकांच्या तीन तुकडया असत. ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरे करीत होते. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता. दुसरे बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखालील सैन्य पुण्यावर हल्ला करण्याच्या मार्गावर असताना, अनपेक्षितपणे त्यांना कंपनीचे सैन्य आडवे आले, जे पुण्यातील ब्रिटीश सैन्याला मदत देण्यासाठी निघाले होते.

पेशव्यांनी कोरेगावात घुसखोरी करणाऱ्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी सुमारे 2000 सैनिक पाठवले. कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या सैन्याने जवळजवळ 12 तास लढाई केली. मोठ्या ब्रिटीश सैन्याच्या आगमनाच्या भीतीने पेशव्यांच्या सैन्याने शेवटी माघार घेतली. ही लढाई इंग्रज-मराठा युद्धाच्या मालिकेतील तिसऱ्या इंग्रज - मराठा युद्धाचा भाग होती.

या युद्धाच्या मालिकेने पेशव्यांची राजवट संपली. यानंतर पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जवळजवळ संपूर्ण पश्चिम, मध्य आणि दक्षिण भारतात पसरली गेली. पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महारांना, अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजूने पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले. 1800 च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेली होती.

कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी पेरणे फाटया जवळ पूणे-अहमदनगर रोड वर 75 फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर कंपनीच्या 49 सैनिकांची नावे कोरली. यामध्ये 20 शहीद व 3 जखमी महार सैनिकांची नावे आहेत. या स्तंभावर लिहिले आहे One of the Triumphs of the British Army of the Earth'.

हेन्री टी प्रिंसेप यांनी लिहिलेल्या हिस्टरी ऑफ द पॉलटिकल अँड मिलिट्री ट्रान्जॅक्शन्स इन इंडिया पुस्तकात या लढाईचा संदर्भ आहे. महार समाजातल्या माणसांचा समावेश असलेल्या ईस्ट इंडिया तुकडीच्या धाडसाचे वर्णन या पुस्तकात आहे. महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी 1 जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशभरातून बौद्ध (विशेषतः पूर्वाश्रमीचे महार), अन्य दलित, शीख व इतर जातीचे लोकही लाखोंच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली जाते. आजच्या दिनी अशा शूर सैनिकांना मानवंदना......!



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

●●●●●●

# शाकाहारी लोकांचे चिकन, मटण



शाकाहारी लोकांचे चिकन-मटण म्हटल्यावर डोळ्यासमोर सुरणाची भाजी, सोयाबीन, मासवडी, पनीर हे असे पदार्थ आले असतील. आणि याही पदार्थांना शाकाहाऱ्यांचं नॉनवेज म्हणतात. पण एक भाजी अशी आहे जी खरोखरच चवीच्या बाबतीत चिकन, मटणाला तोड देते, असं म्हणतात. ही भाजी वर्षातून फक्त 15 दिवसच बाजारात उपलब्ध असते. त्या भाजीचं नाव आहे करटुल्याची भाजी किंवा काहीजण त्याला कटुलेही म्हणतात.

कटुरलेची भाजी कारल्यासाखी दिसते. लोक आवडीनं खरेदी करतात. कटुरले किंवा करटोली अशा विविध नावांनी या रानभाजीला ओळखलं जातं. दिसायला ती कारल्याच्या कुटुंबातलीच दिसते. तिलाही बारिकसे काटेही असतात. ही भाजी उगवण्यासाठी कोणत्याही प्रकारचं खत किंवा औषधांची फवारणी करण्याची आवश्यकता नसते. पूर्णपणे नैसर्गिकरित्या ही भाजी उगवता येते. ही भाजी प्रामुख्यानं पावसाळ्यात उगवते.

कटुरलेची भाजी आरोग्यासाठी प्रचंड गुणकारी मानली जाते. अनेकजण वर्षभर या भाजीची आतुरतेनं वाट पाहतात. श्रावणात मांसाहार न करू शकणाऱ्या मांसाहारप्रेमी देखील या भाजीचे फॅन आहेत. आयुर्वेदिक डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे कटुरले भाजी कारल्याशी मिळतीजुळती आहे.

या भाजीत भरपूर आयर्न आणि प्रोटीन असतात. या भाजीतून शरिराला मांसाहाराएवढे पोषक तत्त्व मिळतात. यामुळे जुलाब, कावीळ, इत्यादी आजारांवर आराम मिळू शकतो. एवढच काय तर ब्लड शुगर कंट्रोल राहण्यासही मदत मिळते. तसंच अशक्तपणा असेल तर तोही दूर होतो.

●●●●●●●●●

## "नववर्षाची पहाट"

नववर्षाची पहाट झाली ।
सुख समृद्धी घेऊन आली ॥ १

मागील वर्षा उत्तम घेऊ ।
दु:ख विसरुनी आनंदे न्हाऊ ॥ २

शिखरावरूनी ऊंच भरारी ।
प्रगतिची वाजवू तुतारी ॥ ३

नवे स्वप्न अन् नव्या दिशा ह्या ।
पुष्प सुगंधी नवे फुलवू या ॥ ४

शेती फुलवू, बागा फुलवू ।
धनधान्याने समृद्ध होऊ ॥ ५

आनंद घेऊ, आनंद देऊ ।
आनंदगीत हे, सुरेल गाऊ ॥ ६

नवे संशोधन विचार उजळू ।
देशभक्तीचा गुलाल उधळू ॥ ७

भारतदेशाचे गुण गाऊ ।
सत्यसत्व गुण जनमन रमवू ॥ ८.



'स्वरचैतन्य'
डॉ. मिलिंद इंदूरकर (मनवा )
नागपूर.

## २३ नोव्हेंबर दिनविशेष

**१ जानेवारी महत्वाच्या घटना :**

१७५६: निकोबार बेटे डेन्मार्कच्या ताब्यात गेली आणि त्यांना न्यू डेन्मार्क असे नाव देण्यात आले.
१८०८: अमेरिकेत गुलामांच्या आयातीस बंदी घालण्यात आली.
१८१८: भीमा कोरेगाव येथे एफ. एफ. स्टाँटन यांच्या नेतृत्वाखाली फक्त ५०० सैनिक असलेल्या दुसऱ्या बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्री बटालियनने पेशव्यांच्या २५,००० सैन्याचा पराभव केला.
१८४२: बाबा पद्मनजी यांचे ज्ञानोदय वृत्तपत्र सुरू झाले.
१८४८: महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी भिडे वाडा पुणे येथे पहिली मुलींची शाळा सुरु केली.
१८६२: इंडियन पिनल कोड अस्तीत्वात आले.
१९००: स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मित्रमेळ्याची स्थापना केली.
१९१९: भारतात कायदेमंडळे स्थापन झाले.
१९३२: डॉ. नारायण परुळेकर यांनी सकाळ वृत्तपत्र सुरु केले.

**१ जानेवारी जन्म :**

१६६२: पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचा जन्म.
१८७९: ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचा जन्म.
१८९२: स्वातंत्र्य लढ्यातील नेते आणि महात्मा गांधींचे स्वीय सहाय्यक महादेव देसाई यांचा जन्म.
१८९४: भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस यांचा जन्म.
१९१८: ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी शांताबाई दाणी यांचा जन्म.
१९३६: साहित्यिक राजा राजवाडे यांचा जन्म.
१९४१: चित्रपट कलाकार असरानी यांचा जन्म.
१९४३: पद्मभूषण विजेते रघुनाथ माशेलकर यांचा जन्म.
१९५१: अभिनेते नाना पाटेकर यांचा जन्म.

**१ जानेवारी मृत्यू :**

१५१५: फ्रान्सचा राजा लुई (बारावा) यांचे निधन.
१९४४: दिल्लीचे नगररचनाकार सर एडविन लुटेन्स यांचे निधन.
१९५५: रसायनशास्त्रज्ञ डॉ. शांतिस्वरूप भटनागर यांचे निधन.
१९७५: उद्योजक शंकरराव वासुदेव किर्लोस्कर यांचे निधन.
१९८९: पत्रकार दिनकर साक्रीकर यांचे निधन.
२००९: संगीतकार, वादक व शास्त्रीय संगीतातील विद्वान रामाश्रेय झा यांचे निधन.

## अशोकायन

### नववर्ष स्वागतम्..!

रचाया उज्वल
भविष्याचा पाया
विचारांती दुरदृष्टीचे
संकल्प करू या...

संकल्पाला दिली जिद्दीने
निरंतर प्रयत्नांची साथ
तर स्वप्नपुर्तीचा आनंद
मावणार नाही गगनात ..

प्रयत्नांती परमेश्वर
हे तत्व ठेवा ध्यानी
आज नाही तर उद्या
यश मिळेल चिंता नको मनी..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# नव्या वर्षासाठी घेऊया सामाजिक सुधारणांचा संकल्प!

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाच स्वागत करताना आपल्यापैकी अनेक जण आत्मचिंतन करतात. सरत्या वषार्साठी आपण कोणकोणते संकल्प केले होते, त्यापैकी किती पूर्ण झाले आणि किती शेष आहेत, केलेले संकल्प पूर्ण न होण्यामागे नक्की कोणकोणते अडथळे आले आणि त्यासोबतच येणाऱ्या वर्षात आपल्याला कोणकोणती शिखरे किती काळात गाठायची आहेत, येणाऱ्या अडचणींवर कशाप्रकारे मात करायची आहे याचे गणित मांडतात. हे संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला काय काय प्रयत्न करावे लागणार आहेत याची जंत्री बनवतात.

--------------

प्रतिवर्षी केले जाणारे हे संकल्प बऱ्याचदा व्यावहारिक स्वरूपाचे असतात. विद्यार्थी एखादी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचा संकल्प करतात, व्यावसायिक आपल्या व्यवसायात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याचा, व्यवसाय वाढवण्याचा संकल्प करतात, कार्यालयीन कर्मचारी कार्यालयात प्रमोशन आणि वेतनवृद्धी मिळवण्याच्या दृष्टीने संकल्प करून त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची सूची बनवतात, नवीन गाडी, घर किंवा एखादी महागडी वस्तू विकत घेण्याचा संकल्प करतात, स्त्रीवर्ग येत्या वर्षात नवीन दागिना, वस्तू विकत घेण्याचा, पैसे बचतीचा संकल्प करतात. दरवर्षी केले जाणारे हे संकल्प पुढील काही दिवस आपल्या प्रयत्नांना ऊर्जा देण्याचे कार्य करत असतात.

जीवनात यश-अपयश येण्यामागे जसे आपले नशीब कारणीभूत असते तसे आपले गुण आणि दोषही कारणीभूत असतात. आपल्यापैकी किती जण वर्षाअखेरीस आपल्यात असलेल्या आणि वर्षभरात वाढलेल्या दोषांचे चिंतन करतात आणि हे दोष घालवण्यासाठी, आपल्यात नसलेले गुण आणण्यासाठी आणि अल्प प्रमाणात असलेल्या गुणांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करतात?

आपल्यामध्ये अनेक दोष आहेत आणि ते वेळोवेळी उफाळून येतात. या दोषांमुळे आपले अनेकदा नुकसान होते, चुकीचे निर्णय घेतले जातात ज्यामुळे पश्चाताप करण्याची वेळ आपल्यावर येते हे प्रत्येकालाच ज्ञात असते; मात्र या दोषांची सूची बनवून येणाऱ्या वर्षात हे दोष कमी करण्यासाठी आणि सोबत आपल्यात नवनवीन गुण आणण्याच्या दृष्टीने आपण संकल्प करतो का? यंदा असा संकल्पही करून पाहूया.

दोषासोबत आपल्याला असलेला चुकीच्या सवयी, व्यसने यांची सूची बनवूया आणि त्यापैकी किती दोष आणि सवयी येणाऱ्या वर्षात कमी करायच्या, त्यासाठी कोणकोणते प्रयत्न करायला हवेत, कोणाकोणाचे साहाय्य घ्यायला हवे हेही लिहून काढूया आणि त्यासाठी टप्याटप्याने प्रयत्न करूया.

वैयक्तिक स्तरावर संकल्प करताना काही सामाजिक स्तरावरील संकल्पही यावर्षी करूया. अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनतो. आपण प्रत्येक जण समाजाचा एक अविभाज्य घटक आहोत. आपले शारिरिक आणि मानसिक आरोग्य हे सर्वस्वी समाजावर अवलंबून आहे.

त्यामुळे तो निरोगी, सुदृढ आणि सशक्त असणेही तितकेच महत्वाचे आहे. आजमितीला या समाजाला अनेक दुष्प्रवृतींनी ग्रासले आहे, ज्याचा परिणाम समाजातील प्रत्येक घटकाला भोगावा लागत आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

भ्रष्टाचार, गुंडगिरी, स्त्रियांवरील अत्याचार, लहान मुलांचे शोषण, जातीपातीतील तंटे, तरुणांमधील व्यसनाधीनता, प्रमुख शहरांना पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा, ऑनलाईन गेमिंग ॲप्सना बळी पडत चाललेली तरुणाई, टीव्ही आणि गेम्स आदींच्या नादात लहान मुलांचे हरवत चाललेले बालपण, फास्ट फूड-जंक फूड आदीच्या आहारी गेल्यामुळे वाढत चाललेली आजारपणे, भाज्या-फळे, धान्य, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने यांमधील भेसळ, अन्नपदार्थांत वाढत चाललेला रसायनांचा वापर, बनावट औषधाचे वाढते स्तोम, घरभेदी सिरीयल्स, अश्लील-हिंसक वेबसिरीज आणि चित्रपट, मोबाईल मध्ये गुंतत चाललेले जीवन या सर्वांचा परिणाम म्हणून नातेवाईक आणि मित्र परिवार यांतील हरवत चाललेला सुसंवाद, पोलीस, डॉक्टर, वकील, शिक्षक ज्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवला जात असे.

अशांमध्ये काही प्रमाणात पसरत चाललेली विश्वासघातकी वृत्ती यांसारख्या अनेक समस्या आज सामाजिक स्तरावर भेडसावत आहेत, ज्याचा परिणाम कुठेनाकुठे प्रत्येकाच्या जीवनावर पडत आहे.

यासाठी राजकीय मंडळी किंवा सरकार काही करेल ही अपेक्षा करण्यापेक्षा या स ा व ा ं च ा ा निर्मूलनासाठी मीं काय करू शकतो याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने करायला हवा. समाजात पसरलेल्या या विविध रोगाना मीं किंवा माझे कुटुंबीय, माझा मित्रपरिवार यापैकी कुणी बळी पडला आहे का याचा शोध घेऊन त्यातून बाहेर पडण्यासाठी मीं काय करायला हवे याचे चिंतन करून त्या दिशेने प्रयत्न करायला हवेत.

माझा समाज सुधारण्यासाठी आणि त्याचे स्वास्थ उत्तम राखण्यासाठी प्रयत्न करणे हें माझे सामाजिक कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून त्यासाठी मीं काय करू शकतो याद्दष्टीने येत्या वर्षाकरिता संकल्प करून पाहूया. महाराष्ट्र भूमी ही छत्रपती शिवरायांची भूमी आहे ज्यांनी तुन्टपुंज्या मावळ्यांच्या बळावर पाच पाटशाह्यांना लोळवले. अत्याचारी यवनांचे सामाज्य उध्वस्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ही भूमी देशभक्त क्रांतिकारकांची आहे ज्यांनी भारतमातेला परतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवले, प्रसंगी प्राणाचे बलिदान दिले.

ही भूमी समाजसुधारकांची आहे ज्यांनी सामाजिक दुष्प्रवृत्तीच्या विरोधात लढण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. या सर्वांचा आदर्श घेऊन नवीन वर्षात वैयक्तिक प्रगतीचे संकल्प करताना सामाजिक सुधारणेचाही संकल्प करूया. आज ना उद्या समाजातील पालट आपल्याला नक्कीच जाणवेल.

●●●●●●

## डीपीएस लावा उत्सव २०२४-२५ मध्ये मोहित : जन गण मन - हार्मोनायझिंग हार्ट्स



**नागपूर :** दिल्ली पब्लिक स्कूल लावा, नागपूर यांनी त्यांच्या भव्य वार्षिक स्नेहसंमेलन उत्सव २०२४-२५ चे उद्घाटन केले, ज्याचा भावनिक विषय होता जन गण मन - हार्मोनायझिंग हार्ट्स। हा कार्यक्रम देशभक्तीने आणि भव्यतेने भरलेला होता. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून प्रसिद्ध अभिनेते श्री पवन मल्होत्रा उपस्थित होते. मान्यवर अतिथींमध्ये प्रख्यात कथक गुरू श्री मदन पांडे आणि मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. पूजा व्यास यांचा समावेश होता. विद्यालयाचे प्रो व्हीसी श्री गौतम राजघरिया, सुश्री संजना राजघरिया आणि दूरदर्शी प्राचार्या डॉ. अनुपमा सगदेव यांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाची सुरुवात ज्ञान आणि प्रकाश यांचे प्रतीक असलेल्या दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्राचार्यांनी प्रेरणादायी वार्षिक अहवाल सादर केला. श्री मल्होत्रा यांनी नेशन फर्स्ट, ऑलवेज फर्स्ट या विचारसरणीबद्दल आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाबद्दल विचार मांडले, ज्यामुळे उपस्थित प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा मिळाली.

विद्यार्थ्यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या मॉर्निंग साँग ऑफ इंडियाच्या पाच कडव्यांचे अप्रतिम नृत्य आणि नाट्यमय सादरीकरणातून चित्रण केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रीय गीताने झाला. हा कार्यक्रम भारताच्या एकात्मतेला आणि सांस्कृतिक वारशाला दिलेली काव्यात्मक श्रद्धांजली होती.

१००% बोर्ड परीक्षेचा निकाल मिळवत, डीपीएस लावा नागपूर उच्च शैक्षणिक मानके राखण्यात यशस्वी ठरले आहे. विद्यालय जागतिक अनुभव प्रदान करण्यासाठी विविध देशांतील शाळांशी वर्च्युअल सहकार्य करते आणि पुस्तक दान, अन्नदान आणि पर्यावरण संरक्षण यासारख्या सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतो. शैक्षणिक सत्र २०२३-२४ साठी इंटिग्रेटेड लर्निंग मध्ये महाराष्ट्रातील क्रमांक १ शाळा म्हणून एज्युकेशन टुडे यांनी गौरवले आहे.

प्राचार्या डॉ. अनुपमा सगदेव यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, ज्यांना तज्ञ शिक्षकांचे सहकार्य लाभते, विद्यालय शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करत शिक्षण सुधारांमध्ये अग्रेसर आहे. विद्यालयाने नवी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) लागू करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण पद्धती आणि प्रगतीचा लाभ मिळवून दिला आहे. पालकांच्या सहभागाला महत्त्व देत, विद्यालय पालकांसोबत मजबूत भागीदारी प्रोत्साहन देते आणि करिअर काउंसलिंग सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याचा योग्य निर्णय घेण्यासाठी सुसज्ज करते.

डीपीएस लावा नागपूरने आपल्या उत्कृष्टतेबद्दलची वचनबद्धता जपताना, विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी, त्यांना सक्षम बनविण्यासाठी आणि त्यांचे जीवन बदलण्यासाठी, त्यांना उद्याचे नेता आणि नवोन्मेषक घडवण्यासाठी आपल्या ध्येयावर ठाम राहून पुढे वाटचाल केली आहे.

# डोळ्यात झणझणीत अंजन : नूतन वर्षाभिनंदन!

(१ जानेवारी: नूतनवर्ष, विश्व धुम्रपानविरोधी दिन व म.फुले दांपत्य सन्मान दिन विशेष)

-----------

**तंबाखूचे खैनी, चैनी, गद्घ, गुटका, गुडाकू, जर्दा, तईबूर, स्नफ इत्यादीच्या रूपात सेवन होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाण्याने इतरांना फारसा त्रास होत नाही. मात्र, सिगारेट, विडी, सिगार, पाईप्स, हुक्का, चिलीम, हुकलीस, चुट्टा, चिरुट इत्यादीने परिसरातील इतर व्यक्तींना त्रास होतो. शरीरात धुराने प्रवेश केल्याने न ओढणारेही अप्रत्यक्षपणे धूम्रपानाचे बळी ठरतात. यामुळेच नववर्षाच्या आरंभी धुम्रपानास विरोध हा झालाच पाहिजे. म.फुले दांपत्यांनी दिलेले शिक्षण सुसंस्कारमय होते, हे त्यातून दिसेल आणि हाच त्यांचा मोठा सन्मान ठरेल.**

-----------------

संपूर्ण जगावर इंग्रजीचे सर्वाधिक प्राबल्य आहे. त्यामुळे साहजिकच १ जानेवारी हा दिवस नववषारंभ म्हणून धुमधडाक्यात त्याचे स्वागत होत आहे. महाराष्ट्रात म.फुले सन्मान दिन साजरा करण्यात येतो. कारण याच दिवशी कामगार बंधूंनी त्यांना महात्मा ही पदवी देऊन गौरविले होते. म्हणून तो दिवस उजाडण्याची अनेक दिवसांपासून प्रतिक्षा केली जाते.

त्याबरोबरच याच नुतनवर्ष आरंभदिनी पार्टी करून नव्या वर्षाच्या तोंडावर पान खाऊन कसे थुंकता येईल? याचे मनसुबे रचले जातात. तशी मनोमन अपेक्षा बाळगली जाते. त्यामुळे वषारंभ लक्षात घेऊन जागतिक धुम्रपानविरोधी दिन पाळण्यात यावा, असेही ठरविले गेले. मात्र याकडे कानाडोळा केला जातो.

संकल्प तर भरमसाठ आणि अशक्यप्राय केले जातात. डोंगर, चंद्र, मंगळ, समुद्र, आकाशात बंगला बांधेन, अमुक धरेन, तमुक सोडेन. मात्र धुम्रपान विरोधावर ब्र शब्दही उच्चारणार नाही. म.फुले दांपत्याने बहुजनांसाठी याच दिवशी शाळा उघडली. म्हणून महाराष्ट्रात हाच दिवस म.फुले दांपत्य सन्मानदिन साजरा केला जातो. एकीकडे सुशिक्षितांची संख्या वाढली. त्याच्या समप्रमाणात वाईट व्यसनांधांची संख्याही फोफावली. हेच धुम्रपान- व्यसनांचे व्यस्तप्रमाण असावयास हवे होते.

शिक्षणामुळे मती प्रकाशली, गुलामगिरी उधळून लावली व नवे-जुने कळू लागले. पण व्यसने-धुम्रपानाचे प्रमाण का वळू शकत नाही? स्वतःसह प्रियजनांच्या व इतरांच्याही आरोग्याचे वाभाडे निघाले. कसे का? याचे आत्मपरीक्षण व आत्मचिंतन होणे अत्यंत गरजेचे आहे.

सार्वजनिक ठिकाणी, धूम्रपान केल्यास त्याच्यातील विषारी रासायनिक घटकांमुळे कर्करोग होण्याचा संभव अधिक असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तंबाखू सेवनामुळे हृदय विकार, फुफ्फुसाचा कर्करोग, गुंतागुंतीचे फुफ्फुसाचे आजार, क्षयरोग, स्ट्रोक, श्वसन संस्थांचे आजार होतात. यापैकी ४० टक्के आजार हे धूम्रपानाशी संबंधित आहेत. महिलांच्या धूम्रपानामुळे वेगवेगळी गुंतागुंत निर्माण होते.

कृष्णकुमार जी. निकोडे गुरूजी.
(मराठी व हिंदी साहित्यकार)
गडचिरोली.
९४२३७१४८८३.
nikodekrishnakumar@gmail.com

आजही भारतात २४.३ टक्के भारतीय पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. केरळमधील काही गावांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत लहान मुलांद्वारे तंबाखू देऊन केले जाते. भारतातील काही विशिष्ट भागातील कुटुंबातील लग्न समारंभात पाहुण्यांना तंबाखू देऊन सन्मान करण्याची प्रथा आहे. मिझोरमच्या ग्रामीण भागात स्वागत करण्याची ताइबूर ही प्रथा तंबाखू देऊनच साजरी केली जाते.

तंबाखू सेवनाने तोंडाचा कर्करोग होण्याच्या दाट शक्यतेसह इतर आजारही बळावत आहेत. याबाबत जनजागृती होत असतानाही देशात २४.३ टक्के पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. दरवर्षी १ जानेवारी हा जागतिक धूम्रपान विरोधी दिन म्हणून पाळला जातो. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम दिसत असतानाही गेल्या कित्येक वर्षांपासून भारतीय माणसाच्या जगण्याशी आणि संस्कृतीशी जुळलेल्या तंबाखूला प्रतिबंध करणे शक्य झालेले नाही. तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढत असल्याचे आाढळून आले आहे. तंबाखूमध्ये जवळपास चार हजार रसायने आढळतात. त्यात कमीत कमी २०० विषारी घटक आहेत. जे निकोटीन, कार्बन मोनोक्साईड, टार, अर्सेनिक, फॉर्मल्डिहाईड इत्यादींचा विषारी घटकांमध्ये समावेश होतो.

भारतात १० पैकी सात स्मोकर्सना धूम्रपान धोकादायक आहे, याची जाणीव असते. ५३ टक्के लोक धूम्रपान सोडण्यास असमर्थ आहेत, अशी फाऊंडेशन फॉर अ स्मोक-फ्री वर्ल्डने प्रसारित केलेल्या माहितीतून हे सत्य उघड झाले आहे. भारतात दर दिवशी १०४ दशलक्षाहून अधिक लोक तंबाखू सेवनामुळे आपल्या आरोग्याशी खेळत असतात. देशात रस्त्यारस्त्यांवर हाताने वळलेल्या विड्या क्षुल्लक किमतीत उपलब्ध असतात.

या प्रकारामुळे भारतात मोठ्या प्रमाणात तंबाखू सेवन चालते. हा पारंपरिक सिगरेट प्रकार भरपूर लोकप्रिय असून त्यांच्यावर कराचा भार नाही. त्यामुळे भारतासारख्या देशात इतर देशांच्या तुलनेत तंबाखू नियंत्रणाचे निराळे पर्याय राबवून तंबाखू विरामाला चालना देऊन धोके कमी केले पाहिजेत. आपण म.फुले दांपत्य सन्मान दिनाचे स्मरण ठेवून नववषारंभी विश्व धुम्रपान विरोध केले, तर मोठ्या कौतुकास पात्र ठरू शकतो.

!! सर्वांत सुमती निर्माण होणेस्तव नववर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

●●●●●●

# कलाकारांनी नववर्ष पार्टीसाठी सांगितल्या फॅशन टिप्स!

सर्वजण स्टाइलमध्ये नववर्ष २०२५ चे स्वागत करण्यासाठी सज्ज असताना पार्टी प्लान्स जल्लोषात सुरू आहेत. पण मनात एक चिंता नेहमी भेडसावते, ती म्हणजे या मोठ्या नाइट पार्टीसाठी आकर्षक ड्रेस परिधान करण्यासोबत कशाप्रकारे ग्लॅमरस दिसावे. सुदैवाने, एण्ड टीव्हीवरील प्रमुख नायिकांनी काही सर्वोत्तम फॅशन व मेक-अप टिप्स सांगितल्या आहेत, ज्यामधून तुम्ही प्रत्येक सेलिब्रेशन पार्टीमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेण्याची खात्री मिळेल. या अभिनेत्री आहेत नेहा जोशी (मालिका 'अटल'मधील कृष्णा देवी वाजपेयी), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अंगूरी भाबी). मालिका 'अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी म्हणाल्या, ''विंटर पार्टी आकर्षक दिसण्यासंदर्भात प्रयोग करण्यासाठी सर्वोत्तम काळ असतो. आकर्षक ड्रेससोबत वेल्वेट ब्लेझर परिधान केल्यास उबदार राहण्यास मदत होते, तसेच ग्लॅमरस लुक कायम राहतो. मेक-अपसंदर्भात मेटलिक आयशॅडोजसह डोळे लक्षवेधक बनवा आणि संतुलित, पण लक्षवेधक लुकसाठी ओठांना आकर्षक



लिप-स्टिकचा वापर करा.'' मालिका 'भीमा'मध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, ''समकालीन पेहराव देखील हिवाळ्यामध्ये अनुकूल असू शकतो, ज्यामुळे तुम्ही सिल्क किंवा वेल्वेट साड्यांसोबत समकालीन ब्लाऊजऐवजी सुशोभित जॅकेट्स परिधान करू शकता. त्यामधून शाही लुक मिळतो आणि उबदारपणा देखील मिळतो. हायलाइटर आणि क्लासिक विंग आयलाइनरसह तुमचे व्यक्तिमत्त्व अधिक लक्षवेधक करा. सायंकाळच्या पार्टीसाठी मी डिप बेरी लिप शेडला प्राधान्य देते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''सेलिब्रेशन्सदरम्यान देखील आरामदायीपणा महत्त्वाचा आहे. आकर्षक जम्पसूट किंवा सर्वोत्तम पँटसूटसह लक्षवेधक इअररिंग्स नववर्ष पूर्वसंध्या पार्टीसाठी ट्रेण्डी व व्यावहारिक आहे. नवीन व आकर्षक लुकसाठी डेवी बेस, रोझी चीक्स व ग्लॉसी लिप वापरुन पहा. रात्रभर मेक-अप राहण्यासाठी त्यावर फिक्सिंग स्प्रेचा वापर करण्यास विसरू नका.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये लोकप्रिय अंगूरी भाबीची भूमिका साकारणाऱ्या शुभांगी अत्रे म्हणाल्या, ''फ्यूजन वेअर विंटर पार्टीसाठी परिपूर्ण आहे. मला लेहंगा स्कर्टसोबत टर्टलनेक टॉप किंवा क्रॉप स्वेटर परिधान करायला आवडते. ते स्टायलिश व अद्वितीय आहे. स्मोकी आईजसह चमकदार व आकर्षक रेड लिप त्वरित लुक अधिक आकर्षक करतात. चोकर नेकलेससह लुक अधिक लक्षवेधक करा. या टिप्ससह आकर्षक दिसत नववर्ष पार्टीसाठी सज्ज रहा आणि प्रत्येक सेलिब्रेशनमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घ्या.''

## आयसीआयसीआय प्रू विश - आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफकडून महिलांसाठी खास जीवन विमा उद्योगातील पहिली योजना

**अकोला :** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने महिलांसाठी डिझाइन केलेली ' आयसीआयसीआय प्रू विश' ही योजना लाँच केली आहे. जीवन विमा उद्योगातील आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सची ही योजना क्रांतीकारी पाऊल मानले जात आहे. आयसीआयसीआय प्रु विश योजनेतून महिलांना स्तन, गर्भाशय, गर्भाशयाचे कर्करोग आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांच्या निदानासाठी आरोग्य विमा कवच रकमेच्या १००% पर्यंत त्वरित परतावा दिला जाईल.

महत्त्वाचे म्हणजे, प्रीमियमची रक्कम ३० वर्षांच्या कालावधीसाठी स्थिर राहणार आहे. ज्यामुळे विमा धारकाला त्यांच्या निधीचे अधिक चांगल्या पद्धतीने नियोजन करता येईल. या उत्पादनाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे प्रीमियम हॉलिडे. यातून वीमा धारकाला प्रीमियम भरण्याच्या कालावधीत कधीही १२ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रीमियम भरण्याचा पर्याय मिळणार आहे.विशेष म्हणजे, यात विमा धारक महिलेला मातृत्वाशी संबंधित गुंतागुंत आणि नवजात बाळाच्या जन्मजात आजारांशी संबंधित विमा संरक्षण घेण्याचा पर्याय देखील मिळेल.

याबाबत श्री अमित पल्टा,चीफ प्रॉडक्ट अँड डिस्ट्रीब्यूशन ऑफिसर,आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स म्हणाले,आयसीआयसीआय प्रू विश हे आयुर्विमा उद्योगातील पहिले आरोग्य उत्पादन आहे जे विशेषतः महिलांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. यात ३० वर्षांसाठी प्रीमियम गॅरंटी प्रदान करण्यासोबतच, उत्पादनाची रचना अशा पद्धतीने केली आहे, ज्यामुळे विमा धारक महिलेला विशिष्ट वैद्यकीय परिस्थितींसाठी अनेक दावे करता येतात. विमाधारकाला मिळालेले अतिरिक्त पेआउट त्यांना पुनर्वसन खर्च उचलण्यास मदत करू शकते.

आज का अंदाज
बुधवार १ जानेवारी २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 6 | 9 | 0 |
| 120 | 600 | 234 | 190 |
| 300 | 556 | 379 | 280 |
| 229 | 330 | 478 | 370 |
| 34 | 64 | 92 | 02 |
| 35 | 65 | 91 | 08 |
| 33 | 66 | 99 | 00 |

मुंबई बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | 7 | 8 |
| 166 | 590 | 160 | 189 |
| 229 | 220 | 250 | 279 |
| 337 | 400 | 340 | 468 |
| 39 | 49 | 70 | 80 |
| 35 | 45 | 72 | 82 |
| 31 | 41 | 76 | 86 |

१ जानेवारी २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | 52 | 68 | 98 |
| 34 | 54 | 67 | 97 |
| 30 | 56 | 61 | 91 |

कल्याण व मुंबईकरिता आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.
प्रो. बालाजी कुमार
9822486034

# जुनं नव्यात केवळ भावनिक समाधानाचा मेळ

जस जस दिवसाचं एक एक पान उलटत जातं आणि शेवटच्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत येऊन ठेपतं तस तस सरत्या वषार्चा निरोप घेण्याची वेळ येते. कुणाचाही निरोप घेताना मन संमिश्र भावनांनी भरलेलं असतं. अगदी तसंच सरत्या वषार्चा निरोप घेतानाही मन गलबलून येतं. या वर्षात काय काय केलं, काय चुकलं, काय शिकलो, काय अपूर्ण राहिलं किंवा काय समाधान देऊन गेलं याचा ताळेबंद मनात चालूच असतं.

निरोप घेणं इतकं सोपं नसतं, मग ते कुणाचंही असो...असं असलं तरी सरत्या वषार्ला निरोप देणं गरजेचं असतं. कारण या वषार्ने आपल्याला अनेक आठवणी, आनंद आणि बरच काही दिलेलं असतं. या सर्व आठवणींची शिदोरी घेऊन नव्या वर्षात पदार्पण करायचं असतं. मागे वळून पाहताना जाणाऱ्या वर्षाला निरोप देताना मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ असतो. तयारी वर्षा अखेरची सरत्या वषार्ला निरोप देताना कुणी सहकुटुंब, मित्र परिवार वा नातेवाईक यांच्या बरोबर वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र येतात. कुणी पाट्यार्त मदमस्त होतात, तर कुणी इतर कार्यक्रम ठेवतात. पण हेतू मात्र एकच असतो.

खरं तर आपलं नवीन वर्ष गुढीपाडव्याला सुरू होतं. आपले सण-उत्सव हे ऋतुमानाप्रमाणे आपण साजरे करतो? गुढीपाडव्याला झाडांची जुनी पालवी गळून नवीन पालवी फुटते. सर्वसृष्टी नवचैतन्याने बहरून जाते. त्यावेळेला माणसाच्या मनामध्ये निसर्गाकडे पाहताना आनंदाचा बहर येतो. आजकाल हे आपण विसरत चाललो आहोत आणि १ जानेवारीपासून आपण नवीन वर्ष साजरे करू लागलो आहोत.

सरत्या वर्षाला जेव्हा आपण निरोप देतो, तेव्हा मनामध्ये नवीन आशा-आकांक्षा जन्म घेतात. नव्या उमेदीने त्या साकार करण्याची इच्छा मनात जागृत होते. ज्या वेळेला जुन्या वर्षात घडलेल्या अप्रिय घटना विसरून आपण नवीन वर्षात पदार्पण करतो, त्या वेळेला नवीन सकारात्मक ऊर्जा आपल्या सुप्त मनात कार्य करू लागते.

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७१८५४७९

पण नववर्ष साजरे करण्याची परंपरा हजारो वर्ष जुनी आहे. १५३ ईसापूर्व रोममध्ये याची सुरुवात झाली. तेव्हा लोक १ मार्चला नवीन वर्ष साजरे करायचे. ४६ बीसी मध्ये ज्युलियस सीझरच्या सौर-आधारित कॅलेंडरमध्ये १ जानेवारी रोजी साजरा केला जाऊ लागला. रोमन साम्राज्यात ही प्रथा मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली. १५८२ मध्ये ग्रेगोरियन कॅलेंडर लागू झाल्यानंतर १ जानेवारी हा नवीन वषार्चा प्रारंभ म्हणून साजरा केला गेला. नवीन वषार्चा उत्सव प्रथम किरिबाटीमध्ये साजरा करण्यात आला आणि आता हा उत्सव हळूहळू पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकू लागला.

दरवर्षी ३१ डिसेंबरच्या रात्री लोकं जुन्या वषार्ला निरोप देतात आणि रात्री १२ वाजता अनेक आशा आणि स्वप्नांसह मोकळ्या हातांनी नवीन वषार्चं स्वागत करतात. प्रत्येक सरतं वर्ष जातांना आपल्याला भरपूर काही शिकवून जातं आणि नवीन वर्ष येतांना आपण त्या शिकवणीतूनच नवीन संकल्प घेऊन नवीन स्वप्नांची शिदोरी बांधत असतो.

खरं तर येणारे नवीन वर्ष आपल्यासोबत नवीन आनंद, नवीन स्वप्न आणि भरपूर उत्साह घेऊन येत असतं. त्यामुळे जगभरातील लोक नवीन वषार्चं वेग-वेगळ्या हटके पद्धतीने स्वागत करताना दिसतात. आता सरतं वर्ष हे मावळतीला चाललं आहे आणि नवं वर्ष उंबरठ्यावर आहे.

मागील वर्षाचे हिशेब मागे राहिले आहेत, त्याची जागा नवीन वर्षाच्या संकल्पांनी घेतली जाणार आहे.

नववर्षाच्या पूर्वसंध्येला जवळजवळ प्रत्येकच घरातले दिवे मध्यरात्रीपर्यंत सुरू असते. त्यामुळे देश रात्रीसुध्दा जागा असतो असं म्हणायला हरकत नाही. सरत्या वषार्ला निरोप देत असताना कटू-गोड आठवणींची सोबत असते.

हे वर्ष खूप काही देऊन आणि शिकवून जाते. त्यामुळे हे सरतं वर्ष अनेक प्रकारे प्रेरणादायी आणि आश्चर्यकारक ठरते. यामुळे नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केल्या जातं. हा सोहळा जेवढा नेत्रदीपक असतो, तेवढाच मनाला सुखावणारा आणि नवी उमेद देणारा ठरतो. सरतेशेवटी एवढंच म्हणावंस वाटते.

*सरत्या वर्षाला निरोप देऊ*
*जीवनगाणे नव्याने गाऊ*

●●●●●●

## राशीभविष्य

**मेष :** व्यवसायात प्रयोग टाळा. चालू असलेल्या कामावर लक्ष केंद्रित करा. आर्थिक आणि मालमत्तेचे वाद वाढण्यापासून रोखा. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी इतरांवर देऊ नका.

**वृषभ :** संयमाने आणि सतर्कतेने पुढे जात राहा. नशीब भक्कम काठावर राहील. राजकारणाशी संबंधित लोक चांगले काम करतील. नोकरीची संधी मिळेल. शुभ मुहूर्ताचा लाभ घ्याल.

**मिथुन :** तुमच्या करिअर आणि व्यवसायासाठी समर्पित रहा. नम्रता आणि सहभाग वाढेल. उद्योजकता वाढेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**कर्क :** नातेसंबंध मधुर राहतील. कामाच्या चर्चेत सावध राहा. नोकरी आणि व्यवसायात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. वडिलोपार्जित कामांना गती मिळेल. सर्वांची मदत होईल.

**सिंह :** खाण्यापिण्याच्या सवयी आणि जीवनशैलीत सुधारणा होईल. मोठे काम पूर्ण होईल. तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या सल्ल्याने पुढे जाल. निर्णयात उत्स्फूर्तता राखाल. कोणत्याही कामात घाई दाखवू नका.

**कन्या :** करिअर आणि व्यवसायात प्रगती होईल. महत्त्वाची कामे वेळेवर पूर्ण कराल. यशाची टक्केवारी वाढेल. विरोधक शांत राहतील. ध्येय स्पष्ट ठेवा. श्रद्धा आणि अध्यात्म वाढेल.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी कार्यात गुंतून नाव कमावण्यासाठी उत्तम आहे. दान-पुण्य कराल. व्यापारात तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळू शकते. वाहन चालवताना काळजी घ्या.

**वृश्चिक :** धार्मिक कार्यात रुची राहील. लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. कोणी कोणताही सल्ला दिला तरी त्यावर योग्य तो विचार करूनच निर्णय घ्या. तुमचे मन काही गोष्टींमुळे अस्वस्थ असेल.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी लाभदायक असेल. तुमच्या जोडीदाराचा सल्ला तुमच्या उपयुक्त ठरेल. व्यवसायात तुम्हाला आनंददायी बातमी ऐकायला मिळेल. पण कामात थोडासा संयम बाळगावा लागेल.

**मकर :** नफा अबाधित राहील. ध्येयाकडे गती आणि स्पष्टता राखेल. कौटुंबिक संबंधांमध्ये घाई करणे टाळा. मानसिक नात्यात जवळीकता येईल. नोकरीच्या ठिकाणी दिलेले सल्ले योग्य ठरणार नाही.

**कुंभ :** मैत्रीणीसोबत डेटिंगला जाण्याचा योग आहे. घरात छोट्या-मोठ्या कुरबुरी होतील. यामुळे काही गोष्टी योग्य पद्धतीने होतील. तुमचा जुना मित्र तुमच्याशी ब-याच काळानंतर भेटेल. रागावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** काही शुभ कार्यक्रम घडतील. कुटुंबातील सदस्यांसमोर तुमच्या भावना व्यक्त करू शकाल. आज संपूर्ण दिवस तुमच्या तोंडावर ताबा ठेवा. तसेच वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.

# निवृत्तीच्या वयात १४ जोडपी विवाहबंधनात

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ३१ :** तारुण्यात एक लग्न झाले असताना निवृत्तीनंतर दुसऱ्यांदा विवाहबंधनात अडकणे अनेकांसाठी अडचणीचे ठरू शकते. मात्र यवतमाळ जिल्ह्यात एक, दोन नव्हे तर तब्बल १४ जोडपी निवृत्तीचे आयुष्य जगत असताना लग्नबंधनात अडकली. विशेष म्हणजे, या सर्वांनी आपले मुलं, मुली, सुना, जावई आणि नातवंडांच्या उपस्थितीत सामूहिक विवाह मेळाव्यात आपल्या जोडीदाराच्या गळ्यात हार टाकला. महागावात झालेल्या या सामूहिक मेळाव्यातील लग्नाची गोष्ट सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे.



विवाहबंधनात अडकलेली ही सर्व जोडपी आपल्या पहिल्याच जोडीदारासोबत दुसऱ्यांदा चतुर्भूज झाली, हे महत्वाचे. उमरखेड येथील जिल्हा परिषद शाळेतील १९७७मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या या मित्रांनी हा अनोखा स्नेहमिलन सोहळा २९ डिसेंबर रोजी महागाव येथील मोटरवार मंगल कार्यालयात घेतला. १९७७ मध्ये दहावी झाल्यानंतर सर्व मित्र विखुरले. विविध क्षेत्रात भरारी घेतली. घर, संसार, जबाबदाऱ्या सुरू झाल्या, तशा मित्रांच्या गाठीभेटी कमी झाल्या. पुढे त्या बंदच झाल्या. २०२३ मध्ये काही मित्रांनी पुढाकार घेवून १९७७ च्या बॅचचे कौटुंबिक स्नेहमिलन आयोजित केले. दरवर्षी एका मित्राने पुढाकार घेवून असे 'गेट टू गेदर' आयोजित करण्याचे ठरले. २०२४ मध्ये २९ डिसेंबर रोजी हा स्नेहमिलन सोहळा महागाव येथे घेण्याचे डॉ. संतोष मोटरवार यांनी जाहीर केले. हा स्नेहमिलन सोहळा हटके असावा यासाठी मोटरवार दाम्पत्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यातूनच सर्व मित्रांचा त्यांच्या सहचारिणीसोबत दुसऱ्यांदा विवाह लावून देण्याची कल्पना सुचली आणि या विवाह सोहळ्याची लगबग महागाव येथे सुरू झाली.

या सोहळ्यात स्वतः विवाह बंधनात अडकणारे असूनही डॉ. संतोष मोटरवार व त्यांच्या पत्नी मीनाक्षी यांनी वधू पक्षाची भूमिका स्वीकारली. रविवार, २९ डिसेंबरला सकाळी सर्व मित्र आपल्या कुटुंबीयांसह कार्यक्रमस्थळी पोहचले तेव्हा सर्व वऱ्हाड्यांचे परंपरेप्रमाणे स्वागत करण्यात आले. दिवसभर विवाहपूर्व विधी पार पडले. सायंकाळी बँड, डिजे लावून सर्वांची मिरवणूक काढून फटाके फोडण्यात आले. गोरज मुहूर्तावर सनई चौघड्याचा सुर उमटू लागला. हॉलमध्ये १०० फुटांचा अंतरपाट धरण्यात आला. या सामूहिक विवाह मेळाव्यात पारंपरिक मंगलाष्टके म्हणत १४ जोडप्यांचा पुनर्विवाह झाला. सर्वांनी पुन्हा एकदा आपल्या जोडीदाराच्या गळ्यात विवाहमाला टाकल्या. तेव्हा वऱ्हाडी म्हणून उपस्थित असलेले या जोडप्यांचे मुलं, मुली, सुना, जावई, नातवंड आपल्या आई - वडिलांचा, सासू - सासऱ्यांचा, आजी -आजोबांचा हा विवाह सोहळा बघून भारावून गेले होते.

या विवाह सोहळ्याला या विद्यार्थ्यांना त्यावेळी शिकवत असलेले व आता वयाच्या नव्वदीत असलेले काही शिक्षकही उपस्थित होते. उपस्थितांनी विवाहानंतर पुनर्विवाहित जोडप्यांना भेटवस्तू देवून स्वागतही केले. लग्नानंतर उपस्थित वऱ्हाड्यांना पंचपक्वानांची पंगतही देण्यात आली. रात्री, 'बाबुल की दुवाये लेती जा' या खास गीताच्या सुरात पुनर्विवाहित दाम्पत्याची घराकडे पाठवणी करण्यात आली.

# परिसराला अवकाळी पावसाचा तडाखा

## वीजपुरवठा ठप्प

■ महासागर प्रतिनिधी,

**उदयनगर, दि. ३१:** शहरासह परिसराला आज, दि. २९ डिसेंबर रोजी अवकाळी पावसाने तडाखा दिला. यामुळे बहुतांश ठिकाणचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. तसेच सोंगलेल्या सोयाबीनसह हरभरा पीक संकटात येण्याची भीती व्यक्त होत आहे. दि. २८ ते ३० डिसेंबर दरम्यान मेघगर्जनेसह पाऊस होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. त्यानुसार आज सायंकाळी ५.४० वाजताच्या सुमारास उदयनगर आणि परिसरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. उदयनगर येथे आज आठवडी बाजार असल्याने बाजारातही व्यापाऱ्यांसह नागरिकांची धावपळ उडाली. उदयनगरसह परिसरात सुमारे अर्धा तास जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे बहुतांश भागातील वीजपुरवठा ठप्प झाला.



अचानक झालेल्या या पावसामुळे सोंगणी केलेल्या सोयाबीनसह हरभरा व इतर पिके संकटात येण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. या पावसाच्या तडाख्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

# रेल्वेचे नवे वेळापत्रक, १ जानेवारीपासून बदल

■ महासागर प्रतिनिधी,

**गोंदिया, दि. ३१:** मुंबई - हावडा लोहमार्गवरील काही गाड्यांचे वेळापत्रक १ जानेवारी २०२५ पासून रेल्वेच्या वेळापत्रकात आंशिक बदल करण्यात येत आहेत. यात या गाड्यांच्या सुटण्यापासून ते येण्यापर्यंतचा वेग वाढवून अनेक तासांचा ऑपरेटिंग वेळ वाचवण्यासाठी वेळापत्रक बदलले आहे. ही अत्यावश्यक कामे सातत्याने केल्याने, मेल एक्स्प्रेस गाड्यांमधील १० मिनिटांपासून ५५ मिनिटांपर्यंत आणि पॅसेंजर गाड्यांमधील ५ मिनिटे ते २०-२५मिनिटांपर्यंतचा वेळ वेगवेगळ्या विभागांमध्ये वाचवला जाईल. त्याचप्रमाणे, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेमध्ये देखील, १ जानेवारी २०२५ पासून लागू होणा?या नवीन रेल्वे वेळापत्रकात, अप आणि डाऊन दिशेच्या १३१ स्थानकांमधील गाड्यांच्या कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. इतर स्थानकांमध्ये वेळापत्रक सारखेच राहणार आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेमध्ये १ जानेवारीपासून ४५ प्रवासी, ८१ मेमू आणि २० डेमू अशा १४६ गाड्या नियमित क्रमांकाने धावतील. क्रमांक १४६२४/१४६२३ फिरोजपूर-सिवनी-फिरोजपूर दक्षिण पूर्व मध्य रेल्वेवरून धावणारी ही पातालकोट एक्स्प्रेस गाडी १ मार्च २०२५ पासून सुपर फास्ट करण्यात येत असून ट्रेनच्या क्रमांक आणि वेळापत्रकात बदल करण्यात येत आहेत. १ मार्च २०१५ पासून, फिरोजपूर-सिवनी-फिरोजपूर पाताळकोट एक्स्प्रेस २०४२४/२०४२३ या नवीन क्रमांकासह सुपरफास्ट एक्स्प्रेस म्हणून धावेल. वेळापत्रक बदलामध्ये गोंदिया रेल्वे स्थानकावरून धावणाऱ्या गाड्यांच्या वेळेतही बदल होणार आहे. गोंदिया करिता जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी गाडी क्रमांक ११०३९ कोल्हापूर-गोंदियामहाराष्ट्र एक्स्प्रेस जी सध्या संध्याकाळी ६.०० वाजता गोंदियाला पोहोचते ती आता नवीन वेळापत्रकानुसार ६.३५ वाजता पोहोचेल. तसेच ट्रेन क्रमांक ११७५४ रीवा-इतवारी एक्स्प्रेस सकाळी ५.२५ ऐवजी ५.१० वाजता गोंदिया स्थानकात पोहोचेल. गाडी क्रमांक ११७५५ इतवारी-रेवाएक्स्प्रेस जी सध्या गोंदियाला ५.४५ वाजता पोहोचते ती आता गोंदियाला संध्याकाळी ६ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ११०७० गोंदिया-रायगडजनशताब्दी एक्स्प्रेस १ जानेवारीपासून गोंदिया स्थानकातून दुपारी २.४० ऐवजी आता २.३० वाजता सुटेल. तसेच गाडी क्रमांक ११०६९ रायगड-गोंदिया जनशताब्दी एक्स्प्रेस दुपारी १.३० वाजता ऐवजी १.४० वाजता गोंदियाला पोहोचेल. गोंदिया करीता दुसरी महत्त्वपूर्ण गाडी असलेली गाडी क्रमांक १२१०६ गोंदिया-मुंबईविदर्भ एक्स्प्रेस आता गोंदिया स्थानकावरून दुपारी २.४० ऐवजी दुपारी २.३० वाजता सुटेल अशी माहिती दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे वाणिज्य व्यवस्थापक यांनी दिलेली आहे.



# डीपीसीची कामे, पाणी संकटाचा खासदार, आमदारांकडून आढावा



## खासदार डॉ. बोंडे, आमदार तायडे, वानखडे यांची उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** मोर्शी आणि चांदूर रेल्वे शहरातील पाणी पुरवठ्याची समस्या तातडीने सोडवण्याचे निर्देश देण्यासोबतच राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे तसेच आ. प्रवीण तायडे आणि राजेश वानखडे यांनी सोमवारी जिल्हा कचेरीत महसूल तसेच इतर विभागाच्या कामांचा आढावा घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जि. प. सीईओ संजीता महापात्र, अपर जिल्हाधिकारी विवेक जाधव, आरडीसी अनिल भटकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प अधिकारी प्रीती देशमुख, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक महेश शिंदे आदी विभागप्रमुख उपस्थित होते. खा. डॉ. बोंडे यांनी मोर्शी, वरुड, शेंदुरजनाघाट परिसरातील नागरिकांकडे पीआर कार्ड नसल्यामुळे घरकुलाचा लाभ येथील लाभार्थ्यांना मिळण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे प्रलंबित पीआर कार्ड प्रकरणांचा निपटारा करून नागरिकांना कार्ड मिळवून द्यावे, असेही या बैठकीत ठरवण्यात आले. मोर्शी तालुक्यातील लाडकी, येरला येथील पाण्याची टाकी शिकस्त झाली आहे. नवीन बांधण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी, तसेच वीज बील थकीत असल्यामुळे अडचणीत आलेला मोर्शी व चांदूर रेल्वे शहरातील पाणी पुरवठा तातडीने पूर्ववत करावा, असे निर्देशही खा. डॉ. बोंडे यांनी दिले. वरुड नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजार भरत असलेल्या जागेवरील आरक्षण रद्द करून लाभार्थ्यांना पट्टे वाटप करावे.

शिवाय वरुड तालुक्यातील एकलविहीर ते लिंगा रस्त्यासाठी अधिग्रहीत केलेल्या शेतक?यांच्या जमिनीचा मोबदला त्यांना त्वरित मिळवून द्यावा, असेही या वेळी ठरवण्यात आले. स्केटिंग खेळाचा प्रसार होण्यासाठी मोर्शी शहरातील क्रीडा संकुलाच्या किंवा नगर परिषदेच्या खुल्या जागेवर २० हजार चौरस फूट जागेवर रोलर स्केटिंग रिंग तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत कार्यवाही करावी, असेही या वेळी ठरवण्यात आले. पर्यटनाला चालना, स्केटिंग रिंग देणार पर्यटनाचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. नांदुरा येथील 'जय जवान जय किसान निसर्ग पर्यटन केंद्रा'ला चालना देण्याबाबत त्वरित कार्यवाही करावी. तसेच मेळघाटातील आमनेरी किल्ला स्थळ पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्याबाबत आराखडा तयार करण्याच्या संदर्भातही आढावा बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

# श्रीभक्तांच्या स्वागतासाठी 'श्री चिंतामणी' नगरी सज्ज

## मंगळवारी दर्शनासाठी लोटणार भक्तांची गर्दी

■ महासागर प्रतिनिधी,

**कळंब, दि. ३१:** संपुर्ण विदर्भाचे आराध्य दैवत मानल्या जाणाऱ्या जिल्ह्यातील कळंब येथे असलेल्या भगवान चिंतामणीणीच्या दर्शनाला रोजच भक्तांची रेलचेल असते. मात्र नववर्षाच्या पहिल्याच दिवशी श्रींच्या दर्शनासाठी केवळ विदर्भातूनच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासह देश-विदेशातून भक्तगण या ठिकाणी येतात. ही बाब लक्षात घेता यंदाही मंदीर प्रशासनाच्या वतीने नववर्षाच्या पर्वावर भक्तांना कुठलीही गैरसोय होवू नये यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत.



नववर्षाच्या पहिन्या दिवशी आराध्य देवता असलेल्या श्री चिंतामणीच्या दर्शनाचा बेत अनेक भाविक आखतात. त्यामुळे नववर्षाच्या पहिल्या दिवशी कळंब येथे भाविकांची मोठी गर्दी होते. त्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री चिंतामणी मंदिर प्रशासनाच्या वतीने नववर्षाच्या पर्वावर तयारी चालवली आहे. त्यात संपूर्ण मंदिर परिसराची साफसफाई करण्यात आली असून भक्तांनी रांगेत उभे राहून दर्शन घडावे, उन्हाचा त्रास होवू नये याकरिता परिसरात ताडपत्रीचा भव्य मंडप उभारण्यात आला आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री भक्ताची रीघ वाढल्यास दर्शनासाठी एक जानेवारीला रात्रीपर्यंत भक्तांची गर्दी लक्षात घेता दर्शनासाठी श्री गणेशांचा दरबार खुला ठेवण्याचे नियोजन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मंदिर प्रसादालयात दुपारी ११ ते २ या वेळात येणाऱ्या भक्तांची भोजनाची व्यवस्था करण्यात येणार असून भक्तांना शुद्ध थंड पाणी, स्वच्छतागृह, या संपुर्ण व्यवस्था परिसरातच असल्याने या व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यंदा भक्तांची गैरसोय होणार नाही याची दक्षता मंदिर समितीतर्फे घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# लसून-आल्याच्या कालबाह्य पेस्टचा वापर



## अडगावात ३२ विद्यार्थ्यांना विषबाधा

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३१:** मोर्शी तालुक्यातील अडगाव (विचोरी) येथील जिल्हा परिषद शाळेच्या ३२ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातून विषबाधा झाली. त्यापैकी गंभीर झालेल्या १८ जणांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. लसून आणि आल्याची कालबाह्य पेस्ट वापरुन शाळेत मसाले भात तयार करण्यात आला होता. शिवाय विद्यार्थ्यांना पुरवण्यात आलेली मटकीची उसळही अत्यंत शिळ्या कडधान्याची होती, हे या घटनेमागचे प्राथमिक कारण पुढे आले आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रासह जिल्हा परिषद प्रशासन हादरुन गेले होते.

त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी रविवारी मध्यरात्रीच अडगावात पोहचून उपचाराची सूत्रे हाती घेतली. दरम्यान आज, सोमवारी सकाळी जिल्हा परिषदेच्या सीइओ संजीता महापात्र व शिक्षणाधिकारी अरविंद मोहिरे यांनीही घटनास्थळी भेट देऊन वस्तुस्थितीचा आढावा घेतला. यावेळी मोर्शीच्या बीडीओ उज्वला ढोले तसेच पंचायत समितीचे इतर अधिकारी उपस्थित होते.

आढावा घेऊन परतल्या नंतर शिक्षणाधिकारी यांनी पाच जणांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या. तर दुसरीकडे सीइओ यांनी या घटनेच्या मुळाशी जाण्यासाठी चौकशी समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे. अडगावची प्राथमिक शाळा गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत.

या शाळेत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरतात. पटावर एकूण ८२ विद्यार्थ्यांची नोंद आहे. त्यापैकी शनिवारी ६५ विद्यार्थ्यांची नोंद झाली आहे. यापैकी काही

**काही विद्यार्थ्यांना त्या दिवशीच्या रात्रीपासूनच उलट्या व पातळ शौचासचा त्रास व्हायला लागला**

विद्यार्थ्यांना त्या दिवशीच्या रात्रीपासूनच उलट्या व पातळ शौचासचा त्रास व्हायला लागला. हळूहळू ही संख्या वाढत गेल्याने रविवारी उशीरा सायंकाळपर्यंत ३२ विद्यार्थी रुग्णालयात पोहोचले होते. दरम्यान ही माहिती माजी जि.प. सदस्य प्रशांत डहाणे व गावातील प्रमुख नागरिकांकरवी डीएचओ डॉ. सुरेश आसोले यांच्यापर्यंत पोहोचली. त्यामुळे प्रशासनाने लगेच पावले उचलून उपचारांची गती वाढविली. अडगावात शासनाचा आयुर्वेदिक दवाखाना आहे.

शिवाय याच गावाला जोडून असलेल्या विचोरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. या दोन्ही ठिकाणी तात्पुरता आंतररुग्ण विभाग तयार करुन डॉक्टर व वैद्यकीय क्षेत्रातील सुमारे ५० जणांची चमू पोहोचवून औषधोपचार सुरु करण्यात आला. दरम्यान औषधोपचार अधिक सूक्ष्म पद्धतीने पूर्णत्वास जाऊन विद्यार्थी लवकर बरे व्हावेत, यासाठी त्यापैकी १८ विद्यार्थ्यांना येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सूत्रांच्या मते शालेय पोषण आहाराचे वितरण करण्यापूर्वी मुख्याध्यापकांनी त्याची चव घेणे गरजेचे असते.

शिवाय शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांनाही ते अन्न तपासून पाहता येते. परंतु त्यात निष्काळजी झाल्याने विद्यार्थ्यांना विषबाधा झाली.

# श्रीरामपूर येथे कर्मयोगी गाडगे महाराजांची पुण्यतिथी

■ महासागर प्रतिनिधी,

**पुसद, दि. ३१ :** अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांनी बुरसटलेल्या समाजाचा विकास करण्यासाठी दिवसा हातात खराटा घेऊन ग्रामस्वचछता व रात्री कीर्तनातून मनाची शुद्धता करीत संतांचे उरलेले कार्य सिध्दीस नेणारे गाडगे महाराज एक थोर संत व समाजसुधारक होते, असे प्रतिपादन मुख्याध्यापक गणेश धर्माळे यांनी गाडगे महाराजांच्या पुण्यतिथीदिनी केले.



मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार विद्यालय श्रीरामपूर येथे कर्मयोगी गाडगे महाराजांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश धर्माळे तर प्रमुख अतिथी बाळकृष्ण मंदाडे, विशेष अतिथी छाया वाघमारे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून स्वच्छतेचे अग्रदूत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी राजनंदिनी काळे व पुजा पांडे यांनी सुरेल आवाजात स्वागतगीत सादर केले. रोहित पतंगे, हिना शेख मुकद्दर, आर्यन वाघमारे, लखन भालेराव, रोहन टारफे, रुपाली भगत यांनी गाडगे महाराजांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी धर्माळे पुढे म्हणाले की, गाडगे बाबा चालते बोलते विद्यापीठ होते. अनिष्ठ रूढी परंपरेचा विरोध कीर्तनातून चोरी करु नका, कर्ज काढू नका, व्यसनाच्या आहारी जाऊ नका अश्या अनेक बार्बीवर त्यांनी जनजागृती केली.

प्रमुख अतिथी बाळकृष्ण मंदाडे यांनी महाराष्ट्र समाजाचे व्यासपीठ, स्वच्छ्ता, प्रामाणिकपणा, भूतदया असणाऱ्या व देव हा दगड, धोंड्यात नसून माणसात आहे. अशी शिकवण देणारे गाडगेबाबा यांनी समाजात धर्माच्या नावाखाली होत असलेला अन्याय, अत्याचार, अनिती दूर करण्यासाठी आयुष्य वेचल्याचे सांगितले तर छाया वाघमारे म्हणाल्या गाडगे बाबा लोकांना सुग्रास जेवण देवून स्वतः काम करून शिळ्या भाकरीचे जेवन केले. गोधडीवजा फाटके कपडे घालून लेकी-सुना यांना नविन साड्या लुगडे दिली. कित्येक धर्मशाळा लोकांसाठी बांधल्या पण स्वतः उघड्यावर झोपले. त्यांचे जिवन धगधगते वैराग्य होते. राज्यातील प्रमुख शहरात व तीर्थक्षेत्री धर्मशाळा, आश्रमशाळा, नद्यांना घाट, पानपोया, गोरक्षण, अंध अपंगासाठी सदावर्त, मुलांसाठी शाळा कॉलेज व वसतिगृहे बांधली त्यांचे नावं अमरावती विद्यापीठास दिले यावरून त्यांचे मोठेपण सिद्ध होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अनिल अस्वार यांनी तर आभार दत्ता पांडे याने मानले.

# आरपीआय जिल्हाध्यक्षाचा शासकीय कार्यालयात आत्महत्येचा प्रयत्न

## प्रशासकीय वर्तुळात खळबळ



**यवतमाळ :** येथील प्रशासकिय इमारतीत असलेल्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या कक्षात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याने कांत्राटाचे बिल मिळत नसल्याने विष घेवून आत्महत्येचा प्रयत्न केला. अश्वजीत शेळके, असे विष प्राशन करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोमवारी सायंकाळी उशिरा घडलेल्या या प्रकाराने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अश्वजीत शेळके हे आरपीआय आठवले गटाचे युवा जिल्हाध्यक्ष आहेत. पुरवठा विभागाने गोदाम हमाल कंत्राटदाराचे दोन महिन्यांचे जवळपास साडेसहा लाख रुपयांचे देयक दिले नसल्याचा आरोप करत तरुणाने हे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येते. शासकीय धान्य गोदामातील हमालीचा कंत्राट देवानंद शेळके यांच्याकडे आहे. त्यांना नोव्हेंबर २०२३ पासून हे कंत्राट देण्यात आले आहे. मात्र त्यांनी बोगस कागदपत्रे जोडून कंत्राट घेतल्याची तक्रार प्रशासनाकडे आली. त्यात तथ्य आढळल्यानंतर हे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. देवानंद शेळके यांचे सप्टेंबर ते ऑक्टोबरमधील देयक पुरवठा अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. सोमवारी देवानंद शेळके यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी सुधाकर पवार यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. पवार यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने, ही सुनावणी पूर्ण होताच प्रलंबित देयक काढण्यासंदर्भात निर्णय होणार असल्याचे सांगितले. या चर्चेनंतर देवानंद शेळके पुरवठा अधिकाऱ्यांच्या कक्षातून बाहेर गेले. त्यानंतर काही वेळात ते आपल्या दोन मुलांसह पुन्हा कार्यालयात आले. यावेळी काही अभ्यागत कक्षात बसून होते. या ठिकाणी देवानंद शेळके यांनी पुरवठा अधिकाऱ्यांशी देयकावरून वाद घातला. यावेळी उपस्थित असलेल्या त्यांचा मुलगा अश्वजीत शेळके याने देयक न काढल्यास विष प्राशन करून आत्महत्या करण्याची धमकी दिली. पुरवठा अधिकारी पवार हे त्याला समजावत असतानाच त्याने खिशातून विषाची बाटली काढून विष प्राशन केले.

# बँकांपेक्षा खासगी सावकारांकडूनच शेतकऱ्यांना कर्ज

**अमरावती :** जिल्ह्यात बँकांपेक्षा खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले आहे. बेकायदेशीर सावकारीला बंदी घालणारा कायदा होऊनही शेतकरी सावकारांच्या तावडीतून सुटत नसल्याचे सहकार विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. जिल्ह्यातील ६३५ परवानाधारक सावकारांनी ६९ हजार २५१ शेतकऱ्यांना (कर्जदार) ९७.८१ कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. आजही अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. या कर्जाचा व्याजदर जास्त असतो. पण बँकांमार्फत पीक कर्ज वाटपासाठीचे निकष आणि त्यासाठी होणार विलंब यामुळे शेतकरी गावातील किंवा ओळखीतल्या सावकाराकडून कर्ज घेताना दिसून येतात. तारण ठेवून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. जिल्ह्यातील ६८ हजार ८८४ शेतकऱ्यांनी ९५ कोटी २९ लाख ८३ हजार रुपयांचे तारण (गहाण) कर्ज घेतले आहे, तर ३६७ शेतकऱ्यांनी २ कोटी ५१ लाख १९ हजार रुपयांचे बिगर तारण कर्ज घेतले आहे. संबंधित ६९ हजार शेतकऱ्यांनी हे कर्ज २५ एप्रिलपर्यंत संबंधित सावकारांना परत करायचे आहे. जिल्ह्यातील एकाही शेतकऱ्याला एकाही सावकाराने कृषी कर्ज दिले नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सर्वाधिक २३७ सावकार अमरावती तालुक्यातील असून १४९ अचलपूरचे आहेत. शेतकऱ्यांना पीककर्ज मिळवण्यासाठी दरवर्षी बँकांच्या अनेक फेऱ्या माराव्या लागतात. त्याचबरोबर सावकारांकडे काही तारण ठेवून त्यांना सहज पैसे मिळतात, परंतु त्यांना बँकेपेक्षा सावकारांना जास्त व्याज द्यावे लागते. तरीही कर्ज सहज उपलब्ध होत असल्याने बहुतांश शेतकरी सावकारांच्या कर्जावर अवलंबून आहेत. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण परवानाधारक ६३५ सावकार आहेत. त्यापैकी बहुतेकांनी यंदा परवान्याचे नूतनीकरण केले आहे. जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पाठोपाठ रब्बी हंगामातही बँकांनी पीक कर्ज वाटपास टाळाटाळ चालविल्याचे चित्र आहे. रब्बीत ४२० कोटी रुपयांच्या तुलनेत आतापर्यंत केवळ ७३.२७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण झाले आहे. कर्ज वाटपाचे प्रमाण १७टक्क्यांवर स्थिर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण कायम आहे. याआधी राज्यात मुंबई सावकारी नियंत्रण कायदा-१९४६अस्तित्वात होता. पण, या कायद्याअंतर्गत सावकारानं बळकावलेली जमीन संबंधित शेतकऱ्याला परत करण्याचे अधिकार जिल्हा उपनिबंधकांना नव्हते. कालांतराने हा कायदा रद्द झाला.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# सेंद्रिय शेतीच्या ओढीने...

**सध्या लोकांना पोषक, आरोग्यदायी खायचं आहे. म्हणूनच सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या फळं आणि भाज्यांना मागणी वाढते आहे. नोकऱ्यांची कमतरता असणाऱ्या काळात सेंद्रिय शेती हा उत्पन्नाचा चांगला मार्ग बनला आहे. कर्नाटकच्या अमोघ जगतापनेही एमबीए केल्यानंतर सेंद्रिय शेती करायला सुरुवात केली. त्याच्या भरारीविषयी...**

अचिव्हर

इंजिनिअरींग, एमबीए केलेले अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत. आयटी किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातल्या धकाधकीपेक्षा त्यांना नैसर्गिक वातावरणात शेती करणं आवडू लागलं आहे. कर्नाटकचा अमोघ जगताप अशाच काही तरुणांपैकी एक. अमोघला लहानपणापासूनच शेतीची ओढ लागली. शहरापासून दूर, निवांत ठिकाणी त्याच्या वडिलांनी फार्महाउस विकत घेतलं होतं. २० एकर परिसरात पसरलेल्या या फार्म हाउसच्या आसपास शेतीची चांगली संधी असल्याचं अमोघने हेरलं. त्याने बंगळूरूतून एमबीए केलं. यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रात जायचं की शेतीकडे वळायचं याचा निर्णय त्याला घ्यायचा होता. कॉर्पोरेट ऑफिसच्या कार्यालयात राबण्यापेक्षा जमीन कसायचा निर्णय त्याने घेतला आणि २०१६ मध्ये सेंद्रिय शेतीची सुरुवात केली. तो विविध धान्यं, डाळी, फळं, भाज्यांचं पीक घेतो. या माध्यमातून निसर्गाच्या जवळ जाण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तो शेतीतून वर्षाला ७ ते १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न घेतो. इतकंच नाही, तर तो पशुपालन आणि कुक्कुटपालनाचा व्यवसायही करतो.

यासाठी तो विविध संकल्पना लढवल्या आहेत. एकाच हंगामात जमिनीच्या एकाच तुकड्यावर दोन प्रकारची पिकं घेण्याचा प्रयोग त्याने केला. तो यशस्वी ठरला. कर्नाटकमधल्या मल्लावल्लीतल्या त्याच्या शेतात नारळाची ८०० झाडं आहेत. रक्तचंदनाची आणि साध्या चंदनाची प्रत्येकी एक हजार झाडं आहेत. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून तो पाण्याची बचत करतो.



विक्रीच्या बाबतीतही त्याने नव्या पद्धती आणल्या आहेत. मध्यस्थांना त्याने बाजूला सारलं आहे. आपली उत्पादनं थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ग्रीन व्हॅली नावाचं दुकान त्याने सुरू केलं आहे. मालावल्ली-म्हैसूरला जोडणाऱ्या रस्त्यावर त्याचं हे दुकान आहे. भाज्या, फळं, धान्यांसोबतच मध, गायी-म्हशींचं दूध आणि इतर दुग्धजन्य उत्पादनंही तो विकतो. मुख्य रस्त्यावर शेतकऱ्यांचा बाजार भरवतो. इथे सेंद्रिय शेती करणारे इतर शेतकरीही येतात. आपल्या उत्पादनांची विक्री करण्याची संधी त्यांना मिळते. या निमित्ताने तो अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतो. इतर शेतकऱ्यांच्या उत्पादनांना योग्य भाव मिळावा असाही त्यांचा प्रयत्न असतो.

## जोश

### फंडू एसएमएस

* तुझे महसूस करने का हर अहसास अजीब है, तू पास है तो पास है, जब दूर है तो भी पास है।

* हमें कहां मालूम था की इश्क होता क्या है, बस एक 'तुम' मिले और जिंदगी मोहब्बत बन गई।

* मेरे 'शब्दों' को इतने ध्यान से ना पढो दोस्तों, कुछ याद रह गया तो मुझे भूल नहीं पाओगे।

### स्मार्ट टिप्स

#### स्मार्टफोनची मेमरी फुल झाली तर...

आपल्या स्मार्टफोनमध्ये बरंच काही साठलेलं असतं. त्यामुळे मेमरी फुल होऊन जाते. अशा वेळी काय करायचं? पाहू या.

* अनवॉन्टेड फाईल्स डिलिट करा.

* नको असलेले फोटो आणि व्हिडिओ काढून टाका. व्हॉट्स ॲपमधला ऑटो डाउनलोडचा पर्याय काढून टाका.




* नको असलेली ॲप्स डिलिट करा.

* मोबाईलमध्ये कॅचे साठून राहतात. ते काढून टाका.

### हाऊ टू

#### आयफोनचा पासवर्ड विसरलाय?



आयफोनचा पासवर्ड विसरल्यानंतर आपली भंबेरी उडू शकते. हा पासवर्ड मिळवण्यासाठी ॲपलच्या सर्व्हिस सेंटरला भेट द्यावी लागते. अर्थात काही स्टेप्स फॉलो करून आयफोन अनलॉक करता येईल. मात्र यातला डाटा डिलिट होईल.

* सर्वात आधी मॅकबुक किंवा विंडोज पीसीमध्ये आय ट्यून्स ॲप डाउनलोड करून ते ओपन करा.

* आता आयफोन फोर्स रिस्टार्ट करायचा आहे. यासाठी व्हॉल्यूम आणि पॉवर बटण एकत्र दाबून सोडावं लागेल.

* यानंतर तुम्हाला रिस्टोअर किंवा अपडेटचा पर्याय दिसेल. यापैकी रिस्टोअर पर्याय निवडा. यानंतर आयट्यून तुमच्या फोनसाठी सॉफ्टवेअर डाउनलोड करेल. यासाठी साधारण १५ मिनिटं लागतील. यानंतर आयफोन 'रिकव्हरी मोड'मधून बाहेर पडेल.

### व्हॉट्स न्यू?

#### योगासने शिका ॲपवर!

फिटनेससाठी हजारो ॲप्स उपलब्ध आहेत. त्यावरून वर्कआऊटसाठी वेगवेगळे व्यायामप्रकार शिकता येतात. आता योगासनांसाठी सुद्धा अशी ॲप्स आली आहेत. या ॲप्सवरून तज्ज्ञांच्या मदतीने योगासनं शिकता येतील. यातील काही ॲप्स विनामूल्य आहेत तर काही ॲप्सवर अत्यल्प फी भरावी लागते. सध्या ॲप्सवरून योगासनं शिकण्याचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशी ॲप्स तयार होण्याचं प्रमाणही वाढत आहे. पण कोणत्याही ॲपवरून योगासनं शिकताना आधी खातरजमा करून घ्या. ॲपवरील माहिती गुगल किंवा जाणकारांकडून क्रॉसचेक करून घ्या. आपल्या वेळेनुसार योगासनं शिकता येतात हा या ॲपचा महत्त्वाचा फायदा आहे. अनेकांना व्यस्त दिनचर्येमुळे योगासनांच्या क्लासला जाता येत नाही. अशांसाठी ही ॲप्स महत्त्वपूर्ण ठरतात.



### सोशल मिडिया

#### असं करा गुगल सर्च...

दोस्तांनो, माहिती कोणतीही असो, ती शोधण्यासाठी आता पुस्तक उघडण्याची गरज राहिलेली नाही. गुगलने आपल्या सगळ्या समस्या सोडवल्या आहेत पण गुगल सर्च करताना काही अडचणी येऊ शकतात. या टिप्सनी तुम्ही झटपट गुगल सर्च करू शकता. * स्पेलिंग सर्च करायचं असेल तर त्या शब्दाशी संबंधित दोन-चार अक्षरं लिहा. या अक्षरांच्या मध्ये '&' किंवा 'or' हा शब्द टाकून सर्च करा. स्पेलिंग लवकर सापडेल. * वेबसाईट सर्च करताना साईटशी संबंधित माहिती लिहा. मध्ये 'ब' चिन्ह टाका. साईट्स मिळतील. * एखाद्या साईटवरचा ठराविक लेख वाचायचा असेल तर साईट ॲड्रेस टाकून लेखाचा विषय टाका. लेख लवकर सापडेल. * टायटल किंवा यूआरएल शोधायचं असेल तर intitle: लिहून तो शब्द लिहा. * एकाच प्रकारच्या वेबसाईट्स शोधायच्या असतील तर related: टाकून ती साईट टाका.

# सुपर ट्रेंडी शर्ट्स

फॅशन पॅशन

मित्रांनो, एखादा छानसा शर्ट तुमचा लूक पटकन खुलवू शकतो. ऑफिस पार्टी असो, मीटिंग असो किंवा व्हॅलेंटाईन्स डे डेट असो शर्टचे काही ट्रेंडी पर्याय कोणत्याही ऑकेजनची शान ठरतात. टिपिकल प्लेन, स्ट्राईप्स किंवा चेक्सवाल्या शर्टपेक्षा काहीतरी वेगळं ट्राय करायचं असेल तर हे पर्याय खास तुमच्यासाठी आहेत.

* कलरब्लॉक्ड म्हणजे दोन रंगांचा सॉलिड शर्ट तुमच्याकडे असायला हवा. त्यातही व्हाईट आणि ग्रे कॉम्बिनेशन खूपच भारी दिसतं. उन्हाळा असो किंवा हिवाळा, पार्टी असो डेट... हा शर्ट कोणत्याही प्रसंगी शोभून दिसेल. अशा शर्ट तुमच्या वॉर्डरोबमध्ये असायलाच हवा.

* तुम्हाला प्रिंट्स आवडत असतील तर प्रिंटेड कॉटन शर्ट खरेदी करता येईल. डिसेंट प्रिंट्सचे शर्टही मिळतात. प्रिंटेड व्हाईट शर्ट खूपच खुलून दिसतो. असा शर्ट कोणत्याही रंगाच्या ट्राउझरवर घालता येईल.

* तुम्हाला जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर प्रिंट आणि स्ट्राईप्सचं कॉम्बिनेशन असणारा शर्ट कॅरी करता येईल. ब्लॅक ॲंड व्हाईट किंवा व्हाईट ॲंड ब्लू असं कॉम्बिनेशन तुम्ही करू शकता.

* ट्रॉपिकल प्रिंट्स आवडत असतील तर असे शर्ट्स घालता येतील. पांढऱ्या रंगाचा ब्लॉसम प्रिंट कॉटन शर्ट खरेदी करता येईल. हा शर्ट जीन्सवर खूप छान दिसेल. त्यासोबत स्नीकर्स घाला आणि कॅज्युअल दिसा.



* सौम्य फ्लोरल प्रिंटवाले शर्ट भाव खाऊन जातात. तुम्ही असे शर्ट घेऊ शकता. पांढऱ्या रंगावर फ्लोरल प्रिंट्स शोभून दिसतात. कॅज्युअल ऑकेजनसाठी जीन्सवर हा शर्ट घाला आणि ऑफिसला जाताना ट्राउझर कॅरी करा.

* जिओमेट्रिक प्रिंट्स इन आहेत. अशा प्रिंटचा पिवळ्या रंगाचा शर्ट शोभून दिसेल. ब्रंच किंवा कॉफी डेटसाठी हा शर्ट परफेक्ट आहे.

* पार्टी वेअर प्रिंटेड श[illegible] तुमच्याकडे असायला हवा. ने[illegible] ब्लू प्रिंटेड शर्ट खास दिसेल.

* एखादा चेक्सवाला घ्यायला हरकत नाही. थोडे मो[illegible] आकाराचे चेक्स शोभून दिसती नेव्ही ब्लू चेक्स शर्ट हटके दिसेल.

# दाढीधारी बनण्यासाठी

ग्रुमिंग

मुलांचा चिकना चुपडा, गुळगुळीत दाढी केलेला चेहरा मुलींना आवडेनासा झाला आहे म्हणे... म्हणूनच का सध्या सगळे गब्रू जवान दाढीधारी झाले आहेत? पण मित्रांनो, हा रफ ॲंड टफ लूक तुम्हाला खूप छान दिसतो बरं का... गरज आहे ती दाढीच्या जपणुकीची. काही टिप्स फॉलो करा आणि बघा, तुम्हीही रितेश, ऋतिक, अजय, सिद्धार्थ, वरुण, रणवीरच्या पंक्तीत आरामात जाऊन बसाल. अगदी प्राचीन काळापासून दाढी हे पुरुषांच्या शक्तीचं प्रतीक मानलं गेलं आहे. दाट आणि मजबूत दाढी पुरुषांची पोलादी ताकद दर्शवतं. म्हणूनच दाढी राखणं हे अनेक युवकांचं स्वप्न असतं. त्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. पण लक्षात घ्या, दाढी वाढण्याची गती आणि मजबुती वय आणि जेनेटिकवर अवलंबून असते. * दाढी लवकर वाढावी यासाठी आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचं सेवन वाढवावं. प्रोटीन्सअभावी दाढी खुरटी राहते. * दाढी वाढवण्याच्या प्रयत्नात असाल तर पुरेशी झोप घ्या. * दिवसातून आठ ग्लास पाणी प्यायलाच हवं. यामुळेही दाढी लवकर वाढेल.



* केस गळू नयेत यासाठी तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. * वेळोवेळी चेहऱ्यावरील मृत त्वचेचा थर दूर करत राहिल्यास दाढी वाढण्यास मदत होते. त्यामुळे पुरुषांसाठी असणाऱ्या एक्सफोलिएट मास्कचा वापर करेल. नवीन केस येण्यास मदत होईल. * दाढी वाढवण्यासाठी संयम राखायला हवा. एकदा दाढी चांगली वाढली की मधल्या गॅप्स भरल्या जातात आणि हवा तसा लूक मिळतो. * एकदा दाढी वाढली की तिची निगा राखा. यासाठी चांगल्या दर्जाच्या कंडिशनरचा वापर करा. यासाठी एरंडेल तेल सर्वोत्तम समजलं जातं. तुम्ही खोबरेल तेल, ऑलिव्ह ऑईल, पेपरमिंट ऑईलने मसाज करा. यामुळेही योग्य पोषण मिळेल आणि दाढी चांगली दिसेल. * दाढी चांगली राहण्यासाठी आहारात व्हिटॅमिन बी १, बी ६, बी १२ युक्त पदार्थांचा वापर करावा. यामुळे केसांचं उत्तम पोषण होईल.

# नातं योग्य आहे का?

मॅच मेकिंग

मी आर्थिकदृष्ट्या सक्षम २७ वर्षांची तरुणी असून पाच वर्षांनी लहान असलेल्या मुलाच्या प्रेमात पडले आहे. आम्ही शेजारी आणि बालपणीचे मित्र आहोत. आमच्या कुटुंबियांना हे नातं मान्य होणार नाही, याची मला कल्पना असली तरी या नात्याला एक संधी द्यावी, असं मला वाटतं. बहुतेक त्यालाही मी आवडते. दुसरं म्हणजे तो फक्त २२ वर्षांचा असून मास्टर्स अभ्यासक्रमाची तयारी करत आहे. या नात्याचं मर्म त्याला कळेल का? वयातल्या अंतरामुळे भविष्यात काही समस्या निर्माण होतील का? मी खूप गोंधळून गेले आहे.



**उत्तर :** बराच काळ एकत्र घालवल्यानंतर एखाद्याबद्दल आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. पण हे फक्त आकर्षण आहे का प्रेम, हे जाणून घे. त्यातच त्याला तू आवडतेस किंवा नाही याबद्दल निश्चित असं काहीच सांगता येत नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे बोल. त्याला आत्ता नातेसंबधात अडकायचं आहे का, हे जाणून घे. अवघा २२ वर्षांचा हा मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर झालेला नाही. त्यामुळे तू एखाद्या समुपदेशकाची मदत घे. भविष्याचा विचार सध्या तरी करू नकोस. सद्यस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न कर. नात्यात समर्पण आणि विश्वासाची गरज असते. वयातल्या अंतरावर मात करून अनेकजण सुखी संसार करत आहेत. पण आधी या मुलाच्या मनातलं जाणून घे आणि मगच पुढे जा.

# पास्त्याला द्या ट्विस्ट

झटपट रेसिपी

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडत असेल. भरपूर चीज घातलेला, रेड किंवा व्हाईट सॉसमधला पास्ता बघितला की तोंडाला पाणी सुटतं. याच पास्त्याला आपण देसी ट्विस्ट देऊ शकतो. हा पास्ता करायची पद्धत अगदी सोपी आहे. चला तर मग, या इंडियन स्टाईल पास्त्याची रेसिपी जाणून घेऊ या.

**साहित्य :** एक कप पास्ता, चार कप पाणी, चिरलेला कांदा, टोमॅटो, चमचाभर आलं-लसूण पेस्ट, दोन हिरव्या मिरच्या चिरून घ्या. लाल तिखट, गरम मसाला, एक चमचा मैदा, तीन चमचे दूध, ऑलिव्ह ऑईल(नेहमीचं तेलही चालेल), मीठ, चिरलेली कोथिंबिर

**कृती:** भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात थोडं मीठ आणि तीन ते चार थेंब तेल घाला. पाणी उकळल्यावर त्यात पास्ता घाला. सहा ते आठ मिनिटं शिजवून घ्या. पाणी काढून पास्ता बाजूला ठेवा. कढईत दोन चमचे तेल गरम करा. कांदा आणि हिरव्या मिरच्या परतून घ्या. त्यात आलं लसूण पेस्ट घालून हलवा. यानंतर टोमॅटो घालून शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजले की त्यात मैदा घाला. परतून घ्या. यात दूध, चवीनुसार लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. दूध नको असेल तर त्याऐवजी पास्ता शिजवलेलं पाणी घालता येईल. आता सर्व पदार्थ एकजीव करा. मीठ आणि तिखटाचं प्रमाण थोडं जास्त ठेवा. कारण आपल्याला अजून पास्ता घालायचा आहे. या मसाल्यात पास्ता घालून नीट हलवून घ्या. पास्त्याला नीट मसाला लागला पाहिजे. गॅस बंद करा. वरून कोथिंबिर घाला. गरमागरम खा.



# अनुभवा सर्फिंगचा थरार

भटकंती

आपल्या भारतातही वॉटर स्पोर्ट्स बरंच लोकप्रिय होत आहे. स्कुबा डायव्हिंग, रिव्हर राफ्टींग, सर्फिंग, मोटर बोटची सफर असे बरेच पर्याय उपलब्ध आहेत. वॉटर स्पोर्टसचा थरार वेगळाच असतो. तुम्हाला सर्फिंग करावंसं वाटत असेल तर भारतातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांना भेटी देता येतील. सर्फिंगचे हे काही देसी पर्याय...

* वॉटर स्पोर्ट्सचा भन्नाट अनुभव घेण्यासाठी पुडुचेरीला भेट द्या. इथले स्वच्छ आणि सुंदर समुद्रकिनारे तुम्हाला आकर्षित करतील. इथल्या समुद्रातल्या लाटांवर स्वार होऊन मस्तपैकी सर्फिंग करता येईल. इथला सेरेनिटी समुद्रकिनारा सर्फिंगसाठी प्रसिद्ध आहे. तसंच अन्य आकर्षक समुद्रकिनारेही आहेत.

* केरळ हे भारतातल्या सुंदर राज्यांपैकी एक. केरळचा कोवलम समुद्रकिनारा खूप प्रसिद्ध आहे. इथेही सागराच्या उंच उंच लाटांवर स्वार होऊन सर्फिंगचा आनंद लुटता येईल.

* कर्नाटकमधल्या गोकर्णचा समुद्रकिनारा खास आहे. हा समुद्रकिनारा पर्यटकांचं खास आकर्षण ठरतो. हा समुद्रकिनाराही सर्फिंगसाठी उत्तम मानला जातो. इथे बरेच पर्यटक सर्फिंगसाठी येतात. इथल्या महाबळेश्वर मंदिराला भेट दिल्यानंतर लोक गोकर्णच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन सर्फिंगचा थरार अनुभवतात. तुम्हीही अशी एखादी सहल ठरवू शकता.

* गोवा हे पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देशाविदेशातले पर्यटक गोव्याला भेट देत असतात. इथले शांत आणि सुंदर समुद्रकिनारे पर्यटकांचं मन मोहवून टाकतात. इथला निसर्ग प्रेमात पाडतो. गोव्यातही सर्फिंगची संधी मिळते. इथे बरेच सर्फिंग पॉईंट्स आहेत. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत सर्फिंग करता येईल.

यंदा पर्यटनाच्या काही वेगळ्या वाटा निवडून आनंद द्विगुणित करता येईल.



# इंजिनिअरिंग इन रबर टेक्नॉलॉजी

वेगळ्या वाटा

दोस्तांनो, इंजिनिअरींग म्हटलं की ठराविक शाखांचा विचार मनात येतो. सॉफ्टवेअर, कॉम्प्युटर, सिव्हिल, ऑटोमोबाईल या इंजिनिअरींगच्या कॉमन शाखा आहेत. सहसा कुणी या पर्यायांपलीकडे बघत नाही. पण इंजिनिअरींगचं क्षेत्र प्रचंड मोठं आहे. सरधोपट शाखा निवडायच्या नसतील तर रबर टेक्नॉलॉजीचा पर्याय तुमच्याकडे आहे.

* रबराचा वापर प्रत्येक क्षेत्रात केला जातो. रबर टेक्नॉलॉजी ही इंजिनिअरींगची शाखा असेल असा विचार आपल्या मनात सहसा डोकावत नाही. पण या क्षेत्रात तुम्ही उत्तम भविष्य घडवू शकता.

* रबर टेक्नॉलॉजीत रबराच्या विविध वस्तू घडवल्या जातात. नैसर्गिक रबरापासून लेटेक्स आणि सिंथेटिक रबरवर प्रक्रिया केली जाते. या रबरापासून वेगवेगळी उत्पादनं बनवली जातात.

* बारावीत फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे विषय घेऊन रबर टेक्नॉलॉजी निवडता येईल. रबर टेक्नॉलॉजीशी संबंधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बीई, बीटेक, डिप्लोमा यापैकी कोणताही पर्याय तुम्हाला निवडता येईल.



* हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर टेस्टिंग टेक्नॉलॉजिस्ट, टेक्निशियन, प्रोडक्शन इंजिनिअर, पॉलिमर स्पेशलिस्ट, मटेरियल टेक्नॉलॉजिस्ट अशा विविध पदांवर काम करता येईल.

* रबर क्षेत्रासोबतच ऑटोमोबाईल क्षेत्रातही तुम्ही काम करू शकता. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत.

* गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, गांधीनगर, इंडियन रबर इन्स्टीट्यूट कोलकाता, हिंदुस्तान कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चेन्नई, आयआयटी खरगपूर या ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

# ..हे तर पोलिसांचे अपयश!

## अनिल देशमुखांची सरकारवर टीका

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी वाल्मीक कराड शरण प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे.



अनिल देशमुख म्हणाले, मला असे वाटते की गेल्या 22 दिवसांपासून वाल्मीक कराड फरार होते. एवढ्या दिवसात महाराष्ट्रातील पोलिस त्यांना शोधू शकली नाही. शेवटी पुण्यात वाल्मीक कराड स्वतःहून शरण आला. हे एका अर्थी अपयश म्हणावे लागेल.

एवढे आंदोलन होत आहेत, तरी देखील आरोपी सापडत नाहीत. अजूनही 3 आरोपी अद्याप फरार आहेत. लवकरात लवकर कारवाई केली पाहिजे.

परभणीची घटना सोमनाथ सूर्यवंशीची, कल्याणची घटना विशाल गवळीची, त्याचसोबत अकोला पातूरमध्ये तसेच बीडमध्ये हवेत गोळीबार करणारे सापडत आहेत, अशा अनेक घटना महाराष्ट्रात घडत आहेत. नागपूरमध्ये 36 तासांत तीन खून झाले आहेत. या सगळ्या घटना घडत आहेत यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गृहखात्याचे याकडे लक्ष आहे की नाही? असा प्रश्न यामुळे उपस्थित होत असून, महाराष्ट्रातली कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती सुधरली पाहिजे.

लाखो लोक रस्त्यावर येतात आणि आक्रोश करतात आणि तो आरोपी 23-23 दिवस फरार राहतो, त्यामुळे आता पोलिसांनी तातडीने कारवाई केली पाहिजे, अशी मागणी अनिल देशमुख यांनी केली आहे.

# पुरावे नष्ट केल्यावर सरेंडर?

## कराडच्या मागे खूप मोठी शक्ती, वडेट्टीवारांचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३१ :**
पुरावे नष्ट केल्यावर वाल्मीक कराडने सरेंडर केले? अशी शंका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केली आहे.



खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर 22 दिवस पोलिस - सीआयडी वाल्मीक कराडला पकडू शकले नाही. इतकेच नाही तर आज सरेंडर होताना हा कराड स्वतःच्या गाडीतून येतो. महाराष्ट्र पोलिस आणि गृहखात्याचे याहून मोठे अपयश असू शकत नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड आज शरण आला आहे. पुण्यातील सीआयडी ऑफीसमध्ये त्याने शरणागती घेतली.

विशेष म्हणजे या शरणगतीपूर्वी वाल्मीक कराडने एक व्हिडिओ जारी करून संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी आपला संबंध नसल्याचे म्हटले होते. यावरून विरोधकांकडून सरकारवर टीका केली जात आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही सोशल मीडियावर पोस्ट करून आपली प्रतिक्रिया दिली.

इतके दिवस वाल्मीक कराडला लपायला कोणी मदत केली? कोणाच्या संपर्कात तो होता? कोणाच्या सांगण्यावरून आज सरेंडर झाले या सगळ्यांचे सत्य समोर आले पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. महायुती सरकार आणि मंत्रिमंडळातील मोठ्या मंत्र्याविरोधात जनतेत वाढत असलेला रोष बघता, अखेर त्याला वाचवण्यासाठी धडपड करणाऱ्या शक्तींनी सरेंडर करण्याचे आदेश दिले आहेत का? असा सवालही त्यांनी केला.

या वाल्मीक कराडची हिंमत तर इतकी की, सरेंडर होण्याआधी हा व्हिडिओ रिलीज करतो आणि स्वतःला क्लिनचीट देतो, यातून त्याच्या मागे खूप मोठी शक्ती असल्याचे स्पष्ट आहे, असा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी जे कर्तृत्व दाखवले आहे ते पाहता पोलिस, सीआयडी निष्पक्ष चौकशी करू शकत नाही. त्यामुळे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी केली पाहिजे आणि ही चौकशी बीडच्या बाहेर झाली पाहिजे म्हणजे कोणीही दबाव टाकणार नाही, असेही ते म्हणाले.

# ..तर नागपुरातच सापडला असता वाल्मिक!

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३१ :**
बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड हा नागपुरातील हिवाळी अधिवेशनादरम्यान नागपूर जवळील एका फार्महाऊसवर लपून बसला आहे, असा आरोप करण्यात आला होता.



जर नागपूर आणि बीड पोलिसांनी गांभीर्य दाखवले असते तर वाल्मिक कराड हा नागपुरातच सापडला असता. त्याला नागपुरातच बेड्या ठोकण्यात आल्या असत्या. मात्र, वाल्मिक कराड खरचं नागपुरातील फार्महाऊसवर होता की निव्वळ अफवा होती, याबाबत पोलिसही संभ्रमात आहेत.

गेल्या ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणात तपास सुरु असतानाच वाल्मिक कराड हे नाव समोर आले. वाल्मिक कराडच्या सांगण्यावरुनच ही हत्या झाल्याचा आरोप विरोधकांनी केला, त्यानंतर बीडमधील कराडच्या दहशतीचे, अवैध धंद्यांचे, गुन्हेगारीचे अनेक प्रकरणे समोर येऊ लागले होते.

याच प्रकरणासंदर्भात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे नेते आणि अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असलेला वाल्मिक कराड हा घटनेच्या २१ दिवसांनंतर पुण्यात सीआयडीसमोर शरण आला आहे. बीड येथे पवनऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मिक कराडवर गुन्हा नोंद करण्यात आला. तेव्हापासून वाल्मिक कराडचा शोध सुरु होता.

गेल्या दोन दिवसांपासून सीआयडीने वाल्मिक कराडच्या कुटुंबीयांचीही चौकशी सुरु केली होती. तसेच त्याची बँक खाती गोठवून चांगलीच कोंडी केली होती.

नागपुरातील हिवाळी अधिवेशनामधील चर्चेतही वाल्मिक कराडचा उल्लेख करत चर्चा झाली होती. वाल्मिक कराडला मंत्री धनंजय मुंडे यांचा आशीर्वाद असल्याचे बोलले जाते. त्यामुळेच हिवाळी अधिवेशन काळात तो नागपुरात आला होता. तो काही साथिदारांसह नागपूर जवळील एका फार्म हाऊसमध्ये पार्ट्या करीत होता, अशी गोपनीय माहिती नागपूर आणि बीड पोलिसांकडे होती. मात्र, अधिवेशनादरम्यान पोलिसांनी वाल्मिक कराड याला सापळा रचून अटक करण्याबाबत गांभीर्य दाखवले नाही. त्यामुळे फार्महाऊसमध्ये काही दिवस मुक्काम ठोकल्यानंतर तेथूनही त्याने पलायन केल्याचे समोर आले आहे.

**कोण आहे हा वाल्मिक कराड?**

बीड जिल्ह्यात मोठे राजकीय प्रस्थ असलेली व्यक्ती म्हणून वाल्मिक कराडची ओळख आहे. परळी नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद भूषवलेला वाल्मिक याने मागील दहा वर्षांपासून मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघात वचक निर्माण केला आहे. यापूर्वी देखील वाल्मिक कराड हा कलम ३०७ सारख्या गुन्ह्यामुळे चर्चेत आला होता.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराड असल्याचे समोर आले आहे. केज पोलीस ठाण्यात वाल्मिक कराडविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वाल्मिक कराडचे अगदी विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार, विद्यमान मंत्री पंकजा मुंडे यांच्याबरोबरच बीडच्या राजकारणातील मोठ्या नेत्यांबरोबरचे फोटो इन्स्टाग्राम प्रोफाइलवर दिसतात. त्यामुळे त्याचे प्रस्थ मोठे असल्याचे बोलले जात आहे.

# वाल्मीक कराडवर मोक्का लावा..

## छत्रपती संभाजीराजे यांची मागणी

■ **वृत्तसंस्था कोल्हापूर, दि. ३१ :**
सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणाती संशयीत आरोपी वाल्मिक कराड याने आत्मसमर्पण केल्यानंतर छत्रपती संभाजीराजे यांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. वाल्मीक कराडवर मोक्का लावला पाहिजे, अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे.

संभाजीराजे म्हणाले, खंडणीच्या गुन्ह्यात नोंद केली आणि नंतर बेल घेऊन बाहेर पडणार हा खेळखंडोबा आम्ही सहन करणार नाहीत. तुम्ही मोका कसे लावणार, खुनाचा गुन्हा कसा लावणार यावर मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे. धनंजय मुंडे यांना पालकमंत्री करू नये हे देखील मी म्हणालो आहे. तसेच त्यांना पालकमंत्री केले तर मला बीडचे पालकत्व घ्यावे लागेल असे मी म्हणालो आहे. त्यांना मंत्रीपदावरच घ्यायला नको आहे, त्याशिवाय न्याय मिळणार नाही, असे छत्रपती म्हणाले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्ये बीडमध्ये जवळपास सीआयडीच्या 9 टीम कार्यरत असून, 150 हून अधिक सीआयडीचे अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

# केज ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांची वाल्मीकला मदत

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३१ :**
केज पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांनी वाल्मीक करायला मदत केली असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. वाल्मीक कराड अद्याप बाहेर कसा होता? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला वाल्मिक कराड पुण्यामध्ये सीआयडी समोर शरण आल्यानंतर आव्हाड यांनी या प्रकरणावरुन राज्य सरकारवर टीका केली आहे.

या संदर्भात बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, यांची एक चूक सापडली अजून यांच्या अजून किती चुका सापडायच्या आहेत? वाल्मीक कराड हा 307 चा आरोपी आहे. त्या केस मध्ये त्याला अटक का केली नाही? ज्या केज पोलिस स्टेशनमध्ये हा गुन्हा दाखल आहे. त्या केज पोलिस ठाण्यातच महाजन नावाचे इन्स्पेक्टर आहेत. तेच महाजन हे आंधळे यांच्या खून प्रकरणात तपासा अधिकारी आहेत. असे संबंध इथे बसून देखील जोडता येत असल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे.

सध्या केज मध्ये असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनीच कराडला मदत केली, ज्या केस मध्ये बबन गीते नव्हताच, त्या केस मध्ये बबन गीते याला आरोपी करण्यात आले आणि वाल्मीक करायला मोकळे करण्यात आले. त्यामुळे आता पर्यंत वाल्मीक कराड मोकळा फिरत असल्याचा दावा आव्हाड यांनी केला आहे.

**आव्हाड आक्रमक**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. मात्र या प्रकरणात वाल्मीक कराड हा दोषी असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार सुरेश धस यांनी केला आहे.

या प्रकरणात वाल्मीक कराडवर अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र या संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हाच दोषी असल्याचा आरोप सर्वच स्तरातून होत आहे.

## हिंगोली गोळीबार प्रकरण

# मृतकांची संख्या तीनवर

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. ३१ :**
हिंगोलीच्या प्रगतीनगर भागात सासुरवाडीत येऊन पोलिस कर्मचाऱ्याने केलेल्या गोळीबारात जखमी सासूचा उपचार सुरु असतांना मृत्यू झाला असून या घटनेमुळे वाई (ता. कळमनुरी) गावातील वातावरण सुन्न झाले आहे. मागील दोन दिवसांपासून गावातील चुलही पेटली नाही.

वसमत शहर पोलिस ठाण्यातील कर्मचारी विलास मुकाडे याने २५ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास हिंगोली येथे सासुरवाडीत येऊन गोळीबार केला. यामध्ये त्याची पत्नी मयुरी मुकाडे यांचा जागीच मृत्यू झाला. तर सासू वंदना धनवे व मेहुणा योगेश धनवे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर हिंगोलीच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेडच्या शासकिय रुग्णालयात हलविण्यात आले होते. या दोघांना उपचारासाठी नांदेडला हलविल्यामुळे वाई येथील बहुतांश गावकरी नांदेड येथे होते.

दरम्यान, उपचार सुरु असतांना योगेश यांचा रविवारी मृत्यू झाला. या घटनेनंतर वाई गावाला मोठा धक्का बसला असतांच वंदना धवने यांच्या मृत्यूची वार्ता आली.

मयत वंदना धनवे यांचे पती प्रसाद धनवे हे राज्य राखीव दलात कार्यरत होते. कर्तव्यावर असतांनाच त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या जागेवर वंदना धनवे यांना कक्ष सेविका या पदावर नोकरी मिळाली होती. या नोकरीवर त्यांनी योगेश व मुलगी मयुरी यांचा सांभाळ केला.

मयुरीचा विवाह लाऊन दिल्यानंतर योगेश अन वंदना हे दोघेच घरी राहात होते. या घटनेमुळे संपूर्ण धनवे कुटुंबच उध्वस्त झाले आहे. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली असून मागील दोन दिवसांपासुन गावात चुलही पेटली नसल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

## : मुलखावेगळी माणसं :




# रक्ताने चित्र रेखाटणारे अवलिया संतोष कटारे

एखाद्या कलेत अनेक कलाकार पारंगत असतात. त्यांना नावलौकिक देखील मिळालेला असतो. पण मग,याच कलेच्या प्रवाह रुपी डोहात आपण देखील उडी मारून त्यांच्यापैकीच एक असा नाव लौकिक मिळविण्यात काहींना स्वारस्य नसत. म्हणूनच मग प्रवाहाविरुद्ध पोहून स्वतःमधील आगळ्यावेगळ्या कलाकारांची ओळख असे अवलिया जगाला करून देतात.

अशा अवलिया कलाकारांपैकी एक मुलखावेगळं व्यक्तिमत्व म्हणजेच नाशिक जिल्ह्यातील देवळाली स्थित संतोष कटारे हे एक आहेत. सामान्य चित्रकार हे विविध रंगांचा वापर करून अद्भुतगम्य अशी चित्र रेखाटतात,मात्र संतोषजी आपल्या स्वतःच्या रक्ताने चित्र रेखाटून जगासमोर आपले वेगळेपण सिद्ध करतात. अलीकडेच बॉलिवूडस्टार सलमान खान याचा वाढदिवस साजरा झाला. एक सुपरस्टार कलाकार म्हणून सलमान सर्वपरिचित आहेच. परंतु त्याच्या बीइंग ह्युमन सारख्या संस्थेच्या माध्यमातून त्याने अनेक गरजूना भरभरून आर्थिक मदत केलेली आहे.

सलमानच हेच दातृत्व आणि समाजाप्रती असलेली कळवळं पाहता त्याच्या फॅन्स मध्ये करोडोंची भर पडते. संतोष कटारे हे देखील सलमानचे फॅन आहेत. म्हणूनच सलमानच्या वाढदिवसाचे औचित्य साधून संतोषजी यांनी मुंबईत एका जाहीर कार्यक्रमात स्वतःचे रक्त काढून सलमानचे चित्र खास भेट म्हणून रेखाटले आणि सगळ्यांनाच थक्क केले.

संतोष कटारे मागील १५ वर्षांपासून अशा पद्धतीने स्वतःच्या रक्ताने जे महापुरुष समाजाचे आदर्श आहेत, ज्यांचं कर्तृत्व अतुलनीय आहे अशा महापुरुषांची चित्र रेखाटत आहेत. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, येशू, भगतसिंग, राजगुरू, गुरु नानक, महात्मा जोतिबा फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी, अण्णाभाऊ साठे, भारताचे संविधान, राष्ट्रगीत,अशी सुमारे ६० पेक्षा अधिक चित्र संतोषने आजवर रक्ताने रेखाटली आहेत.

अशी चित्र रेखाटताना प्रत्येक वेळी चित्राच्या आकारमानानुसार रक्त कमी अधिक प्रमाणात लागत. संतोष कटारे यांचे एक मित्र सचिन मोरे या हे देखील चित्रकार होते. मात्र त्यांचे अकस्मात निधन झाले. आपल्या मित्राची रक्ताने चित्र रेखाटण्याची इच्छा संतोष यांनी आता पूर्ण केली आहे. संतोष यांना त्यांच्या या कलेबद्दल अमेरिका विद्यापीठाने डिलीट पदवी बहाल केली आहे. तर अभिनेता अरबाज खान यांच्या हस्ते संतोष यांचा ब्लड आर्टिस्ट म्हून सन्मान देखील करण्यात आला होता. आपल्या या आगळ्यावेगळ्या चित्रकलेचे लवकरच संतोष कटारे एक प्रदर्शन भरविणार आहेत. त्यांना मनपूर्वक शुभेच्छा. ■ ■

## : चलती का नाम गाडी :

टाटा मोटर्स,या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने त्यांच्या उत्तराखंडमधील पंतनगर प्लांटमध्ये कामगारांच्या वाहतुकीसाठी समर्पित इलेक्ट्रिक बसेसच्या ताफ्याला हिरवा झेंडा दाखवला.



# टाटा मोटर्सच्या इलेक्ट्रिक बसेस दाखल

या स्वदेशी बनावटीच्या, शून्य-उत्सर्जन बसेस नवीनतम वैशिष्ट्यांसह सुसज्ज आहेत आणि प्रगत बॅटरी सिस्टमद्वारे समर्थित आहेत. TML स्मार्ट सिटी मोबिलिटी सोल्युशन्स लिमिटेड टाटा मोटर्सची पूर्ण मालकीची उपकंपनी, टाटा अल्ट्रा 9 इलेक्ट्रिक बसेसच्या आधुनिक ताफ्यासह या कामगारांच्या प्रवासाची सोय करेल.सुरक्षित, आरामदायी आणि सोयीस्कर प्रवास प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेली, ही ई-बस सेवा ५,००० हून अधिक लोकांना स्वच्छ आणि हरित वाहतूक प्रदान करून कार्बन फूटप्रिंट कमी करेल आणि वार्षिक ~ १,१०० टन $CO_2$ उत्सर्जन वाचवेल. १६टह सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी वीज ई-बस फ्लीटला चार्ज करेल, ज्यामुळे संपूर्ण ऑपरेशन एंड-टू-एंड ग्रीन होईल.

लॉन्चची घोषणा करताना टाटा मोटर्स कमर्शियल व्हेइकल्सचे उपाध्यक्ष आणि ऑपरेशन्स प्रमुख विशाल बादशाह म्हणाले, ह्कामगारांच्या प्रवासासाठी इलेक्ट्रिक बसेसचा परिचय हा टाटा मोटर्सच्या कमर्शियल व्हेइकल्सच्या निव्वळ शून्य गाठण्याच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

२०४५ पर्यंत हरितगृह वायू उत्सर्जन. करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत सोर्सिंगपासून विकास आणि अभियांत्रिकी ते ऑपरेशन्सपर्यंत त्यांच्या संपूर्ण मूल्य शृंखलेमध्ये टिकाऊपणा एकत्रित करून आमच्या सर्व उत्पादन सुविधा हिरव्या आहेत. हा उपक्रम प्रथम पंतनगरमध्ये सुरू करताना मला आनंद होत आहे कारण तो सुविधेच्या असंख्य शाश्वत उपक्रमांच्या यशात भर घालतो आणि त्याची कबुली देतो. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

## लाडकी बहीण योजना योग्य की अयोग्य?

**लता वाघमारे (गृहिणी)**

लाडकी बहीण योजना योग्य असून, ती स्त्री सशक्तीकरणाला बळकटी देणारी आहे. कौटुंबिक जाबदाऱ्यांची धुरा महिला समर्थपणे सांभाळत असताना देखील,अनेक घरांमध्ये याच महिलांच्या हाती साधी शंभराची नोट तिच्या स्वतःच्या गरजांसाठी नसते. या योजनेतील २ कोटी महिलांपैकी १ कोटीहून अधिक महिला दुर्बल घटकातील आहेत. सरकार द्वारे तमाम महिलांच्या बँक खात्यामध्ये पैसे जमा होऊ लागले आहेत आणि स्त्रिया त्या खर्च करताहेत, हे सुखद आहे.

**अमेय गोगटे (पत्रकार)**

लाडकी बहीण योजना महायुती सरकारने निव्वळ निवडणुकांवर डोळा ठेऊन सुरु केलेली दिखाऊ योजना आहे. अशा प्रकारे लोकांच्या कराचा पैसा फुकट वाटणे चुकीचे आहे. अगोदरच महाराष्ट्राच्या तिजोरीवर प्रचंड कर्जाचा बोजा आहे आणि त्यावर आता कडी म्हणजे हि योजना सरकारने सुरु केलेली आहे. या योजनेमुळे सरकारी संस्थांमधील अनेक विभागामधील कर्मचाऱ्यांचे पगार थकू लागलेलं आहेत. शिवाय, समाजातील इतर महत्वपूर्ण घटकांच्या योजनांसाठी जो निधी असतो तो नाहक या लाडकी बहीण योजनेकडे वर्ग केला जात आहे. सरकारच्या अशा अघोरी योजनेमुळे महाराष्ट्र लवकरच खड्डयात जाईल. गंमत म्हणजे या योजनेचा लाभ श्रीमंत,आणि मध्यमवर्गीय नोकरदार महिला देखील घेत आहेत ही चेष्टाच आहे. ■ ■

## एमएचटी-सीईटी अर्जासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३१ :**
शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये होणाऱ्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या एमएचटी-सीईटीची विद्यार्थी नोंदणीची प्रक्रियाही सुरू करण्यात आली असून अर्ज भरण्यासाठी 15 फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे.

सीईटी सेलकडून पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या एकूण 19 प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. त्यासाठीचे संभाव्य वेळापत्रक सीईटी सेलने उपलब्ध करून दिले आहे. त्यानुसार सीईटी परीक्षा मार्चपासून सुरू होणार आहेत. या परीक्षांसाठीची नोंदणी प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली आहे.

## ३ जानेवारीपासून थंडीचा कडाका

**नाशिक :** हिमालयात पुन्हा पश्चिमी चक्रवात येत असल्याने तेथे हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यात नाशिक, छत्रपती संभाजीनगरसह 11 जिल्ह्यांत 3 ते 7 जानेवारीपर्यंत थंडीचा कडाका वाढण्याचा अंदाज पुणे हवामान विभागातील निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तवला आहे. महाराष्ट्रात थंडीचा प्रकोप सुरू होण्याचे संकेत आहेत.

## हे सर्व घडवलेले नाट्य?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :**
वाल्मीक कराडच्या शरणागतीवर शंका उपस्थित करत शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय मुंडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चर्चेनंतरच कराडकडून सरेंडर करण्यात आले, हे सर्व घडवलेले नाट्य आहे का? असा प्रश्न भास्कर जाधव यांनी उपस्थित केला आहे. जाधव म्हणाले, नाव मोठे आणि लक्षण खोटे अशी परिस्थिती आज महाराष्ट्रात पोलिस खात्याची झाली आहे. पोलिसांच्या हाती न लागता कराड स्वतःच पोलिस स्टेशनला जावा हे सगळे घडवलेले नाट्य आहे का, अशी शंका जाधव यांनी उपस्थित केली.

# मानव - वन्यजीव संघर्षात १० जणांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ३१ :**
गडचिरोली जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेला मानव-वन्यजीव संघर्ष थांबण्याचे नाव घेत नाही. सरत्या २०२४ या वर्षात वाघांनी सहा तर रानटी हत्तींनी चार असे एकूण १० बळी घेतले.

गडचिरोली जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांपासून वाघांसह रानटी हत्तींनी धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नागरिकांना दहशतीत राहाव लागत आहे. शिवाय शेतीपिकांची नासाडी होत आहे. गेल्या वर्षभरात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात १० नागरिकांना जीव गमवावा लागला. २०२४ या नवीन वर्षाची सुरुवात होताच ३ जानेवारीला वाकडी येथील एका महिलेचा बळी वाघाने घेतला. या वर्षाची सुरुवातच वाघाच्या हल्ल्याने झाली. त्यानंतर याच महिन्यात वाघाने चार बळी घेतले. मानव-वन्यजीव संघर्ष उन्हाळ्यातही सुरूच होता.

भामरागड वन विभागात रानटी हत्तीने प्रवेश करून तेथील नागरिकांचे बळी घेतले. वाघ व हत्तींच्या हल्ल्याचा धोका थांबलेला नाही. २०२४ या सरत्या वर्षात कुरखेडा (सावरगाव) येथील महिलेचा बळी घेऊन मानव-वन्यजीव संघर्ष जिल्ह्यात अजूनही कायम असल्याची जाणीव करून दिली.

**वाघांच्या हल्ल्यात सहा जण ठार**

३ जानेवारी - मंगलाबाई विठ्ठल बोडे, वाकडी
७ जानेवारी - सुषमा देवीदास मंडल, चिंतलपेठ
१५ जानेवारी - रमाबाई शंकर मुंजमकर, कोपरअल्ली
१८ जानेवारी - नानाजी आत्राम, रेंगेवाही
१५ मे - पार्वता बालाजी पाल, आंबेशिवणी
६ डिसेंबर - शारदा मानकर, कुरखेडा (सावरगाव)

**हत्तींनी घेतला चार जणांचा जीव**

२५ एप्रिल - गोंगलू रामा तेलामी, कियर
२५ एप्रिल - राजे कोपा हलामी, हिदूर
२५ एप्रिल - महारी देवू वड्डे, हिदूर
२४ ऑक्टोबर - शशिकांत रामचंद्र सतरे, नवेगाव

**२.२५ कोटींची मदत**

जिल्ह्यात २०२४ या सरत्या वर्षात वाघ व हत्तींच्या हल्ल्यात ठार झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबाला वन विभागाच्यावतीने प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. एकूण ९ जणांच्या कुटुंबीयांना २ कोटी २५ लाख रुपये अदा केले, तर शेवटच्या एका प्रकरणात प्राथमिक स्वरूपात ३० हजार रुपयांची सानुग्रह मदत देण्यात आली.






नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ बुधवार, दि. ०१ जानेवारी २०२५ ■



# जन गण मन इंग्लिश शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा व मोफत आरोग्य तपासणी शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :



महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथील दावसा येथील जेएमएफ शिक्षण संस्था अंतर्गत जन गण मन कॉन्व्हेन्ट शाळा येथे दरवर्षी प्रमाणेच मुलांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी यावर्षी देखील वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. सकाळी अकरा ते तीन च्या सत्रात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या अंतर्भूत असलेल्या कलेची चुणूक दाखवून सर्व उपस्थित पालकांचे, पाहुण्यांचे मन जिंकले.

जेएमएफ संस्थेचे संस्थापक सर्वेसर्वा डॉ. राजकुमार कोल्हे, सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, खजिनदार जान्हवी कोल्हे, नागपूर शाळेतील निवृत्त मुख्याध्यपक परशुराम भांगे, त्यांच्या पत्नी पुष्पा भांगे, दावासा गावचे प्रतिष्ठित डॉक्टर व डॉ.राजकुमार कोल्हे यांचे वडील डॉ. मारोतराव कोल्हे, व्यवस्थापक महेश कळंबे, मुख्याध्यापक भजन, तसेच मुंबई मधील शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य आमोद वैद्य, अल्पेष खोब्रागडे सर्व शिक्षक व इतर पदाधिकारी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.

सर्व मान्यवरांचे नैसर्गिक पान फुलांनी तयार केलेले पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायन केले. संवादिनी साथ मुंबईच्या संगीत शिक्षिका श्रेया कुलकर्णी यांनी केली. सर्व लहान मुलांचे नृत्य बघुन डॉ. राजकुमार कोल्हे यांनी मुलांचे खूप कौतुक केले. मुंबई ही मायानगरी आहे, अनेक जण स्वप्न उराशी बाळगून त्या मायानगरीत प्रवेश करतात, परंतु त्या स्वप्नाची नाळ ही आपल्या मातीशी जुळलेली असते, त्यासाठी इथे तुम्ही अपार कष्ट करा, अभ्यास करा, आणि आपल्या शाळेचे, गावाचे नाव उज्वल करून मुंबई सारख्या महानगरी, मायानगरीत पुन्हा पंख पसरून यशाची आनंदाची चव चाखा, असे संस्थेचे संस्थापक डॉ. राजकुमार कोल्हे यांनी मुलांना सांगितले.

बालवयामध्ये आपल्या स्वप्नांना आकार नसतो, क्षणाक्षणाला आपली स्वप्ने बदललेली असतात, त्याच स्वप्नांना आकार देण्याचे काम हे आपले शिक्षक करत असतात, आज सर्वांनी खूप छान नृत्य, गायन, नाटकाचे सादरीकरण केले. यामधील प्रत्येकजण कोणत्याही कला विश्वात आपले नाव उज्वल करू शकतो, तर आज आम्ही सुध्धा हे वार्षिक स्नेह संमेलन बघत असताना आमच्या बालवयात जाऊन रमलो आणि आनंद घेतला, असे सचिव डॉ. प्रेरणा कोल्हे यांनी व्यक्त केले.

खजिनदार व दिग्दर्शिका जान्हवी कोल्हे यांनी भविष्यामध्ये दवासा या गावी एखादा सिनेमा दिग्दर्शित करून सर्व मुलांना त्या सिनेमात काम करण्याची संधी देऊ करणार अशी ग्वाही सर्व मुलांना दिली ते सर्व मुलांनी आनंदाने जल्लोष केला. सर्व मुलांना प्रोत्साहनपर बक्षीस वाटप करून शाबासकी दिली. सूत्रसंचालन मयुरी जराहे व विद्याथ्यानी केले तर सर्व शिक्षकांनी उत्तम आयोजन केले. सामाजिक जबाबदारी आणि कर्तव्य या भावनेतून डॉ. राजकुमार कोल्हे आणि डॉ. प्रेरणा कोल्हे यांनी यावर्षी देखील जन गण मन कॉन्व्हेन्ट शाळेच्या प्रांगणात मोफत आरोग्य तपासणी शिबिर व मोफत औषध वाटप आयोजित केले होते.

नेत्र तपासणी, रक्तदाब, मधुमेह या सारख्या अनेक शारीरिक आजारांचे तज्ञ डॉक्टरांचे पथक या शिबिरात सहभागी झाले होते. जवळपास दोन हजार दावसा रहिवाशांनी या शिबिराचा लाभ घेतला. डॉ. महात्मे यांनी नेत्र शस्त्रक्रिया करण्यासाठी 56 रुग्णांना दिनांक 2 जानेवारी 2025 ची तारीख दिली. परमपूज्य नायर गुरुजी चेतना परिवार नागपूर 10 तज्ञ डाक्टर व 20 च्या वर मदतनीसने देखील हातभार लावून सामाजिक जबाबदारी पार पाडली.



# अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान प्रबोधन परीक्षा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३१ :

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकृत करण्यात आले त्यास आज ७५ वर्षे पूर्ण होत आहे. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधानाचे श्रेष्ठत्व समजून घेणे, संवैधानिक आदर्श व मूल्यं विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि संविधानातील हक्क, अधिकार आणि कर्तव्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे आदी तत्वांचा अभ्यास विद्यार्थ्यांना व्हावा या प्रामाणिक हेतूने श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेकच्या वतीने संविधान प्रबोधन परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये रामटेक तालुक्यातील मुसेवाडी, हिवरा बाजार, देवलापार, मनसर,शिवनी, नगरधन आणि रामटेक इत्यादी क्लस्टर मधील ४५ शाळेतील एकूण ३००० विद्यार्थी ह्या परीक्षेत बसले होते.

ही परीक्षा दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोज गुरुवारला तालुक्यातील सगळ्या शाळांमध्ये जाऊन, प्रारंभी संविधान उद्देशिकेचे वाचन करून सकाळी ठीक ११ वाजता परीक्षेला सुरुवात करण्यात आली. या परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून आमच्या महाविद्यालयातील एनसीसी च्या विद्यार्थ्यांनी ही परीक्षा शिस्तबद्ध आणि शांततेत पार पाडली. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे यांनी सर्व संविधानप्रेमी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच परीक्षेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गांनी सहकार्य केले.

# एलएडी महाविद्यालयात विदर्भ विज्ञान उत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :




वुमेन्स एज्युकेशन सोसायटी द्वारे संचालित एलएडी अॅन्ड एसआरपी कॉलेज फॉर विज्ञान भारती विदर्भ मंडळ तसेच नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने विदर्भस्तरीय विज्ञान मॉडेल मेकिंग, रांगोळी, पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजक प्रकाश इटणकर यांनी पत्रपरिषदेत दिली.

यावेळी राजेश कारमोरे, मनिषा घारे, वैशाली गडे, माया जाधव, अर्चना लिहीतकर, सुमिता सप्रे आदी उपस्थित होते. शंकरनगर येथील एलएडी महाविद्यालयाच्या परिसरात ३ आणि जानेवारी रोजी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत विदर्भ विज्ञान उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय सायन्स मॉडेल मेकिंग स्पर्धेची प्रथम फेरी जिल्हा स्तरावर झाली असून निवड झालेल्या सर्वोत्कृष्ट प्रथम तीन विज्ञान मॉडेल फेरीत सहभागी होणार आहेत. विज्ञान मॉडेल मेकिंग स्पर्धेची अंतिम फेरी महाविद्यालयाच्या परिसरात होणार आहे. तसेच रांगोळी व स्पर्धेकरिता पर्यावरण विज्ञान, कृषी विज्ञान, आरोग्य विज्ञान हा विषय देण्यात आला आहे.

प्रदर्शनीचे उद्घाटन ३ जानेवारी रोजी सकाळी १० वा. जस्टिस भवानी शंकर नियोगी हॉल येथे होईल. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, निरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य, रवलिन खुराणा आदी उपस्थित राहील. समारोप कार्यक्रम जानेवारी रोजी दुपारी ३ वा. एलएडी महाविद्यालयाच्या सभागृहात होईल.

याप्रसंगी व्हीएनआयटीचे संचालक डॉ.प्रेमलाल पटेल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे उपस्थित राहातील. विद्यार्थी, पालक आणि प्रेक्षकांसाठी विज्ञान प्रदर्शनी दोन दिवस बघता येणार आहे.

# प्रहार मिलिटरी शाळेत वार्षिक अश्वक्रीडा स्पर्धा उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :




नागपूर डिस्ट्रीक्ट इक्वेस्ट्रियन एसोसिएशन-द हॉर्स रायडिंग अकादमी व प्रहार मिलिटरी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक अश्वक्रीडा स्पर्धा सिझन-२, प्रहार मिलिटरी स्कूल, रवीनगर येथे उत्साहात पार पडली. यावेळी घोडेस्वारीतील विविध कौशल्यांचे प्रदर्शन आणि खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे होण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर (आयएएस), आयुक्त डॉ.अभिजित चौधरी, राजे मुधोजी भोसले, प्रहार मिलिटरी स्कूलचे उपाध्यक्ष भालचंद्र कागभट, प्राचार्या वंदना कुलकर्णी व बलजित सिंह गधखेल उपस्थित होते. इतर मान्यवरांमध्ये स्वप्निल वांदिले, सुरेश जुंगारे, व प्रमोद लडवे यांचा समावेश होता. कार्यक्रमादरम्यान विविध अश्वक्रीडा झाल्या. त्यात प्रहार मिलिटरी स्कूलच्या विद्यार्थ्यांसह इतर अश्वक्रीडा प्रेमींनी उत्कृष्ट कामगिरी सादर केली. या कामगिरीने सर्वांची मने जिंकली. प्रमुख पाहुण्यांनी अश्वक्रीडा क्षेत्रातील विकासाबद्दल आपले विचार मांडले व सहभागी खेळाडूंना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आयोजनासाठी प्रहार मिलिटरी स्कूल व नागपूर डिस्ट्रीक्ट इक्वेस्ट्रियन एसोसिएशन यांचे कौतुक करण्यात आले.

# मध्य रेल्वे, नागपूर विभागातर्फे बल्लारशाह स्थानकावर सुरक्षा परिषदेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नागपूर विभाग, मध्य रेल्वे, परिचालन सुरक्षा आणि कर्मचारी कल्याणासाठी वचनबद्ध, बल्लारशाह स्थानकावर सुरक्षा जागरूकता परिषदेचे यशस्वी आयोजन. सुरक्षा उपायांना बळकटी देणे आणि रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. हीच परिषद नागपूर विभागाच्या सहाय्यक विभागीय सुरक्षा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भुसावळच्या सहाय्यक अधिकारी यांच्या सक्रिय सहकार्याने आयोजित करण्यात आली असती.

यामध्ये लोको, वाहतूक आणि कॅरेज अँड वॅगन अशा विविध विभागातील सुमारे 50 कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सुरक्षा सल्लागार, मुख्य क्रू कंट्रोलर, स्टेशन मास्टर आणि मुख्य लोकोमोटिव्ह इन्स्ट्रक्टर यांचा समावेश असलेल्या सुरक्षा तज्ञांच्या पथकाने परिषदेचे नेतृत्व केले.

# भारतरत्न अटल बिहारी बाजपेयी यांची जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :

दत्तवाडी येथील आमदार समीर मेघे यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजपा वाडी मंडळातर्फे भारताचे माजी पंतप्रधान, लेखक, कवि, भारतरत्न श्रद्धेय अटललबिहारी बाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम त्यांच्या प्रतीमेचे पुजन करण्यात आले. पुष्पहार अर्पण आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष आनंदबाबु कदम, वाडी शहर अध्यक्ष कैलाश मंथापुरवार, पुरुषोत्तम रागीट, वाडी मंडळ अध्यक्ष कल्पना सगदेव, मंडळ उपाध्यक्ष ज्योती भोरकर, सुजीत नितनवरे, केशव बांदरे, राजुताई भोले, कमलाकर ईंगळे, विमलेश सिंह, मधु बर्वे,प्रकाश डवरे, रमेश गोमासे,जयदेव शेवरान, विपीन वर्मा, प्रशांत श्रीवास्तव, सुरेखा रिनके, ऊर्मीला चौरसिया, दत्ता बाबर, लक्ष्मीनारायण केसरवानी, विशाल डोंगरे, पोर्णिमा बंडावार, अंजली कुळकर्णी, पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## सोनेगाव शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :

नागपूर तालुक्यातील सोनेगाव (निपाणी) जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता १ ते ५ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना साने गरूजी यांच्या जयंतीचे औचित्य साधत समग्र शिक्षा अभियान अंतर्गत उपस्थित पाहुण्यांचे हस्ते गणवेश वितरण करण्यात आले.

सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय भिवनकर, उपाध्यक्ष ज्योती कुडे मुख्याध्यपिका निलीमा कामथे यांच्या उपस्थितीत पुज्यनिय साने गुरुजी यांच्या फोटोचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका निलीमा कामथे यांनी केले. संचालन व मार्गदर्शन विषय शिक्षक दीपचंद पेंडकांडे यांनी तर आभार विज्ञान शिक्षिका विनया धात्रक यांनी मानले. यावेळी यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# नर्मदाष्टक उपासना मंडळाचे प्रिती संगम शिबिर संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :



नर्मदाष्टक उपासना मंडळाचे पहिले शिबिर इंद्रायणी किनारी आळंदीला संपन्न झाले. इंद्रायणी नदी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता आहे. ज्या इंद्रायणीने ज्ञानेश्वर महाराजांचे अध्यात्मिक तेज अनुभवले, ती इंद्रायणी आज मानवजन्य चुकांनी ओंगळवाणी झालेली आहे. मानवांसह मासोळ्यादी जीवजंतूंनाही तिचे पाणी अपायकारक झालेले आहे. इंद्रायणी स्वच्छतेसाठी आळंदीतील अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत.

इंद्रायणीचे हे रूप दूर होत ती पुन्हा सांस्कृतिक चेतनेने ओतप्रोत होत वाहावी यासाठी नदीची चेतना जागवायला नर्मदाष्टक उपासना मंडळाच्या महाराष्ट्रातील विविध भागातील नर्मदा दूतांनी एकत्रित येत, तू लवकर स्वच्छ व पवित्र हो, हा नर्मदेचा संदेश इंद्रायणीला दिला. यानंतर नर्मदाष्टक व गंगास्तोत्राचे त्रिकाळ आवर्तनं करण्यात येवून व घाट सफाईहीकरण्यात इंद्रायणी घाटावर नर्मदाष्टक उपासना मंडळाचे मुख्य समन्वयक किशोर पौनीकर नर्मदापुरकर, नागपूर, यांनी नर्मदा इंद्रायणी प्रिती संगम शिबिराचे उद्घाटन केले.

शिबिराच्या प्रमुख मीना कारिया यांनी शिबिराच्या आयोजनाची भुमिका मांडली. किशोर पौनीकर यांनी या दरम्यान सांगितले की, "आजवर केवळ नदी स्वच्छता हाच विषय चर्चेत राहात आल्याने नदी प्रदुषित का होतेय व आपल्या नित्य आचरणातून आपण नदी पुन्हा प्रदुषित होणार नाही, याची कशी काळजी घेवू शकतो, आज जर आपण नदी समस्यांवर जागृती केली नाही तर नद्यांसोबत आपली संस्कृतीही प्रदुषित होत साऱ्या सृष्टीचीच निरामयता धोक्यात येईल.

आपल्या पुढील पिढीला स्वच्छ तन मनाची भेट द्यायची असेल तर नदीला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवत ती स्वच्छ राहील, यासाठी आपण साऱ्यांनी आजच कामाला लागायला हवे. प्रत्येक गावातील नर्मदाभक्ताने आपल्या गावनदी सोबत जुळून तिची व्यथा जाणून ती दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा.यानंतर नर्मदाष्टकाचे आवर्तनं करत नर्मदा व गंगा आरती करण्यात आली. आरती नंतर इंद्रायणी नदीला दीपदान केले गेले. यावेळी इंद्रायणी आरती संयोजक भोलापूरी महाराज उपस्थित होते.

सकाळी ५.३० वाजता माऊलींच्या समाधीच्या दर्शना पश्चात पुन्हा इंद्रायणी किनारी एकत्रित येत तिला भुपाळ्या म्हणत उठवले गेले. यानंतर झालेल्या काकड आरतीला इंद्रायणी किनाऱ्यावरील सारेच भाविक एकत्रित आले होते. यावेळी त्यांना नदी किनारा स्वच्छ ठेवण्याचे व घरी केमिकलचा कमीतकमी वापर करत बायो एंझाईमचा वापर वाढवावा व नदीतही बायो एंझाईम टाकावे, याविषयी आवाहन केले गेले. गावफेरी काढल्या गेली. यात आळंदीच्या सर्वच वार्डांमध्ये जनजागृती पत्रकांचे वितरण करण्यात आले. घराच्या, दारावर नदी स्वच्छता माहीतीचे स्टिकर लावले गेले. स्वयंस्वच्छता व नदीचेतना जागरण हे विषय लोकांना आवडल्याने अनेकांनी स्वयंस्फूर्तीने पत्रक वाटण्यात मदत केली. इंद्रायणी घाटावर जाहीर कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. यात मीना कारिया, पुणे, लिखित व दिग्दर्शित 'इंद्रायणीची व्यथा' हे पथनाट्य सादर केले गेले.

## वीर बाल दिवसानिमित्त गायन, वादन, नृत्यांचे सादरीकरण

**नागपूर** : वीर बाल दिवसानिमित्त सिव्हील लाइन्स येथील दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या परिसरात वीर बाल दिवसानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम झाले. यात प्रामुख्याने कलाकारांचे गायन, वादन नृत्यांचे सादरीकरण झाले. याशिवाय ढोल-ताशा पथकाच्या दमदार सादरीकरणामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते. सांस्कृतिक मंत्रालयाच्या सूचनेनुसार, दहावे शीख गुरु श्री गुरु गोविंद सिंग यांचे धाकटे पुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ वीर बाल दिवस साजरा करण्यात येतो. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या परिसरात सायंकाळी कलाकारांचा कार्यक्रम झाला. यात बालकलाकारांनी एकाहूनएक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे उद्घाटन गुरूनानक पुरा, गुरुद्वाराचे माजी अध्यक्ष परविंदर सिंग विज, गुरुमित सिंग, अरुणपाल सिंग, सुरजीत सिंग अस्ला, दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे संचालक आस्था गोडबोले कार्लेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

# ४५ व्या ॲथलेटिक्स स्पर्धेत ज्येष्ठांचा उत्साह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :




महाराष्ट्र ॲथलेटिक्स स्पर्धा नागपूर विद्यापीठाच्या रवीनगर सिंथेटिक ट्रकवर पार पडल्या. यात ज्येष्ठांनीही तेवढ्याच हिरीरीने भाग घेतलेला दिसून आला. इतवारीत राहणाऱ्या ७२ वर्षीय शशिकला माने यांनी २०० मीटरमध्ये (दौड) सुवर्ण पदक पटकावून उत्तम कामगिरी बजावली. शालेय जीवनात खो-खो चॅम्पियन राहिलेल्या माने यांनी उंच उडीत १.९४ मीटर उडीचा विक्रम केला. १५ दिवसांपूर्वी सिकंदराबाद येथे आयोजित स्पर्धेतही त्यांनी सुवर्ण पदक पटकाविले होते. खरबी रहिवासी ६२ वर्षीय स्नेहल विजय गंधवाल यांनी सुद्धा ६० वर्षीय वयोगटात शॉटपूटमध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. स्नेहल या सुद्धा एकेकाळी पीटी उषासोबत स्पर्धेत भाग घेतलेली खेळाडू आहे. लग्नानंतर जबाबदाऱ्या वाढल्याने काही कारणास्तव खेळ बंद झाले. काही वर्षांनी ईश्वर देशमुख कॉलेजच्या प्राचार्या शारदा नायडू सोबत भेट झाल्यानंतर पुन्हा मैदानावर येऊन पूर्ण केल्याचे त्या सांगतात.

दाभामध्ये किरायाने राहणारे सुरक्षा रक्षक असलेले ७२ वर्षीय गोपाल डफ यांनी सुद्धा ३ सुवर्ण पदक पटकावले. १०० मीटर १५ सेकंदात, २०० मीटर ३३.५ सेकंदात व ४०० मीटर १.१४ सेकंदात पूर्ण करीत सुवर्ण पदक पटकाविले. सकाळी फिरण्याचा शौक असलेले गोपाल यांनी जवळच्या क्लबमध्ये सहजच प्रवेश घेतला तेथून प्रेरणा घेत आज मी सुवर्ण पदक घेऊन शकलो, असे ते सांगतात.

गतवर्षी चेन्नईत १०० मीटर रेसमध्ये रौप्य पटकविणारा नागपूर विद्यापीठाचा आदर्श भुरेला यावर्षी भुवनेश्वरला झालेल्या ८४व्या अखिल भारतीय आंतरविवि ॲथलेटिक्समध्ये ५व्या स्थानावर समाधान मानावे लागले. यामुळे पुढील वर्षी खेळल्या भारतीय विद्यापीठाच्या स्पधेर्साठी तो पात्र ठरला आहे. मागच्या वर्षीच्या खेलो इंडिया टुनार्मेंटमध्ये कांस्य पदक जिंकले होते. आदर्शने अंतिम फेरीत १०.६६ सेकंद वेळ नोंदविली. पुरुषांच्या ३०० मीटर स्टीपलचेस रेस मध्ये सौरव तिवारी अंतिम फेरीत पोहोचला.


-: जाहीरनामा :-
कोर्ट विद्यमान, नायब तहसिलदार, कुही यांचे न्यायालय
दुरध्वनी क्र. ०७१००-२२२२३६
Email ID-tahsildarkuhia gmail.com
क्र./क.लि/त.कुही/प्रस्तूत- २/कावि-६३०/२०२४
दिनांक : ३०/१२/२०२४
वाचा : १. भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र
२. जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३

जाहीरनामा
को.वि.श्रीमती. सारीका धात्रक, नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय
प्र.क्र. ३/ एम आर सी-८१/२०२४
मौजा बोरी ता. रामटेक
जिल्हा नागपूर
ज्याअर्थी हरीभाऊ तुकाराम बादुले रा.

जाहीरनामा
कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालय, मौदा
Phone No-07115-281128
Mail Id: tahesilofficemoud@gmail.com
क्र. प्रस्तु-३/तह-मौदा/कावि-६६६/२०२४
दिनांक -१८/१२/२०२४
वाचा - १) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३ २) जन्म मत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा -

जा.क्र./ACC/९५३/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिविल लाईन्स, नागपूर- ०१
नमुना क. ७५ दिनांक : २३/०९/२०२४
आदेशिकावाहका मार्फत
ACC-2
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर.

-: जाहिरनामा :-
कोर्ट विद्य. कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालय भिवापूर रोड, भिवापूर जिल्हा नागपूर पिन कोड - ४४१२०१
E-mail ID-tahsilbhiwapur@gmail.com
दुरध्वनी क्रमांक -०७१०६ २३२२४१.
क्र. प्रस्तु-१/तह.भि./कावि ९७२/२०२४
दिनांक: १७/१२/२०२४
वाचा :- १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ २. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचे

# भारतीय मजदूर संघाचे तीन दिवसीय अधिवेशन संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :




डिफेन्स आयुध निर्माणी, अंबाझरी येथील समाज सदन सभागृहात भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघाची त्रैवार्षिक तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी बी.एम.एस.चे संस्थापक स्व. दत्तोपंत ठेंगडी यांचे जीवन व योगदान याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी वाय. आय.एल. सीएमडी गुरुदत्त रॉय ,भारतीय संरक्षण मजदूर संघाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.तीन दिवशीय अधिवेशनात देशभरातील आलेल्या पदाधिकाऱ्यांनी देशातील रक्षा क्षेत्रातील कारखाने, संरक्षण क्षेत्राची स्थिती व दिशा, कामगारांच्या समस्या, सुविधांचा अभाव, केंद्र सरकारचे कामगार धोरण, खाजगीकरण आदींबाबत सविस्तर चर्चा केली व शेवटी पाच ठराव मंजूर करण्यात आले. समारोप समारंभात हे प्रस्ताव एकमताने आणि आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. या मंजूर ठरावांनुसार केंद्र सरकारने विरोधानंतरही रक्षा क्षेत्रातील कारखान्यांच्या कॉर्पोरेटायझेशनचा फेरविचार करण्याचा निर्णय घ्यावा, जोपर्यंत हे होत नाही, तोपर्यंत त्यामध्ये काम करणारे कर्मचारी प्रसार भारती मॉडेलप्रमाणे त्यांच्या निवृत्तीपर्यंत सरकारी कर्मचारीच राहतील.

पगाराची हमी देणे, एनपीएस आणि यूपीएस रद्द करणे, जुनी पेन्शन योजना ओपीएस पुनर्संचयित करणे, अनुकंपा तत्वावर १०० टक्के नोकऱ्या देणे, आठवा वेतन आयोग गठीत करणे, कंत्राटी पद्धत बंद करणे आणि रिक्त पदे भरणे. सर्व अधिनस्त विभाग भरून त्यांना प्रसार भारतीप्रमाणे दर्जा देण्याची मागणी करण्यात आली. परिषदेत झालेले सर्व ठराव केंद्र शासनाकडे योग्य माध्यमातून पाठविण्याबाबत माहिती दिली. ही तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद यशस्वी करणाऱ्या आयुध निर्माणी मजदूर संघ अंबाझरी, आयुध निमार्णी भंडारा, आयुध निमार्णी चंद्रपूर येथील सर्व कार्यकर्त्यांचे या अधिवेशनात सहकार्याबद्दल दुपट्टा घालून स्वागत करण्यात आले. संचालन संघाचे अध्यक्ष महावीर सिंग यांनी तर आभार सरचिटणीस रवींद्र मिश्रा यांनी मानले. यावेळी नवनियुक्त अध्यक्ष मारुती पवार यांनी उपस्थितांना संबोधित करून संस्थेला पुढे नेण्यासाठी काम करण्याचे आवाहन केले. आयोजनासाठी बीपीएमएसचे सचिव हर्षल ठोंबरे, सीईसी सदस्य बंडू तिडके, आयुध निमार्णी अंबाझरी मजदूर संघाचेअध्यक्ष महावीरसिंह व्यास, सरचिटणीस संजय वानखेडे, ओ.पी. उपाध्याय, अतुल चवरे, सचिन थोरणे, अनिल धुर्वे, दिलीप चिन्नोरे, सुमित चिन्नोरे, महेश चौधरी, विनय इंगळे, शिवकुमार शर्मा, भरत चिनप्पन, एस आर चौधरी, मुकुंद इखार, मनीष गुहे, योगेश मेटकर, आशिष सालोटकर, विनय खंगार, योगेश वराडे, कल्पेश कुलकर्णी, जे.के. सिंग, योगेश अनासने, ब्रिजेश सकलानी, शशी राजन पटेल, नितीन पौनीकर, तुषार सेलोकर, प्रशांत चौधरी, निखिल रांगडे, अशमित आकडे, लखनऊकर, लखनऊकर, प्रशांत चौधरी, नितीन पडोडे, योगेश मानकर, गंटू माहुले, सम्राट कलचुरी, ओ.पी.राय, आशिष चौधरी, पवन तिडके, तुषार ठाकरे, नितीन विश्वकर्मा, रवी पारधी, पंकज वाडे, पंकज दहिवडे, राजेंद्र जोध, रम्यश वर्मा, सुनील पाटील, तुषार भिरूड, शरद पारधी यांनी सहकार्य केले.

# पगाराची मागणी करत समृद्धी महामार्ग टोल प्लाझाचे कर्मचारी पोहचले पोलीस ठाण्यात



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३१ :

तहसील अंतर्गत येणाऱ्या समृद्धी महामार्ग येथील पहिल्या वायफळ टोलनाक्यावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जुन्या कंपनीचे थकित वेतन आणि पीएफची मागणी करत रविवारी हिंगणा पोलिस ठाणे गाठले. या टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांमध्ये महिलांसह पुरुषांचाही समावेश आहे. डिसेंबर 2022 मध्ये समृद्धी महामार्गावर नागरिकांची हालचाल सुरू झाली. या महामार्गाच्या टोलनाक्यावरील टोलवसुलीचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून कमिशन तत्त्वावर रोडवे सोल्युशन्स इंडिया प्रा. ला देण्यात आले होते. गेल्या तीन महिन्यांपूर्वी या कंपनीने टोलवसुलीचे काम सोडून दिले आहे.

आता समृद्धी महामार्गच्या २२ टोलनाक्यांवरील टोलवसुलीचे काम हाशमी ग्रुप ऑफ कंपनीला देण्यात आले आहे. मात्र जुन्या रोडवे कंपनीने काही दिवसांचा पगार आणि टोल प्लाझावर टोलवसुलीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे संपूर्ण पीएफ खाते जमा केले नाही. त्यामुळे वायफळ टोल प्लाझासह अन्य टोलनाक्यांवरील कर्मचाऱ्यांनी रोडवे कंपनीचे सीओ संतोष पवार आणि एजीएम नीरज चौधरी यांच्यासह हिंगणा पोलीस ठाणे गाठले. हिंगणा पोलिस स्टेशनचे एपीआय संदेश नाला यांनी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कंपनी 10 ते 15 दिवसांत सर्व कर्मचाऱ्यांचे थकित वेतन आणि पीएफ अदा करणार असल्याचे सांगितले. मुंबईतील मुख्य कार्यालयात कंपनीच्या अधिकाऱ्यांशी बोलून थकबाकीची रक्कम लवकरच देण्याचे आश्वासन दिल्यानंतर सर्वजण तेथून परतले. या कर्मचाऱ्यांमध्ये काजल उईके, गंगा कुडमाते, श्वेता सातमकर, उन्नती फुलमाळी, माधुरी शेद्रे, भूषण फाटिंग, रोशन कावळे, रोहित बोरकर, विनय दाते, हेमंत सोनवणे, अनिल धुर्वे, किरण मुन, साहिल मेंढे, प्रतिमा सहारे, आकाश तुमाणे, हितेश ढवळे, शुभम आष्टणकर, रोशन लाटकर, अक्षय सहारे, महेंद्र सेडाम, गौरव आमनेरकर, उमेश पांडे आदींचा समावेश होता.

नागपूर ते इगतपुरी असे एकूण २२ टोलनाके समृद्धी महामार्गावर आहेत. एकूण 1100 कर्मचारी तेथे तैनात आहेत. नागपुरातील वायफळ टोल प्लाझा येथे सुमारे 63 कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये 43 पुरुष आणि 20 महिला आहेत. त्यांना 8 हजार रुपये ते 12 हजार रुपये मासिक वेतन दिले जाते. टोल बुथवर टोलवसुलीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ठेकेदाराकडून दरमहा आठ हजार रुपये पगार मिळत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. 3 शिफ्टमध्ये टोल बुथवर 8 तासांच्या कामासाठी फक्त 8,000 रुपये दिले जातात. जो पगाराच्या निम्माही नाही. कर्मचाऱ्यांनी सांगितले की, कंपनीने पीएफ खात्यात कधी-कधी १ रुपये किंवा ४ रुपये जमा केले आहेत. नियमानुसार 2 वर्षांपासून पीएफ दिलेला नाही. काही लोकांनी पीएफ खातेही उघडलेले नाही. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांची पिळवणूक झाली आहे. जुन्या कंपनीसोबतच ज्या कंपनीला टोलवसुलीचे काम एमएसआरडीसीने दिले आहे. ती कंपनीही आपल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार पगार देत आहे की नाही? याचीही चौकशी व्हायला हवी अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

# मेजर रत्नाकर ठाकरे यांना विशेष गौरव सन्मानाने पुरस्कृत




■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ३१ :

सशस्त्र सेना ध्वजादिनी निमित्त जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय नागपूर यांच्यावतीने मेजर रत्नाकर ठाकरे यांना 30 डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटणकर सर तसेच अप्पर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांच्या हस्ते मेजर रत्नाकर ठाकरे यांना विशेष गौरव पुरस्कार (महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे प्रदान करण्यात आला.

मराठा(काली पांचवी) बटालियन मधून सेवानिवृत्त झाल्यानंतर काटोल पोलीस स्टेशन पोलीस हवालदार पदावर कार्यरत आहे.

त्याचप्रमाणे माजी सैनिक संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळतात त्याचप्रमाणे विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी असून सेवाभावी सेवा त्यांच्या हातून घडत असतात काटोल नरखेड तालुक्यातून अभिनंदनचा वर्षाव केला जात आहे. विविध संघटनेतून त्यांना अभिनंदन केले जात आहे.

# सोने-चांदीच्या दरात घसरण

**नागपूर:** नववर्षाच्या स्वागताची तयारी सुरू असतानाच सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी (३१ डिसेंबर २०२४ रोजी) सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. लग्न सराईच्या काळात दरात घसरण झाल्याने खरेदीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. घराघरात नववर्षाच्या स्वागतासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. काही कुटुंबियांकडून शेती, फार्महाऊस, पर्यटन स्थळ अथवा हॉटेल्स वा इतरत्र नववषार्चे स्वागताची जोरदार तयारी सुरू आहे.

नववर्षात, लग्न, वाढदिवस वा इतर कार्यक्रमात काही नागरिक आपल्या जवळच्या नातेवाईकांना विविध दागिन्यांची भेट देत असतात. त्यामुळे हल्ली नागपूरसह सर्वत्र सराफा दुकानात ग्राहकांची गर्दी वाढली आहे. परंतु मागील काही दिवसांत सोन्याचे दर सातत्याने वाढल्याने ग्राहकांमध्ये चिंता होती. मंगळवारी (३१ डिसेंबर) २०२४ रोजी सन्याचे दर घसरल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

# बॅडमिंटन स्पर्धेत श्रीजा वानखेडे, सान्वी मानापुरे, इशिता बारापात्रे सुवर्ण पदकांच्या मानकरी

**नागपूर :** चंद्रपूर येथे झालेल्या रायसोनी फाउंडेशन अंतर्गत योनेक्स-सनराईज जी.एच.रायसोनी मेमोरियल विदर्भ लेव्हल बॅडमिंटन स्पर्धेत नागपूरच्या श्रीजा वानखेडे, सान्वी मानापुरे, इशिता बारापात्रे सुवर्ण पदकांच्या मानकरी ठरल्या. श्रीजाने अंडर १ ५ मुलींच्या एकेरी आणि अंडर १ ७ मुलींच्या एकल स्पर्धांमध्ये महिला एकेरी सुवर्ण आणि दोन रौप्य पदके जिंकली. सान्वी आणि इशिता यांनी व १३ मुलींच्या दुहेरीत सुवर्णपदक जिंकले. श्रीजा आणि सान्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रीडा संकुलात प्रशिक्षक हर्षित मंडल व इशीता विकी सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

# आरोग्यधामचा २३ वा वर्धापनदिन हर्षोल्हासात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

आरोग्यधाम व्याधीग्रस्त मानवसेवा आश्रम, खापरी राजा, पाचगाव, उमरेड रोड, नागपूर येथे आरोग्यधामच्या स्थापनेचा २३ वा वर्धापनदिन सोहळा दरवर्षी प्रमाणे यंदाही बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ ला मंगलमय आणि आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त २४ डिसेंबरला महामृत्यंजय जपयज्ञ समस्त साधक आणि योगाचार्य डॉ. मेहेर व अध्यक्ष कुलदिपक मेहेर यांचे उपस्थितीत संपन्न झाला. २५ डिसेंबरला सकाळी १०.३० वाजता परमपूज्य श्री संत लहरीबाबा आणि योगी मनोहर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती करण्यात आली.




कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने आरोग्यधाम आश्रमाचे संचालक योगाचार्य डॉ एच.टी.मेहेर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर सामुदायिक प्रार्थना करण्यात आली. योगाचार्य डॉ.एच.टी.मेहेर यांचा सत्कार घनश्याम रामटेके व आश्रमचे अध्यक्ष कुलदीपक मेहेर यांचा सत्कार आनंद कावळे यांनी पुष्पगुच्छ देऊन केला. कमलेश जैन, चंद्रकांत बेहेरे व कु.आरोही कावळे इत्यादी साधकांनी आपल्या आयुष्यात आश्रमच्या संपर्कात आल्यानंतर काय काय अनुभुती आल्या ते सविस्तर सांगितले.

योगाचार्य डॉ.एच.टी.मेहेर यांनी आपल्या भाषणात श्री संत लहरी बाबा आणि विश्वयोगी मनोहर हरकारे यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली. अष्टकोनी पिरॅमिड चिकित्सेच्या माध्यमातून अनेक असाध्य रोग कश्याप्रकारे बरे झाले याची विस्तृत माहीती दिली. गुरुवचन व गुरुभक्ती याची अनन्य साधारण महत्व त्यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना पटवुन दिले.

कार्यक्रमाचा शेवट पसायदानाने करण्यात आला. त्यानंतर उपस्थित भाविकांनी कुटीदर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचालन व आभार हर्षल महल्ले यांनी मानले.

# श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय अभिष्टचिंतन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३१ :

लाखो कर्मचाऱ्यांच्या न्यायिक हक्कासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा सरकार्यवाह म्हणून सभागृहात आवाज उठवेल, असे प्रतिपादन आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. श्री संत गाडगे महाराज महाविद्यालयात बसवेश्वर एज्युकेशन सोसायटी नागपूरचे अध्यक्ष डॉ. उदय मोगलेवार यांच्या षष्ट्यब्दीपूर्ती अभिष्टचिंतन सोहळ्यास आमदार सुधाकर अडबाले उपस्थित होते.

त्यावेळी ते बोलत होते.यावेळी डॉ. उदयजी मोगलेवार, सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री अलका कुबल, साहित्यिक डॉ. श्रीपाद जोशी, भाऊ दायदार, विजया मारोतकर, नगराध्यक्ष लता पारधी, मनीषा गुंडमवार, उज्वला बोढारे, उमेश आंबटकर, ॲड. अक्षय मोगलेवार, प्राचार्य डॉ. आरती मोगलेवार, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, सुनील ठाणेकर उपस्थित होते. यावेळी आमदार सुधाकर अडबाले यांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. तसेच सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री अलका कुबल यांनी आपले विचार व्यक्त केले.

# १ जानेवारी पासून ४५ प्रवासी, ८१ मेमू आणि २० डेमू गाड्या नियमित क्रमांकाने धावतील

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

दरवर्षीप्रमाणे विविध विभागांमध्ये पायाभूत सुविधांचा अधिक विकास करण्यासाठी, यावर्षी देखील 01 जानेवारी 2025 पासून भारतीय रेल्वेच्या वेळापत्रकात आंशिक बदल करण्यात आला आहे. गाड्या चालवण्याचा वेग आणि सुटण्यापासून आगमनापर्यंतचा वेळ वाढवून अनेक तासांचा ऑपरेटिंग वेळ वाचवण्यासाठी वेळापत्रक बदलले आहे.

ही आवश्यक कामे सातत्याने करत राहिल्याने, विविध विभागांमधील मेल एक्स्प्रेस गाड्यांमध्ये 10 मिनिटे ते 55 मिनिटे आणि पॅसेंजर गाड्यांमध्ये 05 मिनिटे ते 20 मिनिटांपर्यंतच्या ऑपरेटिंग वेळेत (निर्गमन स्टेशनपासून आगमनापर्यंत) बचत होईल. त्याचप्रमाणे, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेमध्ये देखील, 01 जानेवारी 2025 पासून लागू होणाऱ्या नवीन रेल्वे वेळापत्रकात, 131 स्थानकांवरील अप आणि डाउन दिशेतील गाड्यांच्या कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.

इतर स्थानकांचे वेळापत्रक सारखेच राहणार आहे. या रेल्वेमध्ये 1 जानेवारीपासून 45 पॅसेंजर, 81 मेमू आणि 20 डेमू अशा 146 ट्रेनचे रूपांतर एका ट्रेनमध्ये केले जाणार आहे. जानेवारी 2025 पासून ते नियमित क्रमांकावर चालवले जाईल.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेवरून धावणारी १४६२४/ १४६२३ फिरोजपूर-सिवनी-फिरोजपूर पाताळकोट एक्सप्रेस ०१ मार्च २०२५ पासून सुपरफास्ट बनवण्यात येत असून या ट्रेनचे क्रमांक आणि वेळापत्रक बदलले जात आहे.

# मोक्षधाम झाला सार्वजनिक मोक्षधाम

**कामठी :** सामाजिक कार्यकर्ता संघपाल गौरखेडे, जितू गेडाम व राजन बागडे यांनी कामठीचा मोक्षधाम जनतेच्या हिताच्या हष्टीने मोक्षधाम म्हणुन कामठी नगर परिषदच्या कब्जात आणण्याकरिता केलेल्या अथक प्रयत्नाकरिता कामठी शहराच्या नागरिकांकडुन अभिनंदन करण्यात आले. हा सार्वजनिक मोक्षधाम नगर परिषद कामठी नावाचा फलक कामठी नगर परिषद मुख्याधिकारी संदीप बोरकर यांच्या आदेशानुसार प्रदीप भोकरे कामठी नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत लावण्यात आल्याचे कळते .

# महाकवी कालिदास ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्थेत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३१ :



महाकवी कालिदास ग्रामीण बिगरशेती सह पत संस्था, रामटेक येथे राज्याचे अर्थ -नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी, न्याय व कामगार राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांचा सत्कार व दिनदर्शिका २०२५ चा प्रकाशन समारंभ ना. जी. कृ. औ. संघाचे संचालक डॉ.रामसिंग साहारे, सामाजिक कार्यकर्ता मिताराम सव्वालाखे व संस्थेचे अध्यक्ष अनिलजी कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचा शाल, श्रीफळ, भव्य हार, पुष्पगुच्छ देऊन अध्यक्ष अनिल कोल्हे, उपाध्यक्ष रश्मी चकोले, सचिव शंकरराव बलगेवार व संचालक मंडळाच्या तसेच अभिकर्ता वर्गाच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्काराप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले. महाकवी कालिदास बँकेच्या माध्यमातून अनिल कोल्हे यांनी ग्रामीण भागात आर्थिक समृद्धी निर्माण करण्याचे कार्य केलेले आहे.व्यक्तीतील नेतृत्वगुणांचा व अनुभवांचा समाजाला फायदा झाला पाहिजे. कोल्हे सर,'लाथ मारीन तिथं पाणी काढीन 'या वृत्तीन काम करणारे आहेत. त्यांच्या कुशल नेतृत्वात आणि मार्गदर्शनात संस्थेची भरभराट व प्रगती व्हावी व त्यांच्या अनुभवाचा समाजाला फायदा झाला पाहिजे.त्यांचा कामाचा व्याप आणि आवाका मोठा असला तरी त्यांनी नवी जवाबदारी स्वीकारण्यास तयार राहावे." असे गौरवोदगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी याप्रसंगी काढले. यावेळी संचालक मंडळातील सदस्य भोजराज शिरोळे, नारायण घरझाडे, प्रदीप ठाकरे, मधुकर बिसने,हरीश हूड, नंदू सहारे, सौ सुरेखा लिल्हारे, श्रीमती पुष्पाताई गोल्हर, सुनील कोल्हे, बी एच तांबूलकर प्रामुख्याने उपस्थित होते.माजी नगराध्यक्ष गजानन भेदे, राजेश किंमतकर, अनिल वाघमारे व मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थापक राजकुमार सहारे, संगीता वाघमारे, योगेश टिपले,दिलीप मानवटकर,दीपा ठेंगरी, अभिकर्ता दिलीप धांडे, किशोर कुथे, संतोष गोल्हर, श्याम कडू, भीमराज वाघमारे, प्रमोद गभने, नितीन वाजगी, प्रविण बिसने, रंजन केळवदे, बाळकृष्ण राजूरकर, घनश्याम ठाकरे, जगदीश गुजरकर, प्रितम टिटमवार, माधुरी महाजन सुमित्रा रुद्रकार, सुषमा मेश्राम, रोहिणी भिवगडे, महेश ढवळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# बसपातर्फे शौर्य स्तंभास मानवंदना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

1 जानेवारी हा शौर्यदिवस, आज पासून 207 वर्षांपूर्वी पेशवाई संपविण्यासाठी महार बटालियनच्या 500 शूर सैनिकांनी भीमा कोरेगाव (पुणे) येथे पेशव्यांच्या 28, 000 सैन्यांचा



पराभव करून पेशवाई संपवली, तो दिवस 1 जानेवारी 1818, त्या दिवसाची आठवण म्हणून कही हम भूल न जाये, या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत 1 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11 वा. मानेवाडा रोडवरील बालाजी नगरातील त्रिसरण बुद्ध विहार परिसरात असलेल्या भीमा कोरेगावच्या त्या शौर्य स्तंभाच्या प्रतिकृतीस मानवंदना देण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी दिली.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ८२ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :



नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे.

मंगळवार (31) रोजी शोध पथकाने 82 प्रकरणांची नोंद करून 45,400/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 31 प्रकरणांची नोंद करून 12,400/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 100 रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 9 प्रकरणांची नोंद करून 3,600/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॅटिल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 18 प्रकरणांची नोंद करून 17,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/ रुपयांची वसुली करण्यात आली.

सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी बांधकामाचा मलबा / टाकवू कचरा टाकणे साठवणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 14 प्रकरणांची नोंद करून 2,800/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 6 प्रकरणांची नोंद करून 6,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. वात्सल्य बिल्डर्स यांच्या बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. किशोर किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

# मॅक्सी कॅबची वाहतूक अधिकृत करण्याचा डाव

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ३१ :

मॅक्सी कॅब सारखी अशाश्वत वाहनातील प्रवासी वाहतूक शासनाकडून अधिकृत करण्याचा डाव आहे. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षाही धोक्यात येण्याची शक्यता आहे, अशी टिका महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी कॉंग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली.

सरकारने परिवहन क्षेत्रात राज्याला सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी १०० दिवसाचा आराखडा तयार करण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. त्यात मॅक्सी कॅब सारखी वाहने रस्त्यावर आणण्याची घोषणा आहे. हे एसटी सारख्या सर्वात सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत सेवेला घातक आहे. मॅक्सी कॅब वाहनांमुळे एसटी सारखी सर्वात सुरक्षित सेवा कोलमडून पडेल. सोबत प्रवाशांची सुरक्षित प्रवासही धोक्यात येईल, असेही बरगे म्हणाले.

मॅक्सी कॅब अर्थात खाजगी पद्धतीने होणाऱ्या वाहतुकीचे नियमन करण्याच्या नावाखाली राज्य सरकारने १०० दिवसाचा आराखडा तयार करण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले. त्यातून फारसे काही साध्य होणार नाही. कारण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हीच चांगली सुरक्षित सुंदर आणि शाश्वत सेवा देऊ शकते. एसटी महामंडळाची प्रवासी संख्या वाढली असल्याने महामंडळ थोडे फार सावरत आहे. महामंडळ आर्थिक स्थैर्याच्या उंबरठ्यावर असताना व प्रवासी दिवसाला संख्या ५८ लाख झाली असताना उत्पन्न महिन्याचे उत्पन्न ९०० कोटी रुपये झाले आहे. त्याच प्रमाणे सुरक्षित सेवेचा विचार केल्यास महामंडळाची गाडी पाच लाख किलो मीटर अंतर चालल्यास फक्त एक अपघात होतो. त्यातही किरकोळ अपघाताचे प्रमाण जास्त आहे.







## स्मिता स्मृती विशेषांक प्रकाशन सोहळा

■ नागपूर, दि. ३१ :

स्व. पद्मश्री स्मिता पाटील ही प्रतिभासंपन्न व गुणी अभिनेत्री हिव्या स्मृतिप्रित्यर्थ स्त्रियांच्या विविध भूमिकांना केंद्रस्थानी ठेवून मागील ३७ वर्षांपासून दर्जेदार विशेषांक काळण्यात येतो. यावर्षीच्या ३८ व्या स्मिता स्मृती विशेषांकाचा विषय "माझे कुटुंब" असा असून या अंकाचे प्रकाशन अ.भा. बाल नाट्य परिषदेच्या अध्यक्षा नीलम सामंत यांच्या शुभहस्ते व मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु माडौं, अविनाश आवगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल. अंकाच्या अतिथी संपादक अनघा समीर सराफ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या विशेषांकाचा प्रकाशन आज दि.१ जानेवारी, २०२५ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न होईल.







